जळगाव

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

प्रारंभ:१९९६

आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६

पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६

बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष : ३१ | अंक : ४३ | मूल्य ४ रुपये | पृष्ठे ८+ ४ = १२ | जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध




## थोडक्यात महत्त्वाचे...

### कलाध्यापक संघ कार्यकारिणीत सुनील पाटील



**चोपडा :** कलाध्यापक संघाचे माजी अध्यक्ष व राजेंद्र माध्यमिक विद्यामंदीर गोरगावले या शाळेतील शिक्षक सुनील प्रताप पाटील यांची जळगाव जिल्हा कलाध्यापक संघाच्या कार्यकारिणीत सहसचिवपदी बिनविरोध निवड झाली. याबद्दल त्यांचे मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

### नशिराबादमध्ये आज आरोग्य तपासणी शिबिर

**नशिराबाद (ता. जळगाव) :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत भव्य निशुल्क आरोग्य तपासणी औषधोपचार शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरामध्ये विविध सुविधा नागरिकांना उपलब्ध राहणार आहेत. नागरिकांनी या शिबिराचा मोफत तपासणी व उपचारासाठी लाभ घ्यावा, असे आवाहन प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी गौरव जाधव यांनी केले आहे. या आरोग्य तपासणी शिबिरासाठी खासदार स्मिता वाघ उपस्थित राहतील.

### शेंदुर्णी गरुड महाविद्यालयात हिंदी दिन साजरा

**शेंदुर्णी (ता. जामनेर) :** येथील र. भा. गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय भोळे हे होते. प्रमुख वक्ता म्हणून हिंदी विभागप्रमुख डॉ. रोहिदास गवारे यांनी मार्गदर्शन केले. सर्वप्रथम तेजस्वीनी मोरे व प्रियंका पाटील यांनी स्वागत गीत सादर केले. डॉ. रोहिदास गवारे यांनी मनोगतातून हिंदी भाषा आणि साहित्याचे महत्व सांगितले. सकीना हिने मनोगत व्यक्त केले. गीता वाघ, सकीना मणियार व दिव्या पालीवाल यांनी बनवलेल्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले. निबंध तसेच पोस्टर स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करण्यात आले. जयश्री आहेर हिने सूत्रसंचलन केले. कोमल म्हस्के हिने आभार मानले. याप्रसंगी समन्वयक डॉ. दिनेश पाटील, डॉ. सुजाता पाटील, डॉ.योगिता चौधरी, डॉ.भूषण पाटील, डॉ.आजीनाथ जीवरग, प्रा.अश्विनी बारी, प्रा. वर्षा लोखंडे, प्रा.रिना गरुड तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



### गरुड विद्यालयाचे कुमावत यांना पदोन्नती

**शेंदुर्णी (ता. जामनेर) :** धी शेंदुर्णी सेकंडरी एज्युकेशन को-ऑप सोसायटी संचलित शेंदुर्णी येथील ग. र गरुड माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील गणित विषयाचे ज्येष्ठ शिक्षक भक्तराज कुमावत यांची पाळधी येथील क. द. नाईक माध्यमिक विद्यालयात संस्थेने मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती केली. यामुळे गरुड विद्यालयातर्फे त्यांना निरोप देण्यात आला. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य आर. एस. चौधरी यांच्या हस्ते व शिक्षक शिक्षकेतरांनी त्यांचा सत्कार केला. आर. एस. चौधरी यांनी कुमावत यांच्या कार्याचा गौरव केला. कुमावत यांना संस्थेचे चेअरमन संजय गरुड, व्हाईस चेअरमन भीमराव शेळके, सचिव सागरमल जैन, सहसचिव यू. यू. पाटील, कार्यालय सचिव दीपक गरुड, वसतिगृह सचिव गो. गो. सूर्यवंशी तसेच संचालक मंडळाने मुख्याध्यापक पदाला आपण योग्य न्याय देणार असे संबोधून शुभेच्छा दिल्या.

## भारतीय मजदूर संघाचे सुरेश सोनार यांचे निधन, आज अंत्ययात्रा



**जळगाव :** भारतीय मजदूर संघाचे माजी जिल्हा सरचिटणीस व वीज कामगार संघाचे आधारस्तंभ सुरेश सोनार यांचे मंगळवारी दुपारी पाच वाजता हृदयविकाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा बुधवारी सकाळी दहा वाजता त्यांच्या निवासस्थानावरून जुने निमखेडी शिवार येथून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सून, नातवंडे असा परिवार आहे. दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भारतीय मजदूर संघ आणि वीज कामगार महासंघ म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम केले. राष्ट्रीय, प्रदेश, जिल्हा, विभाग, स्तरावर त्यांनी विविध जबाबदाऱ्यावर काम केले. उत्तम वक्ते, संघटक आणि बृहद संपर्क असलेले कार्यकर्ते अकाली अचानक आपल्यातून निघून गेले. भारतीय मजदूर संघाचा एक उमदा कार्यकर्ता आपल्यातून अचानक निघून गेला. आपले कधीही न भरून निघणारे नुकसान झाले आहे. सोनार परिवाराच्या दुःखात भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश तसेच महाराष्ट्र वीज कामगार महासंघ सहभागी आहे, असे भारतीय मजदूर संघाचे जिल्हा सचिव सचिन लाडवंजारी यांनी श्रद्धांजली वाहताना म्हटले आहे.

## निधन वार्ता

### जितेंद्र चौधरी



**मुक्ताईनगर :** शहरातील श्रीराम नगरातील रहिवासी जितेंद्र दामू चौधरी (वय ५१) यांचे १७ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

### सुशीलाबाई भारंबे



**फैजपूर (ता. यावल) :** येथील रहिवासी तथा खिर्डी (ता. रावेर) येथील मुलींचे विकास विद्यालयातील माजी मुख्याध्यापिका सुशीलाबाई वसंत भारंबे (वय ९३) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या पुणे येथील गिरीश भारंबे यांच्या आई होत.

# सेंट अलॉयसिस शाळेच्या घटनेबाबत भुसावळात सकल हिंदू समाज बांधवातर्फे मोर्चा





**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १६ सप्टेंबर**

येथील सेंट अलॉयसिस कॉन्व्हेंट हायस्कूलमध्ये सद्भावना दिवसाचे औचित्य साधून सर्वधर्म समभावाच्या नावाखाली हिंदू धर्मियांच्या भावना दुखविल्यामुळे शाळा प्रशासन तसेच संबंधित शिक्षकांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत शहरात मंगळवारी सकाळी सकल हिंदू समाजातर्फे भव्य मोर्चा काढण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी व प्रांताधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

या सहलीमध्ये अंदाजे ९० टक्के विद्यार्थी हे हिंदू धर्मीय होते. त्यांना जाणीवपूर्वक इतर धर्मियांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यामुळे जाणीवपूर्वक हिंदू धर्मायांच्या भावना दुखवून समाजात तेढ निर्माण होईल, असे बेकायदेशिर कृत्य संबंधीत शाळा प्रशासनाने व संबंधित शिक्षकांनी केले आहे. त्यामुळे भुसावळ हे शांत शहर असून, शहराची शांतताभंग झाली आहे. म्हणून सकल हिंदू समाज या घटनेचा तीव्र शब्दात निषेध करून ही तक्रार देण्यात आली आहे. या अगोदरदेखील या शाळेने धार्मिक भावना दुखविण्याचे प्रकार केले आहे. जसे की शाळेमध्ये विद्यार्थ्यांना राखी बांधुन येण्यास मनाई केली जाते. मुलींना कुंकू अथवा टिकली लावून तसेच कानातील आभूषण परिधान करुन तसेच हातावर मेहंदी काढून येण्यास प्रतिबंध आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर साँग बुक नावाच्या पुस्तकामधील ख्रिस्ती धर्माची प्रार्थना करण्यात येते. इ. प्रकार ख्रिस्ती धर्माच्या प्रचार प्रसारासाठी बिनधास्तपणे सुरू आहे. वास्तविक या शाळेमध्ये ९५ टक्के हिंदूधर्मीय असल्याने हिंदू सण मोठ्या उत्साहाने साजरे होणे अपेक्षित असताना सदर शाळा ही सण-उत्सव साजरे करताना भेदभाव करते. वास्तविक केंद्र शासनाच्या राष्ट्रीय बालअधिकार संरक्षण आयोगाच्या निर्णयाप्रमाणे सणांबाबत भेदभाव करणे हा अपराध मानण्यात आला आहे. मात्र ही शाळा मनमानी कारभार करीत आहे, असा आरोप निवेदनात केला आहे.

ही शाळा प्रशासन व संबंधित शिक्षक यांनी सहलीत गेलेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांना धमकावून कोणतीही तक्रार दिल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करण्यात येईल, असे सांगितल्याने भीतीपोटी संबंधित पालक अथवा विद्यार्थी तक्रार देण्यासाठी समोर येण्यास तयार होत नाही. त्याचाच एक भाग म्हणून दि. १५ सप्टेंबर रोजी शाळा प्रशासनाने सहलीला गेलेल्या काही निवडक विद्यार्थ्यांना ढालीप्रमाणे वापर करून प्रसार माध्यमांना बेकायदेशीररित्या शाळेत बोलावले व शाळा प्रशासनाच्या बाजुने मुलांना मुलाखत देण्यास भाग पाडले. जेव्हा की हे सर्व विद्यार्थी कायदेशीरदृष्ट्या अज्ञान बालक आहेत.

संबंधित शाळा प्रशासन हे वारंवार हिंदू धर्माच्या भावना दुखावत असल्यामुळे शाळा प्रशासन व संबंधित शिक्षकांवर धार्मिक भावना दुखावल्याबाबत कडक कारवाई करण्यात यावी. तसेच या शाळेवर प्रशासकाची नेमणूक करावी. तसे न केल्यास लोकशाही व कायदेशीर मार्गाने शाळा प्रशासनाविरुद्ध मोठे आंदोलन करण्यात येईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

## धुळ्यात शनिवारी अमृत मेळावा

**धुळे :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या वतीने २० सप्टेंबर रोजी दुपारी ३:३० वाजता सुरते मंगल कार्यालय (स्वामी समर्थ केंद्रासमोर, विद्यानगरी, देवपूर, धुळे) येथे अमृत मेळावा व परिसंवाद सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा व्यवस्थापक हेमंत पाठक यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकान्वये ही माहिती दिली. या मेळाव्यात खुल्या प्रवर्गातील समाज बांधवांसाठी अमृत संस्थेच्या विविध शैक्षणिक, कौशल्य विकास आणि उद्योग उभारणीसाठीच्या योजनांची माहिती व मार्गदर्शन केले जाणार आहे.

या कार्यक्रमास आमदार अनुप अग्रवाल, अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी, राज्य समन्वयक दीपक जोशी, नाशिक विभाग व्यवस्थापक मंगेश खाडिलकर, सामाजिक कार्यकर्ते गजेंद्र अंपळकर उपस्थित राहतील. अधिक माहितीसाठी ९८२२८२९५५५/९४०५६१५१२७/८३२९६४२७३७ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा. नागरिकांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक पाठक, अमृतमित्र विलास चंद्रात्रे, शेखर कुलकर्णी यांनी केले आहे.

## भुसावळात आज सेवा पंधरवड्याचा शुभारंभ

**भुसावळ :** शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानातंर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत सेवा पंधरवाडा साजरा येणार आहे. त्याअनुषंगाने या कालावधीत विविध शासकीय विभागामध्ये 'सेवा पंधरवाडा' साजरा करण्यात येणार आहे. सेवा पंधरवाडा साजरा करणेसाठी उपविभागातील सर्व शासकीय विभागप्रमुखांची आढावा बैठक ११ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उपविभागीय अधिकारी कार्यालयात झाली. या सेवा पंधरवाडा कार्यक्रमाचा शुभारंभ १७ सप्टेंबर रोजी होणार आहे.

यावेळी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजना व त्याविषयीचे काम काज करणे, अर्ज स्वीकारणे, माहिती उपलब्ध करून देणे अश्या सुविधा या सेवा पंधरवाड्याच्या निमित्ताने सर्व शासकीय कार्यालये एका छताखाली येवून नागरीकांना पुरविणार आहेत. तसेच पंधरवाडा विविध शासकीय कार्यालयाच्या स्तरावर होणार आहे. सेवा पंधरवाड्यामध्ये बचत गटांना कर्ज वाटप करणे, महा डीबीटी योजनेचे अर्ज भरून घेणे, रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, माझी कन्या भाग्यश्री योजना, नवीन मतदार नोंदणी, ई रेशन कार्ड, जमीन महसूल व अतिक्रमण नियमानुकुलविषयक कामकाज, सामाजिक अर्थ सहाय्य योजना विषयक कामकाज, शेती सुलभ योजना, शेतकरी आत्महत्या ग्रस्त कुटुंबासाठीच्या योजना तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या दाखल्यांसाठी शिबिर आयोजित करणे अशा प्रकारच्या योजना उपलब्ध करून देणेबाबत नियोजन करण्यात आलेले आहे. सर्व नागरिकांना याचा लाभ घ्यावा, असे अवाहन उपविभागीय अधिकारी जितेंद्र पाटील यांनी केले आहे. या बैठकीस तहसीलदार नीता लबडे, तहसीलदार अनिल पुरे, निकेतन वाळे यासह अन्य विभागांचे सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

## पारोळ्यात जनआक्रोश मोर्चासंदर्भात बैठक

**पारोळा :** जळगाव येथे बुधवारी होणाऱ्या शेतकरी जनआक्रोश मोर्चासंदर्भात पारोळा-एरंडोल तालुक्यातील शेतकरी संघटना, शेतकरी संघर्ष समिती, प्रहार संघटना, शेतकरी कृती समिती, तसेच सर्व राजकीय पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व संघटनेचे पदाधिकारी यांची पारोळा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे बैठक मंगळवारी घेण्यात आली. माजी खासदार उन्मेष पाटील, लोकसभा संघटक करण पवार यांनी मार्गदर्शन केले. जनआक्रोश मोर्चासंदर्भात जळगाव येथे सरकारकडून आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी पारोळा एरंडोल तालुक्यातील शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माजी खासदार उन्मेष पाटील यांनी केले. यावेळी शिवसेना उबाठा पक्षाचे उपनेते गुलाबराव वाघ, शेतकरी संघटनेचे नेते सुनील देवरे, उबाठा जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील, शेतकरी संघटना चोपडा तालुकाध्यक्ष संदीप पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती पारोळा उपसभापती रवींद्र पाटील, एरंडोल येथील ज्येष्ठ शिवसैनिक रमेश पाटील, शिवसेना उबाठा तालुकाप्रमुख एरंडोल रवींद्र चौधरी, पारोळा शहरप्रमुख अशोक मराठे, माजी तालुकाप्रमुख दौलत पाटील, उपतालुकाप्रमुख दादा पाटील, नगरसेवक पी.जी पाटील, मनीष पाटील, भय्या चौधरी उपस्थित होते.

## मोठे प्रकल्प पूर्ण भरले, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

### वाघूरच्या २० दरवाजातून ६५ हजार तर बहुळाच्या ९ दरवाज्यातून ७० हजार क्यूसेकचा विसर्ग



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर :**

जिल्ह्यात गिरणा हतनूर आणि वाघुर या तीन मोठ्या प्रकल्पांपैकी वाघूर प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. सकाळी ६ वाजता व नंतर १० वाजता पाण्याची आवक पहाता प्रकल्पाचे २० दरवाजे उघडून तब्बल ६५ हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग केला जात आहे. तर मध्यम प्रकल्पापैकी बहुळा प्रकल्पाचे देखील ९ दरवाजे उघडून तब्बल ७० हजार क्यूसेकचा विसर्ग केला जात आहे.

जिल्हातील मोठे व मध्यम प्रकल्पात होत असलेली आवक पहाता प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात विसर्ग केला जात आहे. त्यामुळे तापी, गिरणा, वाघूर, बहुळासह अन्य नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

**वाघूरचे २० दरवाजांतून ६५ हजार क्यूसेकचा विसर्ग**

जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून दमदार पाऊस झाला आहे. जिल्ह्यातील मोठ्या प्रकल्पांपैकी जळगाव शहरानजीक असलेल्या वाघूर प्रकल्प पाणलोट क्षेत्रात आतापर्यंत ४३८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून प्रकल्प पातळी ९९ टक्क्यांपर्यंत पोचली आहे. प्रकल्प सुरक्षीतता लक्षात घेता प्रकल्पाचे २० दरवाजे ०.५० मिटरने उघडून ६५ हजार क्यूसेकचा विसर्ग केला जात आहे. सद्यस्थितीत वाघुर धरणाच्या पाणलोट क्षेत्राम धून येवा वाघुर धरणात येत आहे. वाघुर प्रकल्पामध्ये येणाऱ्या पाण्याची आवक वाढल्यास विसर्ग वाढविण्यात येईल.

**नागरिकांना सतर्कतेचा इशारा**

वाघुर नदीकाठावरील नागरिकांना सतर्क करण्यात येत आहे की, नदीकाठावरील नागरिकांनी पशुधन, चीज वस्तू, शेती मोटार पंप, आदी सुरक्षितेच्या दृष्टीने सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावे. जेणेकरून कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. संबंधित शासकीय यंत्रणांनी याबाबत दक्षता घ्यावी, असे जामनेर पाटबंधारे उपविभागीय अधिकारी यांनी म्हटले आहे.

## जिल्ह्यात अतिवृष्टी भागात मदतीसाठी प्रशासन सज्ज; राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे ३५ अधिकारी व जवान दाखल

### जनतेने दक्षता घ्यावी -पालकमंत्र्यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर :**

जळगाव जिल्ह्यातील जामनेर, पाचोरा आणि मुक्ताईनगर तालुक्यांमध्ये १५ आणि १६ सप्टेंबर रोजी मोठ्या प्रमाणावर मुसळधार पावसामुळे पिकांचे, घरांचे तसेच जनावरांचे नुकसान झाले आहे.

जिल्हा प्रशासनाने तातडीने बचाव व मदतकार्य सुरु केले असून बाधित नागरिकांसाठी शाळांमध्ये निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नागरिकांना घाबरून न जाता दक्षता घेण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जळगाव यांनी राज्य आपत्ती प्रतिसाद दल धुळे ३५ अधिकारी व जवान यांचे पथक जिल्ह्यात दाखल झाले आहे. यात प्रत्येकी एक पथक जामनेर आणि पाचोरा येथे रवाना करण्यात आलेले आहे.

"प्रशासन तुमच्या पाठीशी आहे. प्रत्येक बाधित कुटुंबापर्यंत मदतीचा हात पोहोचवला जाईल. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. नदी-नाल्याजवळ जाणे टाळावे तसेच गुरे-ढोरे, शेतीसाहित्य सुरक्षित स्थळी हलवावे. प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवा आणि संयम बाळगा," असे पालकमंत्री पाटील यांनी म्हटले आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान आजपासून

**तभा वृत्तसेवा**
**शिंदखेडा, १६ सप्टेंबर**

महाराष्ट्र राज्य ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येणार आहे. १७ सप्टेंबरपासून या अभियानाची सुरुवात होत आहे.

९० दिवसांत ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद पातळीवर स्पर्धा घेऊन विजेत्या स्थानिक स्वराज्य संस्थांना सुमारे २९० कोटी रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. या स्पर्धेत खलाणे ग्रामपंचायतीने देखील सहभाग नोंदविला आहे त्या अनुषंगाने १७सप्टेंबर २०२५ रोजी खलाणे ग्रामपंचायत कार्यालयात जिल्ह्याचे पालकमंत्री व पणनमंत्री जयकुमार रावल उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस हे राज्यात या अभियानाचा शुभारंभ करणारआहेत. या अभियानाचे औचित्य साधत तालुक्यातील १२३ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा आयोजित करण्यात आले आहेत. या अभियानात तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन गटविकास अधिकारी रमेश नेतनवारे यांनी केले आहे.

तालुक्यातील सर्व ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, शासकीय कर्मचारी व सामाजिक संघटनांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन तहसीलदार संभाजी पाटील यांनी केले.

**Change In Name**

I have changed my Name from **IYESHA SHAIKH JAVEED AKHTAR** (as per old Passport) to **AAISHA JAVEED AKHTAR SHAIKH** (New Name) all my transactions will be done with my New Name

तरुण भारत tarunbharatlive.com CLASSIFIEDS

**11th 12th CA & B.Com**
All Subject Under One Roof
Accounts - CA Dinesh Lodha
Maths -Prof. Smita Sharma
Eco -CA CS Sneha Lodaya
OCM & SP - CA Rakhi & Adv. Aniket
**3 Students Scored 100**
**PARSHWANATH COMMERCE ACADEMY**
Near M. J. College, jalgaon
Mob - 8149-666-339

**तरुण भारत'तर्फे लवकरच ज्येष्ठ नागरिक मंच**
राष्ट्रीय विचारांच्या 'जळगाव तरुण भारत'तर्फे लवकरच 'ज्येष्ठ नागरिक मंच'ची स्थापना करण्यात येणार आहे. यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करावी.
संपर्क - ९७६४९०३७०१

"Exchange Rate Minimum 5,000/-*"
**धुलिया सायकल कंपनी**
८२३७३५६१५९, ९४२३९७७१९४, ९४२३९७५३९२
आता सायकल ०% डाऊनपेमेंटवर उपलब्ध
प्लॉट नं. २१, सीटीएस-७१५४, सर्वे नं. २४७/ए/३ हॉटेल सायली जवळ, स्टेट बँक ऑफ इंडिया (एडीबी ग्रामीण शाखा) च्या खाली, रिंग रोड, जळगाव

महाराष्ट्र चे सुप्रसिध्द ज्योतिषी १५० वर्षाची परंपरा असलेले
**श्रीभृगूज्योतिषकेंद्र**
तुमच्या जिवनातल्या कोणत्याही कठिण समस्यांचे तुरंत १०१ % कायम स्वरुपी समाधान. जिथं समस्या आहेत, तिथ "निराकरण" ही आहे । गरज आहे, ती योग्य मार्ग दर्शनाची । समस्या, चिंता, निराशा, सोडा, एकदा येऊन प्रत्यक्ष भेटा. मंत्र-सिध्द रुद्राक्ष व रत्ने (खडे), मंत्रसिध्दसर्व यंत्र (अनुभव हिच खात्री) दादावाडी जळगाव
मो.९८२२७७४१५१,९८२३०४७८११

घर असो वा शेत झेनिथ पाईप सेवेत...
ISI भारतात प्रथम क्रमांकावर असलेले बिर्लांचे एक उत्पादन
**झेनिथ**
स्टील पाईप
जी.आय.पाईप
एम.एस.पाईप
ZENITH-BIRLA LIGHT
ZENITH-BIRLA MEDIUM
ZENITH-BIRLA HEAVY
• अधिकृत विक्रेता •
**संघवी पाईप**
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना, बँकांना, सरकारी क्रेडीट सोसायटी, को. ऑप. बँक, पतसंस्था, निम सरकारी कार्यालय यांना मला माझे पक्षकार १) सौ. इंदु राजेंद्र कोळी, २) श्री. राजेंद्र धुडकू कोळी, दोघेही रा.३०१, राजवीर गॅलेक्सी, गायकवाड नगर, दिघी, पुणे कॅम्प, पुणे शहर, जि.पुणे, यांनी दिलेल्या हक्क व अधिकारान्वये या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, ...

... आहे असे समजुन माझे अशिल सदर मिळकतीचा पुढील विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मग तदनंतर सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, ही जाहीर नोटीस दिली.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी सांगितलेवरुन, माहिती दिलेवरुन आज रोजी अशिलांचे खर्चाने प्रसिध्दीस दिली आहे.

जळगांव
दिनांकः-१६/०९/२०२५
१)(सौ. इंदु राजेंद्र कोळी)
२)(श्री. राजेंद्र धुडकू कोळी)
ॲड. शैलेश रविकांत नागला
ऑफिसः फ्लॅट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (श्रध्दा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव.
मो.नं.८२०८००९६८९

नमुना क्र ७५
जावक क्रमांक/ACC-/3272/2025
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, मायादेवी मंदिरासमोर, हतनूर वसाहत, समाज कल्याण भवनांच्या बाजूला, महाबळ रोड, जळगाव 425001.

**चौकशी जाहीर नोटीस**

फेरफार अर्ज क्र. १०११/२०२४ ...

... काही प्रयत्न आल्यास कोणास काही सांगायचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश पारित केले जातील.

ही नोटीस आज माझ्या सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या शिक्क्यानिशी आज दिनांक 10/09/2025 रोजी दिली.

सही/-
(श. रा. पाटील)
अधीक्षक (न्यायशाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जळगाव विभाग, जळगाव

**जाहीर प्रगटन**

मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २५९/२०२५
१) परसराम भावराव झाल्टे, वय-४४ वर्ष, धंदा-शेती, ...

... अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि.१०/९/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु. ता. २७/१०/२०२५
सही/- क. लिपीक
आदेशावरून सही/- सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव

जा.क्र. ३२०५/२०२५ दि.१५/०९/२०२५.
नाशिक येथील मे. धर्मादाय सह आयुक्त-२ नाशिक विभाग, नाशिक यांचे कोर्टात

**चौकशीची जाहीर नोटीस**

प्रकरण / चौकशी क्र. ६६/२०२५, कलम - ४७
न्यासाचे नाव : मध्य भारत संयुक्त खानदेश लाड सुवर्णकार मंडळ, अमळनेर, जि. जळगाव, रजि.नं.ए-२१३/जळगाव.
श्री. बाबुराव रामचंद्र पवार व इतर ....अर्जदार
// विरुद्ध //
कोणीही नाही ....सामनेवाला
...
आज दि. १५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय सहआयुक्त-२, नाशिक विभाग, नाशिक यांच्या शिक्क्यानिशी दिले.
सही/- अधिक्षक
धर्मादाय सहआयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक

जा.क्र. ३१९३ /२०२५
धर्मादाय सह आयुक्त-२ कार्यालय नाशिक विभाग नाशिक जानकी प्लाझा, नाशिक पुणे रोड, द्वारका नाशिक-४२२०११
दिनांक :- १२/०९/२०२४

**जाहीर नोटीस**

प्रकरण/चौकशी क्र. २८/२०२५ कलम-३६ (१) अ
...
आज दिनांक ११/०९/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व धर्मादाय सह आयुक्त-२, नाशिक विभाग नाशिक यांच्या शिक्क्यानिशी दिले.
सही/- अधिक्षक (न्याय)
धर्मादाय सह आयुक्त-२ कार्यालय नाशिक विभाग, नाशिक

**टायटल व्हेरिफिकेशनची जाहिर नोटीस**

तमाम लोकांना, वित्तीय संस्थांना, बँकांना, सरकारी क्रेडीट सोसायटी, को. ऑप. बँक, पतसंस्था, निम सरकारी कार्यालय यांना मला माझे पक्षकार १) श्री. प्रविण पुना धनगर, २) सौ. राधिका प्रविण धनगर, दोघेही रा. मंगरुळ, ता.चोपडा, जि. जळगांव यांनी दिलेल्या हक्क व अधिकार अन्वये या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णनः मौजे चोपडा, ता. चोपडा, जि. जळगांव येथील शेत गट नं.१३६८/पैकी मधील प्लॉट नं.२१ व २२ यांसी एकुण क्षेत्र ३४०.०० चौ.मी. यापैकी सामाईकात अविभक्त उत्तरेकडील घर नं.४ यांसी प्लॉटचे क्षेत्र ५६.७८ चौ.मी. व यावरील बांधीव क्षेत्र ४१.०३ चौ.मी. ...

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलांनी सांगितलेवरुन, माहिती दिलेवरुन आज रोजी अशिलांचे खर्चाने प्रसिध्दीस दिली आहे.
जळगांव
दिनांक १६/०९/२०२५
सही/- ॲड. शैलेश रविकांत नागला
ऑफिसः- फ्लॅट नं. ३ पहिला मजला, कालिदास चेंबर्स (श्रध्दा अपार्टमेंट) शाहू कॉम्प्लेक्स जवळ, जळगांव.
मो.नं.८२०८००९६८९

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ: १९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएल/८८/२०२४-२०२६
बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

स्थानिक स्वराज्य संस्था

# ३१ जानेवारीपर्यंत व्हाव्यात निवडणुका

● सर्वोच्च न्यायालयाचा निर्देश ● विलंबाबद्दल राज्य निवडणूक आयोगाला फटकारले

◆ **नवी दिल्ली, १६ सप्टेंबर**

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र निवडणूक आयोगाला (एसईसी) महापालिका निवडणुका तीन वर्षांनी पुढे ढकलल्याबद्दल फटकारले. सोबतच न्या. सूर्यकांत आणि न्या. जयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचा निर्देश दिला.

खरेतर, ओबीसी आरक्षणाच्या वादामुळे २०२२ पासून महाराष्ट्रात जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपालिकांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. यापूर्वी ६ मे रोजीही याच प्रकरणात न्यायालयाने आयोगाला चार आठवड्यांच्या आत निवडणुकांबाबत अधिसूचना जारी करण्यास सांगितले होते.

न्यायालयाने म्हटले की, लोकशाहीसाठी हा एक गंभीर मुद्दा आहे आणि आता कोणत्याही परिस्थितीत निवडणुका पुढे ढकलता येणार नाहीत. ही सूट फक्त यावेळीच देण्यात आली आहे, आतापासून कोणतेही निमित्त स्वीकारले जाणार नाही. लोकशाहीची मुळे मजबूत करण्यासाठी वेळेवर निवडणुका घेणे खूप महत्त्वाचे आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, मागील सुनावणीवेळी चार महिन्यांत निवडणुका



घेऊ म्हणणाऱ्या निवडणूक आयोगाचा हलगर्जीपणा झाल्याचे दिसत आहे. आता तरी प्रभागांचे सीमांकन ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावे. निवडणुका घेण्यासाठी आवश्यक असलेल्या मशीन्स आणि कर्मचाऱ्यांची संख्या राज्याच्या मुख्य सचिवांना तत्काळ कळवावी.

**यापूर्वीच दिली होती मुदत**

६ मे २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी चार आठवड्यांच्या आत अधिसूचना जारी करावी. तसेच चार महिन्यांत पालिका निवडणुका घेण्याचा प्रयत्न करावा, असे न्यायालयाने म्हटले आहे.

**आयोगाच्या युक्तिवादावर नाराजी**

**»** निवडणूक आयोगाने न्यायालयात युक्तिवाद केला होता की पुरेशा इव्हीएम, शाळेच्या इमारती आणि परीक्षांमुळे कर्मचाऱ्यांचा अभाव यामुळे विलंब झाला. यावर न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आणि म्हटले की मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या बोर्ड परीक्षा निवडणुका पुढे ढकलण्याचे कारण असू शकत नाही.

**२०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा निकाल**

२०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला होता की, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींसाठी आरक्षणाला परवानगी दिली जाणार नाही जोपर्यंत सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या २०१० च्या आदेशात नमूद केलेल्या तिहेरी चाचणीची पूर्तता करत नाही. तिहेरी चाचणी निकष पूर्ण होईपर्यंत ओबीसी जागांना सामान्य श्रेणीतील जागा म्हणून पुन्हा अधिसूचित केले जाईल, असा आदेश न्यायालयाने दिला होता.

# भारताने फेटाळला होता अमेरिकेचा मध्यस्थी प्रस्ताव

◆ **इस्लामाबाद, १६ सप्टेंबर**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमधील संघर्ष रोखण्यासाठी अमेरिकेकडून आलेला मध्यस्थीचा प्रस्ताव भारताने फेटाळला होता. शांतता चर्चेसाठी तिसऱ्या पक्षाची मध्यस्थी नाकारल्याने पाकिस्तानने भारताशी चर्चा करण्यासाठी अनेक वेळा पुढाकार घेतला, अशी कबुली पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी दिली.

त्यामुळे भारत-पाकिस्तान संघर्ष रोखण्यासाठी मध्यस्थी केल्याचा दावा करणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प तोंडघशी पडले आहे. एका कार्यक्रमात भारत-पाकिस्तान संघर्षावर बोलताना इशाक दार म्हणाले, ऑपरेशन सिंदूरदरम्यान युद्धबंदीचा प्रस्ताव अमेरिकेमार्फत आला होता.




Exclusive Pre-GST benefits now make buying a Kia even more rewarding. Add in our ongoing festive offers, and the savings get even better. It's the perfect time to bring home the Kia you've always wanted.

| Model | Pre-GST benefits (up to) | Additional festive benefits (up to) | Total benefits* (up to) |
|---|---|---|---|
| Seltos | ₹ 58 000 | ₹ 1 17 000 | ₹ 1 75 000 |
| Carens Clavis | ₹ 53 650 | ₹ 91 850 | ₹ 1 45 500 |
| Carens | ₹ 43 500 | ₹ 83 000 | ₹ 1 26 500 |

*Benefits available on other Kia cars as per applicability.

For more information, visit our dealership or contact:
1800 108 5000 | 093195 91407 | www.kia.com | Book Kia | kiacare@kiaindia.net | Look for "Kia India" @

*Terms & condition apply. Pre- GST benefits and additional festive benefits are at the sole discretion of the dealership. The product shown is for representation purposes only. Benefits may vary from model to model & region to region. Actual features, colors, and specifications may not be part or standard fitment and may vary. Kia India Pvt. Ltd. reserves the right to make any changes with respect to the trims, colors, specifications, and other details of any model as mentioned or to modify/ discontinue any offer/scheme/service without prior notice. Kia urges you to follow traffic rules, these are meant to keep you safe on the roads. Visit your nearest Kia dealership for more details.

**Akshay Kia**
Jalgaon Tel: 9372788111 | Dhule Tel: 8408881100 | Nandurbar Tel: 7770023145 | Khamgaon Tel: 7770060804






## अग्रलेख...

# कौतुक नक्षल पाड्याच्या ग्रंथदिंडीचे

'एक गाव, एक वाचनालय' या उपक्रमांतर्गत गडचिरोली पोलिस विभागाने अत्यंत दुर्गम अशा भामरागड तालुक्यातील जिजगाव येथे सार्वजनिक वाचनालय सुरू केले. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतर या गावी सुरू झालेले वाचनालय ही खरोखर लक्षणीय घटना मानली पाहिजे. ज्यांना आता आतापर्यंत शाळा म्हणजे काय हेच माहीत नव्हते, अशा गावांत आता वाचनालये सुरू होत असतील तर ती एका प्रगल्भ संस्कृतीकडे नेणारी वाटचाल आहे, असे म्हणावे लागेल. एकेकाळी माओवाद्यांमुळे प्रचंड दहशतीत असलेला हा संपूर्ण भूभाग आताश: मोकळा श्वास घेऊ लागला आहे. गेल्या पाच-सहा वर्षांत येथील नक्षलवादाची पाळेमुळे जोरकसपणे उद्ध्वस्त करण्यात पोलिस विभागासह सुरक्षा दलाला मोठे यश आले. याच वर्षी मे महिन्यात महाराष्ट्राच्या सीमेजवळील अबुझमाडच्या दाट जंगलात इंद्रावती राष्ट्रीय उद्यानाजवळ तब्बल २७ नक्षलवाद्यांना सुरक्षा जवानांनी कंठस्नान घातले होते. ती चकमक २०२६ पर्यंत या देशातून नक्षलवाद संपवण्याच्या मोदी सरकारच्या निर्धाराची नांदी ठरली. त्या घटनेनंतर या संपूर्ण परिसरात मोठा बदल होऊ घातला आहे. 'सोशल पोलिसिंग'ने आदिवासींमध्ये कमालीचा विश्वास जागवला असून, 'दादालोरा खिडकी' योजनेच्या माध्यमातून या वनवासी जनतेला विविध शासकीय योजनांचा लाभही मिळू लागला आहे. शासकीय दाखले, उच्च दर्जाचे कृषी बियाणे, स्वयंरोजगाराच्या संधी त्यांच्या दारापर्यंत पोहोचल्या आहेत. ज्या जिजगावात पोलिसांनी सार्वजनिक वाचनालय सुरू केले, ते गाव अगदी इंद्रावती राष्ट्रीय उद्यानाजवळ आहे, याचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. एकेकाळी जेथे बंदुकीच्या गोळ्यांनी, रस्त्या-रस्त्यांवर पेरलेल्या भू-सुरुंग स्फोटांनी दहशत माजायची, तेथे आज शांत वातावरणात आदिवासी बांधवांची मुले पुस्तके वाचू लागली आहेत, हा बदल नक्कीच सुखावणारा आहे.

आधी नक्षलग्रस्त गावांमध्ये राहणारा आदिवासी समाज माओवादी आणि पोलिसांच्या मध्ये भरडला जात होता. जिवाच्या भीतीने आणि पैशाच्या गरजेपोटी तो नक्षलवाद्यांना मदतही करायचा. पोलिसांनी मात्र अशाही काळात संयम बाळगला. वर्षानुवर्षे त्यांच्यातील राष्ट्रीय भावनेचा धागा तुटणार नाही याची काळजी घेतली. त्यांची गरज जाणून रोजगाराचे मेळावे घेतले. आदिवासी पाड्यातील बेरोजगार तरुणांना पोलिस भरतीत सहभागी करून घेतले. २०२३ साली सुरू झालेल्या अशाच सार्वजनिक वाचनालयांतून अभ्यास करून जवळपास २५० मुले पोलिस आणि अन्य शासकीय सेवेत रुजू झालीत. हातातल्या बंदुका सोडून पुस्तके हाती घेतलेले हे आदिवासी पाडे उन्नत भविष्याच्या दिशेने अग्रेसर झाले झाल्याचे दिसत आहे. जिजगावात पारंपरिक वेशभूषेतील मुले हाती राष्ट्रीय ध्वज घेऊन जेव्हा पुस्तक दिंडी काढतात, तेव्हा त्यांचा दिंडीमार्ग त्यांना या देशाच्या मुख्य प्रवाहाशी जोडतो. ही गोष्ट त्यांच्या लक्षात यायला स्वातंत्र्याची पंच्चाहत्तर वर्षे जावी लागली, हे दुर्दैवी आहेच. मात्र, आदिवासी समाजाच्या नव्या आणि कल्याणकारी भविष्याची ही दमदार सुरुवात आहे, हे काही कमी नाही.

**वाचनं ज्ञानदं बाल्ये, तारुण्य शीलरक्षकम्।**
**वार्धक्ये दुःखहरणं हितं सद्ग्रन्थवाचनम्॥**

पुस्तक वयाच्या कोणत्याही टप्प्यात वाचल्याने आयुष्याचे कल्याणच होणार आहे, हे या आदिवासी पाड्यातील ज्येष्ठांच्याही लक्षात आले असावे. कारण अशा वाचनालयांतून आता केवळ विद्यार्थीच नाही तर ज्येष्ठ नागरिकही दिसू लागले आहेत. त्यांची संख्या सध्या कमी आहे. पण ती वाढणार याचे स्पष्ट संकेत देणारेच आजचे चित्र आहे. खरे तर, अजूनही गडचिरोलीच्या दुर्गम भागात मोठ्या शैक्षणिक जागृतीची गरज आहे. ही गरज पूर्ण व्हावी म्हणून गडचिरोलीत गोंडवाना विद्यापीठाची स्थापना झाली. त्यालाही आता एक तप पूर्ण होऊन गेले आहे. पण या विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या संख्येची प्रचंड घसरण चिंता निर्माण करणारी आहे. गडचिरोली विद्यापीठांतर्गत येणाऱ्या चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील जवळपास २०६ संलग्न महाविद्यालयांतून २०२०-२२ मध्ये ७४ हजार ५६४ विद्यार्थी शिक्षण घेत होते. ते पुढे झपाट्याने कमी कमी होत गेले आणि २०२४-२५ येता येता अवघे ५४ हजार एवढे राहिले. या घसरणीची कमाल म्हणजे, यंदा २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी गत वर्षीच्या तुलनेत निम्म्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. विद्यार्थी अखेर गेले कुठे, असा प्रश्न आता विद्यापीठाला पडला आहे. त्यावर चिंतन सुरू आहे. या विद्यापीठात शिकणारे विद्यार्थी बहुतांशी दुर्गम आदिवासी गावांतून येतात. त्यांच्यात शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचे काम पोलिस विभागाची ही सार्वजनिक वाचनालये करतील, अशी आशा या बिकट प्रसंगी करायला हरकत नाही. एकप्रकारे उच्च शिक्षणाच्या ध्यासाची आदिवासीबहुल भागात पायाभरणी होते आहे, असेही मानता येईल.

सार्वजनिक ग्रंथालये ही निश्चितच समाजाच्या सर्वांगीण उन्नतीची दिशादर्शक व प्रेरक अशी ज्ञान केंद्रे असतात. महाराष्ट्रात आणि विदर्भात सार्वजनिक वाचनालयांची मोठी परंपरा आहे. शैक्षणिक व सामाजिक विकासापासून सदैव वंचित राहिलेल्या तळागाळातील दुर्बल व अभावग्रस्त समाजघटकांना ग्रंथालयीन सेवांचा यथायोग्य लाभ मिळाला तर त्यांचीही प्रगती होऊ शकते, याचा ठोस प्रत्यय देणारा गडचिरोली पोलिस विभागाचा हा उपक्रम आहे. गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील जिजगावसारख्या अतिदुर्गम व आदिवासीबहुल खेड्यात याच मांदियाळीतील एक सार्वजनिक ग्रंथालय सुरू झाले. या ग्रंथालयाचा जिजगावातील ७०, तर आजूबाजूच्या खेड्यातील सुमारे १५० विद्यार्थी लाभ घेत आहेत. हा परिसर खरे तर माओवाद्यांच्या आंदोलनाने ग्रस्त असलेला म्हणून ओळखला जातो. माओवाद्यांच्या घातक कारवायांमुळे तेथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. सर्वांगीण विकासापासून हा भाग फार दूर गेला आहे, ही भयाण वस्तुस्थिती आहे. पण आता या आदिवासी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांची सुरुवात झाली आहे. याच पूरक उपाययोजनांचा भाग म्हणून गडचिरोली पोलिस विभागाने २०२३ पासून सातत्याने या परिसरात एक दोन नव्हे, तर तब्बल ७२ ग्रंथालयांची स्थापना करून एक स्तुत्य व उपयुक्त असा उपक्रम सुरू केला आहे आणि ही बाब निश्चितच आश्वासक व अभिनंदनीय म्हटली पाहिजे.

ही ग्रंथालये नुसतीच स्थापन झाली असे नव्हे, तर त्या ग्रंथालयांचा आजवर ८ हजार ५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी लाभही घेतला आहे. त्यातील जवळपास २५० विद्यार्थी पोलिस दलात तसेच इतरही शासकीय विभागात स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून नोकरीत दाखल झाले आहेत, ही या योजनेचीच फलश्रुती म्हटली पाहिजे. जिजगावातील ग्रंथालय स्थापन करताना गावातील पाचशेहून अधिक ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात पारंपरिक वाद्यवृंदासह ग्रंथदिंडी काढून पोलिस विभागाच्या या उपक्रमास मनसोक्त दाद दिली, हेही या परिसरातील वाचनसंस्कृतीच्या विकासाची नांदी आहे. गडचिरोली जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम अशा माओवादीग्रस्त भागात ग्रंथालयांचे मोठे जाळे निर्माण करून वैचारिक परिवर्तनास चालना देण्याची अभिनव कल्पना पोलिस विभागास सुचावी व ती त्यांनी प्रभावीपणे आणि अल्पावधीत अंमलात आणावी, याबद्दल त्यांचे कौतुक करावे तितके कमी. या आश्वासक प्रयोगाची योग्य ती दखलही घेतली गेली पाहिजे. 'बंदुकीपेक्षा प्रेरणादायी पुस्तके भविष्य घडवणारी आहेत', अशा विचारांची पेरणी यानिमित्ताने या दुर्गम आणि भयग्रस्त भागात होऊ लागली आहे, ही गोष्ट या परिसराच्या भविष्याचा अंदाज देणारी मानली पाहिजे. हे कार्य जसे जसे पसरत जाईल, तसतसे गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम परिसराची प्रतिभा अधिक जास्त उजळून निघेल आणि ती देशात आपला प्रभाव सिद्ध करेल. कारण हा जिल्हा आता वाचू लागला आहे...आणि जो 'वाचत' असतो, त्याला अक्षरेच साऱ्या संकटांतून तारून नेत असतात!

## विशेष

# निकोबार द्वीपसमूहाचा व्यूहात्मक विकास

**प्रा. सुखदेव बखळे**

गेल्या पाच वर्षांमध्ये केंद्र सरकारने अंदमान आणि निकोबार बेटांना भारताच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वाचे स्थान बनवण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा उद्देश हा आहे की, या बेटाने भारताच्या पूर्व भागात सुरक्षा कवचासारखे काम करावे आणि 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशात भारताच्या हितांचे रक्षण करावे. यासाठी सरकारने येथे अनेक मोठी कामे केली आहेत. विमानतळ आणि बंदर सुधारण्यावर भर दिला आहे. सैन्यासाठी राहण्याची जागा बांधण्यात आली आहे. देखरेखीसाठी मजबूत यंत्रणा बसवण्यात आल्या आहेत, ग्रेट निकोबार बेटावर एक मोठा बदल केला जात आहे. त्यात एक नवीन आंतरराष्ट्रीय बंदर, एक नवीन विमानतळ, एक टाऊनशिप आणि एक गॅस आणि सौर-आधारित पॉवर हाऊस बांधणे समाविष्ट आहे; परंतु या विकासामुळे काही समस्यादेखील उभ्या राहत आहेत. चीनच्या वाढत्या नौदल शक्तीमुळे बंगालच्या उपसागराचे महत्त्व वाढले आहे; परंतु नागरी समाज आणि वन्यजीव तज्ज्ञ या प्रकल्पांना विरोध करत आहेत. त्यांच्या मते यामुळे येथील स्थानिक लोकांचे, विशेषतः शोम्पेन जमातीचे नुकसान होईल. याचा येथील प्रवाळ खडकांवर आणि सागरी जीवनावर वाईट परिणाम होईल. निकोबारमधील मेगापोड पक्षी आणि लेदरबॅक कासवांसारख्या धोक्यात असलेल्या प्रजाती धोक्यात येतील. निकोबारी लोक विकासक्षेत्रात असलेल्या त्यांच्या वडिलोपार्जित गावांमधून कायमचे विस्थापित होतील. या विकास प्रक्रियेत साडेआठ लाख ते ५८ लाख झाडांचा बळी देण्यात आला आहे. असे असले, तरी ग्रेट निकोबार प्रकल्पाचे सामरिक महत्त्व विसरता येणार नाही. पर्यावरण, संरक्षणात्मक महत्त्व, आदिम जातीचे अस्तित्व याचे संतुलन साधून विकास केला पाहिजे.

ग्रेट निकोबार प्रकल्प हा बंगालच्या उपसागरातील अंदमान आणि निकोबार बेटांच्या दक्षिणेकडील बेटासाठी प्रस्तावित केलेला एक मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्प आहे. ग्रेट निकोबार बेटावर बंदर, विमानतळ, वीज आणि टाऊनशिप सुविधा बांधण्यासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करणारी ही एक धोरणात्मक आणि पायाभूत सुविधा योजना आहे. त्यामुळे भारताची सागरी सुरक्षा आणि व्यापार वाढेल. या प्रकल्पाला २०२२ मध्ये पर्यावरणीय आणि वन मंजुरी मिळाली. या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे ८१ हजार कोटी रुपये असल्याचा अंदाज आहे. 'नीती आयोगा'च्या नेतृत्वाखाली आणि अंदमान आणि निकोबार बेटे एकात्मिक विकास महामंडळाद्वारे अंमलात येत असलेला हा प्रकल्प ग्रेट निकोबारला धोरणात्मक,



आर्थिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या केंद्रात रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट ठेवतो. जगातील सर्वांत व्यस्त शिपिंग लेनपैकी एक असलेल्या मलाक्का सामुद्रधुनीजवळ असलेल्या ग्रेट निकोबारच्या भौगोलिक स्थानाचाही मोठा फायदा होईल. येथे ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधला जात आहे. नागरी आणि संरक्षणविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाईन केलेल्या या विमानतळाची क्षमता २०५० पर्यंत येथे सुमारे चार हजार प्रवासी क्षमता असेल, असा अंदाज आहे. तीन ते चार लाख लोकसंख्येचे सुनियोजित शहर असेल. त्यात निवासी, व्यावसायिक आणि संस्थात्मक जागा असतील. गॅस आणि सौर-आधारित वीज प्रकल्प, तसेच रस्ते, पाणीपुरवठा आणि सहायक पायाभूत सुविधा तिथे निर्माण केल्या जातील. ग्रेट निकोबार प्रकल्प केवळ पायाभूत सुविधा आणि व्यापारासाठी महत्त्वाचा नाही, तर त्याचे भारतासाठी राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक महत्त्वदेखील आहे. मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ असल्यामुळे त्याचे धोरणात्मक स्थान महत्त्वाचे आहे. ग्रेट निकोबार सहा अंश अक्षांशाजवळ आहे. मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ एक महत्त्वाचा मार्ग आहे. तिथून जागतिक व्यापाराच्या ३०-४० टक्के आणि चीनची बहुतेक ऊर्जा आयात होते. ट्रान्सशिपमेंट पोर्ट आणि विमानतळ विकसित करून भारत जगातील सर्वांत व्यस्त आणि सर्वांत महत्त्वाच्या 'चोक पॉईंट'पैकी एकाद्वारे सागरी वाहतुकीचे निरीक्षण आणि संरक्षण करू शकतो. यामुळे हिंद महासागरात चीनची उपस्थिती संतुलित करण्याची भारताची क्षमता वाढते. बीजिंगच्या 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' धोरणाविरुद्ध या प्रकल्पाचा वापर केला जाणार आहे. त्यात हिंद महासागरात बंदरे आणि सुविधांचे जाळे तयार केले जाणार आहे. हे नियोजित दुहेरी वापराचे आंतरराष्ट्रीय विमानतळ नागरी आणि संरक्षण दोन्ही उद्देशांसाठी काम करेल. त्यामुळे भारताच्या एकमेव त्रि-सेवा कमांड असलेल्या अंदमान आणि निकोबार कमांडमध्ये नौदल आणि हवाई दलाची जलद तैनाती शक्य होईल. यामुळे अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील प्रमुख सागरी क्षेत्रांवर भारताची देखरेख मजबूत होईल. चीनने म्यानमार, श्रीलंका आणि पाकिस्तानमधील ग्वादर, हंबनटोटा आणि क्युकप्युसारख्या बंदरांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. ग्रेट निकोबारमधील जागतिक दर्जाचे भारतीय बंदर प्रादेशिक आणि जागतिक शिपिंगसाठी चिनी बंदरांना पर्याय तयार होईल. 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशात लॉजिस्टिक्स हब म्हणून भारताची भूमिका वाढवेल आणि प्रदेशात भू-राजकीय किंवा लष्करी तणावाच्या बाबतीत भारताला फायदा देईल.

या भागात बंदर आणि सहायक पायाभूत सुविधांमुळे शिपिंग मार्गांचे निरीक्षण, ट्रॅक आणि नियंत्रण करण्याची भारताची क्षमता सुधारेल. यामुळे 'क्वाड' सुरक्षा उपक्रमांमध्ये (अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासह) भारताची भूमिका बळकट होईल आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशात मुक्त आणि खुले नेव्हिगेशन सुनिश्चित होईल. हा संपूर्ण प्रकल्प पुढील ३० वर्षांमध्ये उभा राहील. या प्रकल्पात आतापर्यंत टप्प्याटप्प्याने कामे चालू आहेत. 'एनटीपीसी'ने या वर्षी एप्रिलमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पासाठी निविदा मागवल्या होत्या तर गेल्या वर्षी सप्टेंबर २०२४ मध्ये गॅलाथिया बेला प्रमुख बंदर म्हणून घोषित करण्यात आले. अहवालानुसार, सुमारे एक डझन कंपन्यांनी ते चालवण्यात रस दाखवला आहे. त्याच वेळी टाऊनशिप विकासासाठी झाडे मोजण्याचे आणि तोडण्याचे कामदेखील सुरू आहे. या प्रकल्पासाठी पर्यावरणीय मंजुरी नोव्हेंबर २०२२ मध्येच मिळाली होती. त्याच वेळी, त्याच्या देखरेखीसाठी ८० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

मेगा ट्रान्सशिपमेंट पोर्ट दर वर्षी १४ दशलक्ष टीईयू (वीस फूट समतुल्य युनिट्स)पेक्षा जास्त हाताळेल अशी अपेक्षा आहे. ही ट्रान्सशिपमेंट क्षमता ते कोलंबो, सिंगापूर आणि क्लांग बंदरांना पर्यायी बनवते. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालय (एमओपीएसडब्ल्यू) या ट्रान्सशिपमेंट पोर्ट प्रकल्पाची देखरेख करते. ते २०२८ पर्यंत पूर्ण होणार आहे. तसेच भारतीय विमानतळ प्राधिकरणाला ग्रेट निकोबारमध्ये ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यासाठी अधिकृत करण्यात आले आहे. त्याचे उद्दिष्ट वाईड-बॉडी विमाने हाताळणे तसेच कनेक्टिव्हिटी आणि पर्यटकांची हालचाल वाढवणे हे आहे. ग्रेट निकोबारचे धोरणात्मक स्थान कोबाल्ट, निकेल, तांबे आणि मँगनीज समृद्ध असलेल्या पॉलिमेटॅलिक नोड्यूलच्या किनारी खाणकामासाठी मोठी क्षमता देते. खनिजांच्या क्षेत्रात स्वयंपूर्णता प्राप्त करणे भारतासाठी महत्त्वाचे आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**अनिल फेकरीकर**

# प्रत्येक गावात उभारा आमराई!

'झाडांना नका करू नष्ट, श्वास घेताना होईल कष्ट...' एवढे शाश्वत सत्य माहीत असतानाही गावागावांत पूर्वी ज्या आमराई बहरत होत्या, त्या लोकांनीच अतिक्रमण करून नष्ट केल्या. परिणामी आज गावे ओसाड झाली आहेत. गावातील ते गावपण पुन्हा एकदा यावे असे कुणाला वाटत असेल, तर त्यांनी आता आमराई उभारण्यासाठी प्रयत्न करायलाच हवेत; नव्हे तेव्हाच आपण समाजासह पर्यावरणाचे ऋण फेडू आणि 'लावा वृक्ष मिळवा मोक्ष' हे ध्येय प्रत्यक्ष अंमलात आणू शकतो. पण हा विचार समोर आल्यावर अनेक जण विविध कारणे सांगतील. नाक मुरडून त्याला फाटा देतील. पण नागपूर जिल्ह्यातील कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील हरहुन्नरी पर्यावरणप्रेमी मुख्य अभियंता विलास मोटघरे, कार्यकारी अभियंता सुरेश जाधव, अजय मांजरीकर, दीप्ती मेश्राम, विशाखा भट्टी यांनी मात्र सर्व प्रशासकीय अडथळ्यांवर मात करीत असलेल्या जागेवर आमराई उभारून नवा चमत्कार घडवून आणला आहे. त्यांनी कोराडी विद्युत विहार वसाहतीतील २५ हेक्टर जागेवर सुमारे ७७५८ फळझाडांची लागवड केली. यात केशर आंब्याची १५५२ झाडे, फणस १५५०, आवळा १५५२, जांभूळ १५५२ आणि बदामाच्या १५५२ झाडांची लागवड करण्यात आली आहे.

एवढ्या मोठ्या संख्येने लावलेल्या फळझाडांची निगा राखता यावी म्हणून त्यांनी आसपासच्या महिला बचत गटांना काम दिले. यातून १२० महिलांना रोजगार मिळाला अन् भविष्यात वीज केंद्रातील कर्मचाऱ्यांसह कुटुंबीयांना गोड फळे चाखायला मिळण्याचा मार्गही प्रशस्त झाला आहे. हा प्रयोग आपण गावागावांत ग्रामपंचायतच्या मदतीने पूर्णत्वास नेऊ शकतो. तसे पाहता यात रोजगार हमी योजनेतील मजुरांचाही उपयोग ग्रामपंचायतला करता येईल. महाराष्ट्रात २७,९५१ ग्रामपंचायती असून ४२,२६७ गावे अस्तित्वात आहेत. या प्रत्येक गावात समजा रिकाम्या पडलेल्या जागेवर प्रत्येकी १०० आंब्याची किंवा पर्यावरणनुकूल फळझाडे लावली तर त्यांची संख्या सुमारे ४२ लाख २६ हजार ७०० होईल. आता एवढ्या मोठ्या प्रमाणात फळझाडे जगली अन् त्यापासून उत्पादन मिळाले तर कुठल्याही गावातील मुले कुपोषित राहणार नाहीत. गावातील प्रत्येकाला गोड फळे खायला मिळतील.

तसे पाहता गेल्या काही वर्षांपासून वन्यप्राणी सहजतेने गावात येण्याचे प्रमाण वाढले आहे. कारण काय तर वनात पूर्वी तृणभक्षी प्राण्यांना विविध फळे खायला मिळायची. यामुळे ते तिथेच राहायचे अन् त्यांना मारून जगणारे वाघ, बिबटेही आनंदाने वनातच राहायचे. आता वनात खायला मिळत नसल्याने ते तृणभक्षी नाईलाजाने गावात आणि शेतात ठाण मांडून आहेत. याचा अर्थ आमराईसह फळझाडांची बाग गावात आणि वनात बहरली तर अनेक समस्या चुटकीसरशी संपुष्टात येऊ शकतात. नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यात अंबाझरी पथरई या गावातील गावकऱ्यांनी प्रत्येक घरामागे परसबाग उभारली आहे. त्या परसबागेत फळझाडे आणि भाजीपाल्याची लागवड केलेली आहे. परिणामी त्यांच्या कुटुंबीयांना सहजतेने फळे आणि भाजीपाला प्राप्त होतो. यामुळे त्यांचे कुपोषण होत नाही. शिवाय दैनंदिन उपयोग केल्यावर वाया जाणाऱ्या पाण्याचाही त्यांनी सदुपयोग करून दाखविला आहे. मग आपण रिकाम्या जागा शोधून तिथे घरासाठी भूखंडच पाडायचे काय? कुठेही जागा असो तिथे फळझाडांची लागवड केल्यास त्यापासून जे काही मिळेल, ते नक्कीच फलदायी ठरू शकते. रस्त्याच्या कडेला निरर्थक झाडांची लागवड करून आपण काय साध्य करीत आहोत? पण समजा त्या जागेचा सदुपयोग केला तर प्राण्यांसह मनुष्याला गोड फळे खायला मिळतील. क्रिकेटमध्ये ऑलराऊंडर खेळाडूला प्रथम पसंती असते. अगदी तसेच काळानुसार झाड कुठलेही असो, त्यापासून प्राणवायूसह फळही मिळायला हवे, अशीच सर्वांची अपेक्षा असते. पूर्वी फळ झाडांपासून उत्पादन खूप उशिरा मिळायचे. आता मात्र नवीन जाती झटपट उत्पादन देणाऱ्या आहेत. त्यांचा विचार करून प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आलेली आहे. गावागावांत आमराई बहरल्यास चिमण्यांसह इतरही पक्ष्यांचा किलबिलाट वाढेल. त्यांना अधिक प्रमाणात फळे खायला मिळाल्याने ते शेतातील पिकांवर हल्ले करणार नाहीत. परिणामी पिकांचे आपोआप संरक्षण होईल अन् शेतकरी सुखावतील. वनातही फळझाडांची लागवड वाढल्याने तृणभक्षी जंगलातच पोटभर भोजन करून वाघांना शेतात येण्यापासून परावृत्त करतील. म्हणजेच काय तर मानव-वन्यप्राण्यांचा संघर्ष कमी होईल. वाघांचे हल्ले थांबतील. सरकारलाही नरभक्षी वाघांच्या हल्ल्यात माणूस मेल्यावर २५ लाख रुपये देण्याची गरज भासणार नाही. एकंदरीत पाहता वन आणि मन जपले पाहिजे, ते आरोग्यरक्षक आहे, नाही का?

९८२२४६८६६०

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता-राजविद्याराजगुह्य योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेचा नववा अध्याय राजविद्याराजगुह्य योग म्हणून परिचित आहे. या अध्यायापर्यंत भगवंताच्या बोधसमुद्राला इतकी भरती आली की इथे अर्जुनाने कोणताही प्रश्न केला नाही, शंका विचारली नाही तरीही भगवंताने अर्जुनाला उपदेश स्वतःच सांगायला सुरुवात केली. भगवान ज्या अर्थी स्वतःहून सांगत आहेत म्हणजे ती विद्या महत्त्वाची आणि सर्वश्रेष्ठ असावी. ज्याअर्थी ती सर्वश्रेष्ठ आहे त्या अर्थी ती सर्व विद्यांची राजा ठरते म्हणून ती राजविद्या.

भगवंत आपणहून सांगताहेत म्हणजे ती अमूल्य आहे. ही राजविद्या मूल्यवान आहे. मौल्यवान बाबीचे रक्षण व्हावे म्हणून आपण तिला जपून आणि लपवून ठेवतो. जास्तच मूल्य असेल तर कपाटाच्या गुप्त कप्प्यात ठेवतो. गुप्त कप्प्यालाही अजून एक गुप्त कप्पा असतो. गुप्त म्हणजे गुह्य. गुह्यातही सर्वश्रेष्ठ म्हणजे गुह्यांचा राजा म्हणून राजगुह्य. अशी सर्वश्रेष्ठ विद्या भगवंत आपल्याला कोणालाही माहीत नसलेल्या गुप्त कप्प्यातून बाहेर काढून स्वतःहून आपल्याला देतात. म्हणून या अध्यायाला राजविद्याराजगुह्य योग म्हणतात.

या अध्यायाच्या रूपाने भगवंतकृपेचा वर्षाव स्वतःच भरभरून करतात.

श्रीभगवान उवाच
इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ।
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥

हे असूया नसलेल्या अर्जुना! मी तुला गुह्यतम असे विज्ञानासहित ज्ञान सांगतो ज्यामुळे दुःखाचे मूळ असलेल्या संसारातून तू मुक्त होशील.

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥

हे ज्ञान सर्वविद्यांचा राजा आणि सर्व गुह्यांचाही राजा आहे. असे अत्यंत पवित्र, फलदायी, अविनाशी आणि करण्यासाठी सोपे आहे.

अर्जुना, एक लक्षात ठेव. हे जग, ही चराचर सृष्टी मीच व्यापली आहे. मी त्यांच्यात असलो तरी ते मात्र माझ्यात नाहीत. इथे भगवंताचे विराटत्व लक्षात येईल.

या सृष्टीला उत्पन्न करणारा मीच आहे. ज्याप्रमाणे आकाशात वायू सर्वव्याप्त आणि स्थित आहे त्याचप्रमाणे सर्व भूतमात्र माझ्यात आहेत. कालचक्राप्रमाणे कल्पाचा अंत होताना हे चराचर माझ्यातच विलीन होतात आणि कल्पाचा प्रारंभ झाला की मीच त्यांना पुन्हा निर्माण करतो. पुन्हा पुन्हा निर्माण आणि विलय हे माझेच कर्म आहे. पण ही सर्व कर्मे मला बाधित करीत नाहीत.

सर्व जीव माझ्यातूनच निर्माण झाले म्हणजे ते माझेच अंश आहेत. हे ज्यांना लक्षात येत नाही असे मूढमती याकडे दुर्लक्ष करतात. संसारसागरात, मोहमायेत अडकतात आणि विवेकशून्य बनतात.

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥

पण जे मला जाणतात ते सतत माझे कीर्तन करतात. भक्तीने नमन करतात, उपासना करतात आणि उद्धार करून घेतात.

पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ।
वेद्यं पवित्रमोङ्कार ऋक्साम यजुरेव च ॥

या जगाचा पिता, माता, धाता आणि पितामहही मीच आहे. आदिबीज ओंकार आणि वेदही मीच आहे. सूर्य होऊन प्रकाश देणारा मीच, पर्जन्य वर्षा पाडणारा मीच, अमृतही मीच आणि मृत्यूही मीच.

असे सर्वश्रेष्ठ भगवान किती कृपाळू आहेत.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ अर्जुना, म्हणून जे मनुष्य अनन्यभाव ठेवून मला भजतात, त्यांचा नित्य सांसारिक योगक्षेमही मीच चालवतो.

अशी उपासना करताना भगवंतांना महागड्या वस्तू नकोत .

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥

शुद्धभावाने मला केवळ पत्र, पुष्प, फळ किंवा पाणी अर्पण करतात ते सर्व पण मला निश्चित फलदायी ठरते.

अर्जुना, तू जे कर्म करतो, जे खातो, पितो, तप करतो, दान करतो ती सर्व कर्मे मला अर्पण कर. त्यामुळे तू बंधमुक्त होऊन माझ्याच स्वरूपात प्राप्त होशील. कृष्णार्पण म्हणजे हेच आहे.

भगवान किती समभावाने वागतात हे भगवान स्वतःच सांगतात.

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ मी सर्वांशी समभावाने आहे. मला कोणीही प्रिय अथवा अप्रिय नाही. पण जे मला भक्तिभावाने भजतात ते माझ्यात आणि मी त्यांच्यात आहे.

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥

जर एखादा दुराचारी असेल पण कालांतराने मला भजू लागला तर तो देखील लवकरच धर्मात्मा साधू होऊन मलाच प्राप्त होईल.

अर्जुना! माझ्या भक्तांची काळजी मीच वाहतो.

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥

म्हणून हे अर्जुना, तू माझ्यातच मन ठेवून अनन्यभावाने पूजन आणि नमस्कार कर. मला शरण ये. माझ्याच स्वरूपाला प्राप्त होशील.

थोडक्यात या अध्यायात भगवंत परमेश्वरप्राप्तीसाठी सोप्या साधना सांगतात. कीर्तन, भजन, पूजन, सेवा, अर्चना या साधना केवळ या देहाने केलेल्या क्रिया नसून त्या मनोभावे केल्या तर परमेश्वरप्राप्ती निश्चित आहे. पण त्यासाठी देह आणि मन दोन्हीही एकाग्र हवे.अनन्यभाव ठेवून प्रीतिपूर्वक जे भक्त पत्र, पुष्प, फळ नव्हे केवळ जल समर्पित करून उपासना करतील त्यांच्या संसाराची काळजी भगवंतच करतात. जर एखादा मनुष्य पूर्वायुष्यात पापाचरणी असेलही पण त्याला चूक लक्षात येऊन तो श्रद्धायुक्त अंतःकरणाने उपासना करू लागला तर तो धर्मात्मा बनून मुक्त होऊ शकतो.जीव जरी मर्त्यलोकात जन्म घेत असला तरी त्याने सांसारिक विषय उपभोगात रममान न होता भगवंताच्या उपासनेत रममान व्हावे, आपले जीवन त्यालाच समर्पित करावे. भगवंत आपल्याला सर्व सवलती देतात. माझ्या प्राप्तीसाठी योग, याग नको, जप तप अनुठान नको, खूप पैसा खर्ची नको फक्त अनन्यभक्ती अंतःकरणात ठेवून नित्य आणि सतत भगवंताचे स्मरण केल्यास मोक्षप्राप्ती होईल. देवतांचे पूजन करणारे देवलोकात, पितरांचे पूजन करणारे पितृलोकात, भूतांची पूजा करणारे भूतलोकात जातात आणि जे माझी पूजा करतात ते माझ्या स्वरूपाला प्राप्त होतात असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले. सर्व योगांमध्ये सर्वश्रेष्ठ आणि आजवर कोणालाही ज्ञात नसलेला योग असल्यामुळे हाच राजयोग आणि राजगुह्य योग आहे.

९८२२२६२७३५

## मोदींना शुभेच्छा

भारताचे पंतप्रधान नरेंद्र दामोदरदास मोदी वयाची ७५ वर्षे पूर्ण आणि त्यांची यशस्वी जीवनगाथा. जगाला हेवा वाटावा अशी व्यक्ती आणि तामिळी मासिकाने केलेले त्यांचे २० गुणदर्शन बरेच काही ज्ञान देऊन जाते



जे प्रत्येकाने आत्मसात करणे आवश्यक आहे. स्वच्छ साधा पोशाख, सैनिकी शरीर रचना आणि तगडी चाल, भगव्या पोशाखात संत, युनिफॉर्ममध्ये सैनिक आणि अन्य पोशाखांत राजकुमार, प्रत्येक श्वासात भरलेली देशभक्ती आणि शिस्त, कोणत्याही परदेशी राष्ट्रप्रमुखांमध्ये उठावदार व्यक्तिमत्त्व, निवडणुकांमध्ये दिलेली वचने पाळणारे, कधीही सुटी न घेणारे, कधीही आजारी न पडणारे, मोजकेच बोलणे आणि मोजकेच गप्प राहण्याचा स्वभाव, चेहऱ्यावर कधीच थकलेला भाव नाही, भाषण आणि भाषा यांच्यावर जबरदस्त प्रभाव असणारे, विरोधकांच्या विरोधाला आणि बडबडण्याला बळी न पडणारे, आपल्या कामावर सदैव लक्ष केंद्रित ठेवणारे, शांत आणि परंपरा व सत्यता यांची बाजू असणारे, पूर्ण विश्वासपूर्वक निर्णय घेणारे, हिंदू संस्कृती आणि परंपरा जपणारे, कोणालाही वश करण्याची ताकद डोळ्यांतूनच निभावणारे, चलबिचल, भीती आणि स्वार्थ नसणारे नेतृत्व, ७५व्या वर्षात सुद्धा नवजवानाला लाजविणारी शरीरयष्टी आणि २० तास सातत्याने प्रवास व काम करण्याची क्षमता असणारे मोदीजी नक्कीच अभिमानास्पद नेतृत्व जे जगातल्या कोणत्याही राजनेत्याकडे नसेल. म्हणूनच त्यांना वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा व अभिनंदन.

**अमोल करकरे**

## वाचक पत्रे

### कचरा व्यवस्थापन, समस्या व समाधान

जगाची वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण, प्लॅस्टिकचा अतोनात वापर आणि बदललेली जीवनशैली या सर्वांमुळे कचऱ्याचे प्रमाण खूप वाढले आहे. प्रत्येक देश या समस्येवर उपाययोजना करत आहे. जोपर्यंत नागरिकांचे सहकार्य मिळणार नाही तोपर्यंत कचऱ्याची समस्या, सरकारने कितीही प्रयत्न केले तरी सुटणार नाही. बंगळुरूला काही सोसायट्यांमध्ये झाडांची पाने, फुले गोळा करण्यासाठी बरेच ड्रम स्टॅण्ड लावून फिट केलेले मला दिसून आले. त्या कचऱ्यापासून ते कंपोज्ड खत तयार करतात व नंतर ते खत तिथल्या बगीच्यात वापरतात. नागपुरात मनपातर्फे प्रत्येक घरातून कचरा संकलन करण्यात येते. वेळोवेळी नागरिकांनी ओला कचरा व सुका कचरा वेगळा द्यावा असे मनपा प्रशासनातर्फे आवाहन केले जाते. १-२ दिवस तो नियम पाळला जातो. पण पुन्हा घरातून एकत्रित कचरा दिला जातो. विदेशात नागरिकांना कचऱ्याचे ५ प्रकारे वर्गीकरण करून घराच्या बाहेर ठेवलेल्या ५ कंटेनरमध्ये टाकले जाते. कार्पोरेशनची गाडी येऊन तो कचरा घेऊन जाते. तसे न केल्यास दंड आकारला जातो.

मनपा प्रशासनास विनंती आहे की, लोकांचे अंगवळणी कचऱ्याचे वर्गीकरण करण्याची सवय लागेपर्यंत किमान १-२ महिने आठवड्यातून ४ दिवस फक्त ओला कचरा व ३ दिवस फक्त सुका कचरा संकलनाकरिता वाहने पाठवावी. असे नियोजन केल्यास कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लागेल.

**मोहन पांडे**

### देशप्रेमी नागरिकांनी एकत्र राहावे

या आठवड्याच्या सुरुवातीला नेपाळमध्ये अकस्मात उद्भवलेला जनमानसाचा उद्रेक व हिंसाचार, भारताने दुर्लक्षित करण्यासारखा नाही. ट्रम्पची भारताविषयी नाराजी व 'जगात आपलेच म्हणणे चालले पाहिजे' हा अमेरिकेचा अट्टहास या पृष्ठभूमीवर भारत देशाभोवती होत असलेला, हिंसाचार, देशाने दुर्लक्षित करण्यासारखा नाही. मोदींना नेतेपदापासून ऐनकेन प्रकारेन हटविणे, हे भारतातील घराणेशाहीचा भरणा असलेल्या, विरोधी पक्षांचे एकमेव लक्ष आहे. 'भारतीयत्वाचा गंधही नसलेल्या', सध्याच्या काँग्रेसच्या सर्वेसर्वा असलेल्या सोनिया गांधी, यांचे, आपला पुत्र राहुल गांधी यांना भारताच्या पंतप्रधानपदी आरूढ झाल्याचे पाहण्याचे स्वप्न आहे व त्याकरिता त्या काहीही करायला तयार असतात. नेपाळात आंदोलन व हिंसाचार सुरू झाला, त्यावेळी राहुल गांधी, भारतद्वेष्ट्या जॉर्ज सोरेसचा पुत्र, झाकीर नाईक व भारतात हिंसाचार घडवून आणायच्या इरादा असलेल्या अतिरेक्यांचा म्होरक्या, यांची मलेशियात झालेली गुप्त भेट, हा काही योगायोग नाही.

नेपाळातील आंदोलनात शुक्रवारी भारतीयांची टुरिस्ट बस जाळण्यात आली, याचा उद्देश भारत-नेपाळ यांच्या सलोख्याच्या संबंधात मतभेद व्हावे, हा तर नाही ना? वरील सर्व घटनाक्रम पाहता, भारताचे अंतर्गत व बाहेरील शत्रू एकत्रितपणे भारतात हिंचासार घडवून देशात अशांतता पसरवायचा कट करत आहेत, अशी दाट शंका येते. म्हणून अशा या आणिबाणीच्या घडीला सर्व देशप्रेमी जनतेने एकत्र राहून शत्रूंचे दुष्ट मनसुबे हाणून पाडावे.

**गणेश हजारे**

## थोडक्यात महत्त्वाचे...

### छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावर फर्दापूरजवळ अपघातात महिला ठार

**सोयगाव :** रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास जालना येथून लोखंडी सळई घेऊन जाणारा ट्रक क्रमांक एमएच २१ बीएच ४९१६ हा जळगाव दिशेने जात असताना समोर चालत असलेल्या कार क्रमांक एमएच ०३ एडब्ल्यू २२६१ या कारला या ट्रकने पाठीमागून जोरदार धडक दिली. गाडीतील दोन पुरुष आणि एक महिला दाबले गेले. यात महिलेचा मृत्यू झाला होता. जखमींना सोयगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यात सुहास राजाराम पाटील (वय ६५), चालक योगेश नारायण ओसवाल (वय ४९) मृत महिला मिताली सुहास पाटील (वय ६०) या महिलेला सोयगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यात महिलेचा जागीच मृत्यू झाला. यावेळी छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावर दोन्ही बाजूंनी मोठ्या संख्येने ट्राफिक जाम झाली. ही ट्राफिक दोन तास जाम झाली होती.





### जागतिक ओझोन दिनानिमित्त धरणगाव कॉलेजमध्ये विशेष व्याख्यान

**धरणगाव :** येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे जागतिक ओझोन दिनानिमित्त विशेष व्याख्यान झाले. उपप्राचार्य डॉ. विजयानंद वारडे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. अभिजीत जोशी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना ओझोन थराचे महत्त्व, त्याचे संरक्षण व जागतिक स्तरावरील प्रयत्नांबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. आय.क्यू. ए.सी. समन्वयक प्रा. संदीप पालखे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. गौरव महाजन, गणित विभागप्रमुख प्रा. डॉ. दीपक बोंडे, प्रा. मोहन लहासे, प्रा. सुनील पाटील, प्रा. अतुल पाटील, प्रा. सुलताना पटेल व प्रा. अर्चना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख प्रा. राजू केंद्रे यांनी केले. सूत्रसंचालन दिव्या चौधरी हिने केले, तर आभार प्रज्ञा सोनवणे हिने केले.



### उमेश महाजन यांना समाजरत्न पुरस्कार

**एरंडोल :** येथील आरोग्यसेवक महाराष्ट्रभूषण उमेश महाजन यांनी स्थापन केलेल्या जय बाबाजी फाउंडेशनच्या मदतीने आजपर्यंत कॅन्सरच्या व किडनीच्या अनेक रुग्णांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. उमेश महाजन यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील याच समाजकार्याची दखल घेत क्रांतीसूर्य शेती व शिक्षण संस्थेतर्फे खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांच्या हस्ते उमेश महाजन यांना क्रांतीसूर्य समाजरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. शिर्डी येथे पार पडलेल्या या पुरस्कार सोहळ्यात माजी मंत्री बाळासाहेब थोरात, संस्थेचे अध्यक्ष खंडू सातपुते तसेच सचिव गोरक्ष भवर आदी मान्यवर उपस्थित होते.



### पाचोरा येथे गायत्री परिवारातर्फे भुलाबाई उत्सव

**पाचोरा :** गायत्री परिवारातर्फे भुलाबाई उत्सव साजरा करण्यात आला. आपल्या खानदेशातील पूर्वी लहान मुली घरोघरी गणपती विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशी भुलाबाई बसवत, सायंकाळी एकमेकींच्या घरी जाऊन टीपरी खेळत, त्यावेळी काही 'ऐलमा पैलमा'सारखे लोकगीत म्हणत. आता काळाच्या ओघात हे सर्व मागे पडत चाललय. गायत्री परिवारातर्फे बाल संस्कार वर्ग चालविले जातात. सा.प. शिंदे शाळा ज्ञानप्रबोधिनी संस्कार वर्ग रंगार गल्ली, देशमुख वाडीतील विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. या मुलींसोबत गायत्री परिवाराच्या भगिनी पण सहभागी झाल्या. आपल्या बालपणीच्या आठवणीत रमत त्यांनी खूप खूप आनंद लुटला. आजच्या पिढीला याची ओळख व्हावी, संस्कृती संवर्धनात सहजीवनाचा संस्कार व्हावा या उद्देशातून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. सूत्रसंचालन पूजा सोनार यांनी केले. परीक्षक म्हणून अनघा येवले आणि छाया खंडेलवाल उपस्थित होत्या.

## जे पाणंद रस्ते नकाशावर दाखल नाहीत त्यांचे मॅपिंग करून क्रमांक द्या - आमदार अमोल जावळे

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर (ता. यावल), १६ सप्टेंबर**

'माझ्या मतदारसंघातील एकही नागरिक आयुष्मान भारत कार्डाविना राहू नये, जे पाणंद रस्ते नकाशावर दाखल नाहीत त्यांचे मॅपिंग करून क्रमांक देण्यात यावेत आणि घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून द्यावी. या तिन्ही बाबी मिशन मोडमध्ये पूर्ण व्हाव्यात,' असे स्पष्ट निर्देश आमदार अमोल जावळे यांनी प्रशासनाला दिले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर यानिमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या



संकल्पनेतून राज्यभर सेवा पंधरवडा राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने रावेर तालुक्यातील फैजपूर विभागीय कार्यालयात सोमवारी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते.

**पाणंद रस्त्यांचे मॅपिंग आणि लोकसहभाग**

बैठकीत आमदार जावळे यांनी सांगितले की, जे पाणंद रस्ते नकाशावर दाखल नाहीत त्यांचे मॅपिंग करून क्रमांक देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी शेतशिवार फेऱ्या घेऊन शेतकऱ्यांना सहभागी करणे आवश्यक आहे.

घरकुल लाभार्थी आणि आयुष्मान कार्ड मोहिमेला गती, घरकुल योजनेत ज्यांना मंजुरी मिळाली आहे, त्यांना घरासाठी योग्य जागा उपलब्ध करून द्यावी, असा आग्रह आमदारांनी व्यक्त केला. तसेच आरोग्याच्या दृष्टीने एकही नागरिक वंचित राहू नये म्हणून येत्या १५ दिवसांत मिशन मोडमध्ये आयुष्मान भारत कार्ड वितरण करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या बैठकीस उपविभागीय अधिकारी बबनराव काकडे, यावल तहसीलदार मोहनमाला नाझीरकर, रावेर तहसीलदार बंडू कापसे, रावेर गटविकास अधिकारी विनोद मेढे, यावल गटविकास अधिकारी मंजुश्री बोरसे तसेच दोन्ही तालुक्यांचे नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी उपस्थित होते.

बैठकी दरम्यान आ.अमोल जावळे यांनी बाल संगोपन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे विशेष कौतुक केले. रावेर मतदारसंघातील सर्वाधिक प्रकरणे मंजूर झाल्याबद्दल त्यांनी विभागाचे अभिनंदन केले.



## सोयगाव अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्था बिनविरोध निवड

**सोयगाव :** येथील श्री. अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अध्याशी अधिकारी तथा सिल्लोडचे सहाय्यक निबंधक व्ही. यु. लकवाल, सोयगावचे सहकार अधिकारी विलास घुगे व दिलीप रावणे यांच्या नियंत्रणात ही निवड करण्यात आली. यावेळी विठ्ठल राठोड यांची चेअरमनपदी, तर दुर्गादास बलांडे तालुकाध्यक्ष प्राथमिक शिक्षक संघ तालुका सोयगाव यांची पतसंस्थेच्या व्हाईस चेअरमनपदी निवड करण्यात आली व संदीप चौधरी यांची मानद सचिवपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

या निवडीप्रसंगी प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी तसेच सहकार पॅनलचे पॅनलप्रमुख दिवाकर चोपडे, अनिल निकम, भास्कर चौधरी, राजेश जंजाळ, गोपाल चौधरी, जनार्धन साबळे, संजय चौधरी, रवींद्र साळुंके यांची प्रमुख उपस्थिती होती. सहकार पॅनलचे संचालक कृष्णा पाटील, संतोष वाघ, पंकज रगडे, शकूर शेख, संदीप सोनवणे, रघुनाथ काटोले तसेच संस्थेचे कर्मचारी प्रमोद जाधव, रमेश वामने उपस्थित होते. भास्कर चौधरी व दिवाकर चोपडे पतसंस्थेचे माजी संचालक, चेअरमन यांनी चेअरमन,व्हॉइस चेअरमन व मानद सचिव यांच्या निवडीबद्दल अभिनंदन करून सभासद व पतसंस्था हितासाठी काम करण्यास शुभेच्छा दिल्या.



## लेवा गौरव सोहळा समाजातील गुणवंतांना गौरवणारा प्रेरणादायी उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर (ता. यावल), १६ सप्टेंबर**

लेवा युथ फोरम व लेवा शुभमंगल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लेवा गौरव सोहळा-२०२५ हा प्रेरणादायी व भव्य सोहळा फैजपूर येथील जे. टी. महाजन अभियांत्रिकी महाविद्यालयात उत्साहात आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडवत संपन्न झाला.

**विद्यार्थ्यांचा गौरव समाजाचा अभिमान**

या सोहळ्यात समाजातील १५० गुणवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रात विशेष प्रावीण्य मिळवलेल्या ४० समाजबांधवांचा सन्मान करण्यात आला. शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा व इतर कौशल्यांमध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे व पारितोषिके प्रदान करण्यात आली. या सन्मानाने केवळ व्यक्ती नव्हे तर संपूर्ण लेवा समाजाची शैक्षणिक प्रगती अधोरेखित झाली.

या गुणगौरव पुरस्कार सोहळ्यास आमदार अमोल हरिभाऊ जावळे, जेटीएमचे संस्थाध्यक्ष शरद महाजन, गोदावरी फाऊंडेशनच्या डॉ. केतकी पाटील, व. पू. होले, हर्षल भंगाळे, हर्षल जावळे, पांडुरंग सराफ, उद्योजक मनोज पाटील उल्हास निंबा चौधरी, विजय झोपे, शशिकांत चौधरी, नितीन चौधरी, के.जी. पाटील, डॉ. जी. ई. चौधरी, अनिल लढे, सिद्धेश्वर वाघुळदे, शुभम महाजन यांची प्रेरणादायी उपस्थिती लाभली. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना ज्ञान, प्रामाणिक परिश्रम आणि समाजसेवा या मूल्यांच्या आधारे उज्ज्वल भवितव्य घडविण्याचा संदेश दिला. या कार्यक्रमास ४५० हून अधिक समाज बांधवांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी लेवा युथ फोरम व लेवा शुभमंगल टीमने संघटित प्रयत्न केले. त्यात चेतना जावळे, किरण राणे, अतुल महाजन, हितेश भोळे, पूनम चौधरी, कीर्ती बोरोले, लाजरी भोळे, नम्रता राणे, रोशनी वाणी, चेतन महाजन, कुशल खडसे, संजय नेमाडे, धीरज बोरोले, मृणाल चौधरी व मोहन चौधरी यांनी सेवाभावाने व परिश्रमपूर्वक योगदान दिले. त्यांचे हे योगदान समाजातील एकता, बांधिलकी व प्रेरणादायी कार्यसंस्कृतीचे प्रतीक ठरले. सूत्रसंचालन तेजस चौधरी यांनी केले.

कार्यक्रमासाठी संपूर्ण जे. टी. महाजन महाविद्यालय सहकारी टीम, फैजपूर व नरेंद्र नारखेडे, मनोज पाटील, सिद्धेश्वर वाघुळदे यांचे सहकार्य लाभले, ज्यामुळे हा उपक्रम अधिक सुयोग्य व संस्मरणीय ठरला.

## स्पर्धा परीक्षेतील यशासाठी व्यक्तिमत्व विकास, वाचन, सातत्य व कठोर परिश्रम आवश्यक -नारायण पाटील

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, १६ सप्टेंबर**



येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय व द युनिक अकॅडमी, पुणे यांच्यातर्फे पदवी काळात यूपीएसी/एमपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी? या विषयावर आधारित मार्गदर्शनपर व्याख्यान घेण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे होते. मार्गदर्शक व युनिक अकॅडमीचे नारायण पाटील, नरेंद्र पाटील, उपप्राचार्य प्रा. ए. बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ. एस. ए. वाघ, एम. टी. शिंदे, स्पर्धा परीक्षा समन्वयक डॉ. आर. आर. पाटील, करिअर कट्टाचे समन्वयक वाय. एन. पाटील, डॉ. के. एस. क्षीरसागर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक डॉ. आर. आर. पाटील यांनी केले. मनोगत व्यक्त करतांना समन्वयक डॉ. एस. ए. वाघ यांनी स्पर्धा परीक्षेसाठी सकारात्मक मानसिकता व सखोल अभ्यास व विचारांची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांनी स्वतःतील क्षमता ओळखून वेळ, श्रम व कठोर परिश्रमाची गरज असल्याचे सांगितले. यावेळी पदवी काळात युपीएससी/यूपीएससी स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी? या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की, स्पर्धा परीक्षेसाठी लेखन सराव करावा. संकल्पना स्पष्ट समजून घेणे गरजेचे आहे. सोशल मीडियापासून दूर रहावे. चौकस बुद्धिमत्ता हवी. मोठी स्वप्न बघून त्या दिशेने यशस्वी मार्गक्रमण करावे. व्यक्तिमत्व विकास साधावा.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. सोनवणे मार्गदर्शन करताना म्हणाले की, स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी अभ्यासक्रमाची ओळख करून घ्यावी. मराठी व्याकरण संकल्पना समजून घ्याव्यात. सखोल अभ्यास, अद्ययावत ज्ञान, तर्कबुद्धी यांची आवश्यकता असते. निबंध लेखन, सारांश लेखन, उतारा आकलन, अनुवाद यांचा सराव करावा. डॉ. मुकेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. वाय. एन. पाटील यांनी आभार मानले.

## अमर संस्था आयोजित जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत स्वरा पाटील प्रथम

**चोपडा :** सुशीला गुलाबराव पाटील यांच्या स्मृती दिनानिमित्त अमर संस्थेने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित केलेली होती. बक्षीस समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विकास हरताळकर तर प्रमुख पाहुणे चोपडा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कविता सुर्वे उपस्थित होत्या.

प्रथम गटात प्रथम क्रमांक स्वरा महेंद्र पाटील (प्रताप विद्यामंदिर, चोपडा) रोख ३००१ रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक भार्गवी चंद्रशेखर पाटील (पंकज प्राथमिक विद्यालय, चोपडा) रोख २००१, रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक सानवी पंकज गडे (बालसंस्कार विद्यामंदिर, यावल) रोख १००१ रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ राजवीर गजानन कदम (पंकज प्राथमिक विद्यालय, चोपडा) २०१ रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ कनुश्री चंद्रकांत पाटील (बालमोहन विद्यालय, चोपडा) रोख २०१ रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र.

द्वितीय गटात प्रथम क्रमांक मयुरेश महेंद्र धनगर (थेपडे माध्यमिक विद्यालय, म्हसावद) रोख ३००१ रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक स्पर्श डिगंबर पाटील (प्रताप विद्यामंदिर, चोपडा) रोख २००१, रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक प्रितम गणेश नागरे (प्रताप विद्यामंदिर, चोपडा ) १००१ रुपये स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ प्रितम सुपडू पाटील (स्वामी समर्थ माध्यमिक विद्यालय, जळगाव) रोख २०१ रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तेजनार्थ श्रावणी सतीश पाटील (विवेकानंद माध्यमिक विद्यालय, चोपडा) रोख २०१ रुपये, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सर्व विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. स्पर्धेसाठी बक्षीसे अमर संस्थेचे संचालक विजय गुलाबराव पाटील यांच्याकडून देण्यात आली.

कार्यक्रमास अमर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष मनोज चित्रकथी, सचिव दीपक जोशी, परीक्षक विलास पाटील, डी. आर. जगताप, प्रशांत सोनवणे, सुजय धनगर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक समितीप्रमुख एम. आर. सोनवणे, सूत्रसंचालन रोहिणी कापडणे तर आभार रेखा नेवे यांनी मांडले.





## नाहाटा महाविद्यालयात हिंदी सप्ताह

**भुसावळ :** येथील भुसावळ कला, विज्ञान आणि पु. ओं. नाहाटा वाणिज्य महाविद्यालयातील हिंदी विभागातर्फे हिंदी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदी सप्ताहाचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. डी.एन. पाटील यांनी केले. प्रास्ताविक हिंदी विभागाचे प्रा. डॉ. मनोज पाटील यांनी केले. हिंदी सप्ताह अंतर्गत कथोपकथन, काव्यवाचन, निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन आदी कार्यक्रम घेण्याबाबत माहिती दिली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. राजेंद्र तायडे यांनी केले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

## विश्वकर्मा प्रकट दिनानिमित्त आज धार्मिक कार्यक्रम

**फैजपूर (ता. यावल) :** विश्वकर्मा प्रकट दिनानिमित्त इंदिरा एकादशी बुधवार (१७ सप्टेंबर) रोजी धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत. विश्वकर्मा पांचाळ सुतार संस्था आळंदी देवाची संत जळोजी-संत मळोजी महाराज सह संत शिरोमणी भोजलिंग काका दिंडी क्र. ८३ येथे करण्यात आले आहेत. सकाळी ८ वाजता प्रभू श्री विश्वकर्मा अभिषेक सर्व विश्वस्तांच्या हस्ते, सकाळी १० ते १२ हरिकीर्तन हभप दिलीप महाराज ठाकरे, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ हरी कीर्तन हभप पोपट महाराज खंडागळे, रात्री ९ ते १० फराळ, रात्री १० नंतर हरिजागर समाज बांधवांकडून होईल. गुरुवार (१८ सप्टेंबर) द्वादशीनिमित्त पहाटे ४ ते ७ काकडा आरती, ५ ते ६ महापुजा, अभिषेक, सकाळी ७ वा महाप्रसादाने बारस सोडण्यात येईल.

## लोकप्रिय आंतरराष्ट्रीय नेते नरेंद्र मोदी



**अभीष्टचिंतन**

ओळीने तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी आरूढ झालेल्या मोदींना निवडणुकीत हरवणे शक्य होत नाही यावर शिक्कामोर्तब झाल्यावर पंचाहत्तरीनंतर सक्रिय राजकारणातून निवृत्त होऊन मार्गदर्शक मंडळात पाठवण्याच्या स्वतःच सुरू केलेल्या पद्धतीनुसार मोदी पंतप्रधान पदावरून पायउतार होतील म्हणून विरोधक देव पाण्यात घालून बसले होते. तशातच गेल्या जुलै महिन्यात संघ प्रचारक मोरोपंत पिंगळे यांच्यावरील एका पुस्तक प्रकाशनाच्या वेळी बोलताना 'पंचाहत्तरीची शाल अंगावर पडल्यावर माणसाने निवृत्ती स्वीकारली पाहिजे,' असे मोरोपंत विनोदाने म्हणाले होते. याचा उल्लेख सरसंघचालक मोहनजी भागवतांनी केल्याने देव पावण्याची खात्रीच विरोधकांना झाली होती.

खरे तर ७५ हे वय म्हणजे थकलेले शरीर, कुठलीतरी व्याधी, त्यावरची औषधे आणि परावलंबी जीवनाची सुरुवात झालेली. पण आजच्या ७५ व्या वाढदिवशीही न थकता १६ तास काम करणारे मोदीजी याला अपवाद आहेत आणि म्हणूनच केवळ वय झाले म्हणून त्यांनी निवृत्त व्हावे हे देशहिताचे नक्कीच नाही. मोदींचे आरोग्य आणि कार्यक्षमता बघता सनातनी पिंड असलेल्या मोदींना शुभेच्छा देण्यासाठीच शुक्लयजुर्वेद संहितेतील खाली दिलेला श्लोक रचला आहे की काय आहे असे वाटते.

पश्येम शरदः शतम्| जीवेम शरदः शतम्| श्रुणुयाम शरदः शतम्| प्रब्रवाम शरदः शतम्| अदीनाः स्याम शरदः शतम्| भूयश्च शरदः शतात्||

पूर्ण अर्थ खालीलप्रमाणे आहे.

पश्येम शरदः शतम् (पश्येम शतं शरदः):
शंभर वर्षांपर्यंत डोळ्यांची दृष्टी चांगली राहो.

जीवेम शरदः शतम् (जीवेम शतं शरदः)
शंभर वर्षांपर्यंत (आपण) जीवन जगावे.

श्रुणुयाम शरदः शतम् (श्रुणुयाम शतं शरदः)
शंभर वर्षांपर्यंत (आपली) ऐकण्याची क्षमता टिकून राहो.

प्रब्रवाम शरदः शतम् (प्रब्रवाम शतं शरदः)
शंभर वर्षांपर्यंत (आपली) बोलण्याची क्षमता टिकून राहो.

अदीनाः स्याम शरदः शतम् (अदीनाः स्याम शतं शरदः)
शंभर वर्षांपर्यंत आपण दीन न राहता, कोणावरही अवलंबून न राहता जगावे. भूयश्च शरदः शतात् (भूयः च शतं शरदः) (आणि) हे सर्व कल्याणमय गुण शंभर वर्षांनंतरही (आपल्यात) टिकून राहोत आणि वाढोत.

राजकीय पक्ष सत्ताधाऱ्यांवर टीका करतात, विरोध करतात हे खरे तर लोकशाही जिवंत असल्याचे लक्षण. पण मोदींवर ज्या खालच्या पातळीवर जाऊन टीका केली जाते तेवढी मात्र कुठल्याही राजकीय नेत्यावर झाली नसेल. मोदींचे सगळे बरोबर, ते चुकू शकत नाहीत, असे म्हणणे जसे चुकीचे आहे. तसेच त्यांना तानाशहा, चोर, भ्रष्टाचारी म्हणणे, एवढेच नव्हे तर राजकारणाशी काहीही संबंध नसलेल्या आणि आता हयात नसलेल्या त्यांच्या आईवर अश्लाघ्य भाषेत टीका करणे हेही निषेधार्ह आहे. यावर विरोधक नेहेरूंना जाऊन एवढी वर्ष झाली तरी मोदी त्यांच्यावर टीका करतात, त्याचं काय? असे विचारतात. पण नेहरू हे राजकीय नेते होते, पंतप्रधान होते, त्यांच्या फक्त चुकीच्या धोरणांवर मोदी टीका करतात, हे मात्र सोयीस्कररित्या ते विसरतात. तरीही मोदी राजकीय नेते असल्याने भाजपने त्यांच्यावरील टीका स्वीकारायला हवी.

मोदींनी केलेल्या देशोपयोगी कार्याचे, निर्णयांचे आणि त्यांनी केलेल्या विक्रमांचे आजच्या त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्मरण करणे उद्बोधक ठरेल.

गेल्या ११ वर्षांच्या काळात नरेंद्र मोदी यांना आतापर्यंत २७ देशांकडून आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून, याद्वारे ते लोकप्रिय आंतरराष्ट्रीय नेते असल्याचे अधोरेखित झाले आहे. विशेष म्हणजे या २७ पुरस्कारांमध्ये ८ सर्वोच्च पुरस्कार मुस्लिम राष्ट्रांकडून देण्यात आले आहेत.

इंदिरा गांधी यांनी २४ जानेवारी १९६६ ते २४ मार्च १९७७ असे सलग ४,०७७ दिवस भारताच्या पंतप्रधान म्हणून कारभार पाहिला होता. तर मोदीजी २६ मे २०१४ पासून या पदावर असुज २५ जुलै २०२५ रोजी त्यांनी पंतप्रधान म्हणून ४,०७८ दिवस पूर्ण करत इंदिरा गांधी यांना मागे टाकले आहे. तसेच मोदी यांनी राज्य व केंद्रातील कारभार मिळून २४ वर्षांहून अधिक काळ सरकारचं नेतृत्व करताना एकही सुट्टी घेतली नाही, हा तर जागतिक विक्रम ठरावा. सलग सर्वाधिक काळ भारताचं पंतप्रधानपद भूषवण्याच्या बाबतीत भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू आघाडीवर आहेत. त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ ते २७ मे १९६४ पर्यंत सलग ६,१२६ दिवस भारताचे नेतृत्त्व केले आहे. मोदी यांना नेहरुंचा हा विक्रम मोडण्यासाठी त्यांच्याच नेतृत्वाखाली भाजपला पुढची म्हणजेच २०२९ ची लोकसभा निवडणूकदेखील जिंकावी लागेल.

नरेंद्र मोदी सत्तेवर येण्यापूर्वी जागतिक स्तरावर भारताची अर्थव्यवस्था अकराव्या क्रमांकावर होती. आत्ता नुकतेच जपानला मागे टाकून भारत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था झाली असून, या ११ वर्षांच्या काळात देशाने मोठी आर्थिक भरारी घेतल्याचा हा सज्जड पुरावा आहे. मोदींनी केलेल्या कामांची सविस्तर चर्चा करायची म्हटल्यास एखाद्या लेखात ते शक्य नाही, तर त्यासाठी एक ग्रंथ लिहावा लागेल.

त्यांच्या नेतृत्वाखाली देशाला स्वच्छतेची सवय लावणाऱ्या २ ऑक्टोबर २०१४ रोजी सुरू केलेली भारत स्वच्छता मोहिमेपासून ते ऑपरेशन सिंदूरने सिद्ध केलेल्या संरक्षण क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनविण्यापर्यंतच्या अनेक घटनांचे केवळ नामनिर्देशन केले तरी किती प्रचंड काम झाले आहे हे आपल्या ध्यानात येते.

मोदी सरकारने घेतलेले दूरगामी परिणाम करणारे निर्णय

**अ) धोरणात्मक निर्णय :** ३७० कलम हटवणे, जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करणे, तीन तलाक बंदी आणि सीएए कायदा, जी-२०चे अध्यक्षपद भूषविले, महिला आरक्षण विधेयक पारित करणे,एक देश,एक निवडणूक कायद्याच्या अंमलबजावणीतील झालेली प्रगती आणि सगळ्यात महत्त्वाचे आयोध्येत कायदेशीर मार्गाने भव्य राम मंदिराची उभारणी

अर्थव्यवस्था आणि विविध योजना : जनधन योजना, जीएसटी,पंतप्रधान किसान आणि आवास योजना उज्ज्वला गॅस योजना, आयुष्यमान भारत योजना

**सुरक्षा व संरक्षण :** सर्जिकल स्ट्राईक (२०१६), एअर स्ट्राईक (२०१९), ऑपरेशन सिंदूर (२०२५), संरक्षण साहित्याच्या निर्मितीत सुमारे ८० टक्क्यांपर्यंत आत्मनिर्भरता, वन रँक वन पेन्शनची अंमलबजावणी मूलभूत सुविधा व तंत्रज्ञान : डिजिटल इंडिया व मेक इन इंडिया, बुलेट ट्रेन प्रकल्प पूर्णत्वाकडे, आत्मनिर्भर भारत मोहिम, यूपीआय आधार लिंकिंग, स्कील इंडिया, स्टार्टअप इंडिया, अमृत भारत योजना, उडान योजना,वंदे भारत ट्रेन्स, सेमिकंडक्टर निर्माणाचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार, यशस्वी चांद्रयान मोहीम स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापूर्वी म्हणजेच २०४७ पूर्वी भारताला प्रगत राष्ट्र बनविण्याचे महत्वाकांक्षी स्वप्न मोदीजी पहात आहेत. त्यासाठी अहोरात्र मेहेनत करीत आहेत. त्यासाठी २०२९ नंतरची टर्मही पंतप्रधान म्हणून मोदींना स्वीकारावीच लागेल. जनतेचा त्यांच्यावर सध्या असलेला विश्वास, प्रेम आणि त्यांचे असलेले उत्तम आरोग्य मोदीजी कमीतकमी आणखी एक टर्म पंतप्रधानपदी असतील याबद्दल मला तरी शंका वाटत नाही. २०४७ मधील विकसित भारत बघण्यासाठी मोदींना शतायुषी मात्र व्हावेच लागेल. कारण आज पंचाहत्तरी पूर्ण करीत असलेले मोदी २०४७ मध्ये ९७ वर्षांचे असतील.

**विलास पंढरी - ९८६०६१३८७२**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### डॉ. विभुती गावित यांच्या वाढदिवसानिमित्त पथराई येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर

**नंदुरबार** : तालुक्यातील पथराई येथे दामजी पोसला गावित आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयात संचालिका डॉ. विभुती गावित यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक जाणिवेतून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत डोळे तपासणी शिबिर पार पडले. या शिबिरात विद्यार्थ्यांसह महाविद्यालयीन कर्मचारी व स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवून आपल्या डोळ्यांची विनामूल्य तपासणी करून घेतली. या उपक्रमामुळे डोळ्यांचे आरोग्य व तपासणीबद्दल जनजागृती झाली. शिबिरात उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांनी नेत्र परीक्षेसोबतच आवश्यक मार्गदर्शन, आजारांचे निदान आणि उपचार सूचना दिल्या. शिबिरास नेत्रविकार विषयातील कांतलक्ष्मी शाह नेत्र रुग्णालय, नंदुरबार यांनी सहकार्य केले व प्रमुख नेत्रतज्ज्ञ म्हणून डॉ. अभिजीत खेडकर उपस्थित होते. महाविद्यालयाच्या सर्व अध्यापकवर्ग व विद्यार्थांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.



### नवसंशोधक शेतकरी परिषदेत नवकल्पनांचा गौरव

**नंदुरबार** : राष्ट्रीय अभियंता दिवसानिमित्त डॉ. हेडगेवार सेवा समितीचे कृषी विज्ञान केंद्र, कोळदा येथे नवसंशोधक शेतकरी परिषद नुकतीच झाली. या वेळी बामखेडा त. त. (ता. शहादा) येथील ग्रामविकास संस्था संचलित कला व विज्ञान महाविद्यालयातील डॉ. सी. एस. करंके यांनी डास प्रतिबंधक तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर केले. तसेच त्वचा विकारांवर उपयोगी घरगुती उपाय योजनांची माहिती दिली. त्यांना क.ब.चौ उ.म.वि. तील जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. डॉ. भूषण चौधरी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात अन्य शेतकरी संशोधकांचाही सन्मान झाला. हेडगेवार सेवा समितीचे सदस्य जगदीश पटेल, सुरेश पाटील, कृषी शास्त्रज्ञ जयंत उत्तरवार, केव्हीके संचालक राजेंद्र दहातोंडे व पारंपरिक बियाण्यांचे संशोधक प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



### तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल अक्कलकुवा विद्यार्थ्यांची नेत्रदीपक कामगिरी

**अक्कलकुवा** : तालुकास्तरीय विविध मैदानी क्रीडा स्पर्धा खापर येथील वाय. आर. इंग्लिश मीडियम स्कूल येथे पार पडल्या. त्यात विविध क्रीडा स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूल व ज्यु कॉलेज अक्कलकुवा येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. यात गोळा फेक स्पर्धेत सुमित राठोड याने तर मुलींच्या गोळा फेक स्पर्धेत शुभांगी वळवी, उर्मिला पाडवी या प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांची होणाऱ्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत निवड करण्यात आली. तसेच १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत लक्ष्मण पाडवी द्वितीय क्रमांक तसेच १७ वर्ष वयोगटातील खो खो संघ देखील जिल्हाक्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. सर्व विद्यार्थी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होणार आहेत. त्यांना क्रीडा शिक्षक संजय पाडवी, श्रीमती चित्रा नवेज, तुकाराम क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले यशस्वी क्रीडापटूंचे पी. ई. सोसायटी तळोदेचे चेअरमन लक्ष्मण माळी, संचालक मंडळ, प्राचार्य भटू पवार, उपप्राचार्य राजेश वळवी, उपमुख्याध्यापक मनोज इंगळे, पर्यवेक्षक मनोज मगरे आदींनी शुभेच्छा दिल्यात.



# कांदा-भाकर खाऊन शेतकऱ्यांचे साक्री तहसीलसमोर ठिय्या आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**पिंपळनेर, १६ सप्टेंबर**

महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्यावतीने साक्री तहसील कार्यालयासमोर सरकारने कांदा दरवाढ करावी यासाठी मंगळवारी कांदा-भाकर खाऊन ठिय्या आंदोलन करण्यात आले.

तत्पूर्वी शासकीय विश्रामगृह येथे सर्व शेतकरी एकवटले होते. त्यानंतर सर्व शेतकरी बंधू-बगिनी साक्री तहसील कार्यालयात दाखल झाले. शेतकऱ्यांच्या हातात कांद्याने भरलेली डालकी तर गळ्यात घातलेल्या कांद्याच्या माळा सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. या आंदोलनाला विविध संघटनांनी पाठिंबाही दिला. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्यावतीने तहसीलदार साहेबराव सोनवणे यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या राज्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या कांद्याचे बाजारभाव अतिशय घसरलेले असून शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघत नाही. खते, औषधे, बियाणे, मजुरी, वाहतूक इत्यादी सर्व बाबींवर प्रचंड खर्च करून देखील कांद्याचे दर अत्यंत कमी असल्यामुळे शेतकरी वर्गावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. यामुळे सर्व शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी असून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक असून कांद्याचे भाव वाढीसाठी सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा. नाफेड व एनसीसीएफचा कांदा बाजारात किंवा अनेक शहरांमध्ये विक्रीसाठी आणू नये. शेतकऱ्यांच्या झालेल्या मागच्या दिवसांच्या तोट्याची आर्थिक भरपाई म्हणून १५०० रूपये प्रतिक्विंटल अनुदान जाहिर करावे. राज्याने केंद्राला सांगून बांग्लादेश व इतर देशांसोबत चर्चा करून निर्यात सुरळीत करावी.अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, मागण्या मान्य न झाल्यास महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या वतीने अंदोलनाचा मार्ग अवलंबण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. निवेदन देताना धुळे जिल्हाध्यक्ष संजय भदाणे, धुळे जिल्हा युवक अध्यक्ष गंगाधर शिंदे, धुळे जिल्हा महिला अध्यक्ष सुरेखा पाटील, जिल्हा संपर्कप्रमुख युवराज काकुस्ते, अनिल भामरे, साक्री तालुकाध्यक्ष संजय बच्छाव, उपाध्यक्ष अविनाश खैरनार, एन. झेड. देवरे, धनंजय देसले, शरद खैरनार, महेश देसले, नितीन खैरनार यासह पुष्पा घरटे, लताबाई बोरसे, सरलाबाई अहिरराव, सुवर्णा बोरसे, सुरेखा बोरसे, मंगल अहिरराव, ललिता अहिरराव, सीमाबाई अहिरराव, मीनाबाई अहिरराव, शैला अहिरराव आदी महिला व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संसदीय अन् कायदेविषयक समित्यांची तिरुपती येथे पहिली राष्ट्रीय परिषद

### माजी खासदार डॉ. हिना गावित यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १६ सप्टेंबर**

तिरुपती (आंध्र प्रदेश) येथे संसदीय आणि कायदेविषयक समित्यांची पहिली राष्ट्रीय परिषद घेण्यात येत आहे. या परिषदेस महिला सक्षमीकरण राष्ट्रीय समितीच्या माजी अध्यक्षा म्हणून माजी खासदार डॉ. हिना गावित निमंत्रित असून राष्ट्रीय परिषदेस उपस्थित होत्या.

लोकसभा व संघराज्य क्षेत्रातील महिला सक्षमीकरणावरील संसदीय आणि कायदेविषयक समित्यांची पहिली दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद १४ व १५ सप्टेंबर रोजी तिरुपती, आंध्रप्रदेश येथे पार पडली. या राष्ट्रीय परिषदेस महिला सक्षमीकरण समितीच्या माजी अध्यक्षा म्हणून संसद रत्न माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेतला. राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याशी डॉ. हिना गावित यांनी या परिषदेसाठी 'महिलांचे सक्षमीकरण व महिला सबलीकरण' या विषयावर चर्चा केली. खा. सुनेत्रा पवार, खा. स्मिता वाघ, गुजरात जामनगरच्या आमदार रिवाबा जडेजा यांच्या समवेत संवाद साधला. समिती सदस्या आमदार सीमा हिरे, सरोज अहिरे, संजना जाधव, प्रज्ञा सातव तसेच महाराष्ट्र विधिमंडळाच्या सचिव मेघना तळेकर व अप्पर सचिव प्राजक्ता कुळकर्णी आदी उपस्थित होत्या.



## आमदारांना शिवीगाळ करणाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा!

### बिरसा क्रांती दलातर्फे मुख्यमंत्र्यांना निवेदनाव्दारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १६ सप्टेंबर**

एका माथेफिरुने व्हिडिओच्या माध्यमातून आमदार आमश्या पाडवी यांचा एकेरी उल्लेख करीत शिवराळ भाषेत शिवीगाळ केली. त्याच्यावर ऍट्रासिटीचा गुन्ह्यासह फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, अन्यथा आदिवासी समाज रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन करेल, अशा आशयाच्या मागणीचे निवेदन बिरसा क्रांती दलातर्फे राज्याचे मुख्यमंत्र्यांचे प्रतिनिधी जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

राज्यातील धनगर व बंजारा समाजाला आदिवासी समाजात आरक्षणाची मागणी केली जात आहे. यानुषंगाने जिल्ह्यातील पत्रकारांनी आमदार आमश्या पाडवी यांना आरक्षणाबाबत भुमिका स्पष्ट करावी असे मांडले, असता सरकारने आदिवासी समाजात इतर समाजाला आरक्षण देऊ नये व दिल्यास सरकार मधुन बाहेर पडेल, असे निवेदन आमदार यांनी केले.

याचा राग, द्वेषारोपातून घनश्याम बापू नामक माथेफिरुने व्हिडिओच्या माध्यमातून आमदार आमश्या पाडवी यांचा एकेरी उल्लेख केला आहे. आदिवासी समाज बांधव या माथेफिरुचा जाहीर निषेध करीत आहेत. सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्या प्रवृत्ती वा व्यक्तीवर ऍट्रासिटीसह फौजदारी गुन्हा दाखल करावा. अन्यथा आदिवासी समाज रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन करेल, असे निवेदनात म्हटले आहे.

## अभियांत्रिकी हे सामाजिक जबाबदारीचे क्षेत्र - मनोहर भदाणे

### गंगामाई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगसह पॉलिटेक्निकमध्ये अभियंता दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १६ सप्टेंबर**

अभियांत्रिकी हे केवळ व्यावसायिकच क्षेत्र नाही. सामाजिक जबाबदारी असलेले आव्हानात्मक क्षेत्र आहे. विद्यार्थ्यांनी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. आपल्या अंगीभूत गुणवत्ता आणि कौशल्य दाखवावे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी योगदान द्यावे. गुणवत्तेचे जोरावर मोठे होऊन नाव कमविण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा संस्थेचे सचिव मनोहर भदाणे यांनी केले.

नगाव येथे भारतरत्न अभियंता मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची जयंती आणि अभियंता दिनानिमित्त नगाव एज्युकेशन सोसायटीच्या गंगामाई कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व पॉलिटेक्निकमध्ये अभियंता दिनी कार्यक्रमप्रसंगी माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. शैलेंद्र डी. दुबे, अनिल पवार, कार्यकारी अभियंता रवींद्र पाटील, गंगामाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सिनेट सदस्य डॉ. एस. आर. पाटील, गंगामाई तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. सारंग पाटील, प्रा. नरेंद्र बोरसे व उपप्राचार्य डॉ. जी. एम. पोद्दार होते.

माजी अध्यक्ष भदाणे, अनिल पवार, रवींद्र पाटील, प्राचार्य डॉ. शैलेंद्र डी. दुबे यांनीही मार्गदर्शन केले.

यावेळी प्रा. एन. डी. खैरनार, अधिष्ठाता प्रा. हर्षल देवरे, विभाग प्रमुख प्रा. नरेंद्र बोरसे, प्रा. आर. ओ. शेख, प्रा. डॉ. के. एम. जोशी, प्रा. डॉ. राहुल पाटील, प्रा. डॉ. विनोदकुमार पाटील, ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर प्रा. हर्षल देशमुख, प्रा. दीपक पाटील, कार्यालय अधीक्षक बी. एन. पाटील आदी उपस्थित होते. प्रा. जे. पी. भदाणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक प्रा. प्रशांत बडगुजर यांनी केले. प्रा. नरेंद्र बोरसे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. एस. व्ही. भंडारी, प्रा. स्नेहा पवार व प्रा. ममता अहिरराव व सर्व कर्मचारीवर्ग यांनी परिश्रम घेतले.

## नंदुरबार इंजिनियर्स असोसिएशनतर्फे अभियंता दिन



**नंदुरबार** : मोबाईल, टीव्ही, संगणक अशी मनोरंजनाची अनेक भौतिक साधने आहेत. मात्र मानव सुखी समाधानी नाही. भावी पिढीला मोबाईल ऐवजी पुस्तक देणे गरजेचे आहे. संकटाला घाबरू नका. सकारात्मकता ठेवा, दुःख पचवण्याची शक्ती ठेवल्यास मिळणारा आनंद काही औरच असतो. मोबाईलच्या मोह जाळातून बाहेर पडावे. पुस्तके वाचल्यास नवनविन कल्पना सुचतील, मोबाईलच्या दुनियेत पिढी हरवून चालल्याची खंत अहिल्यानगर येथील डॉ. संजय कळमकर यांनी व्यक्त केली.

येथील बाबा रिसॉर्टच्या सभागृहात नंदुरबार जिल्हा इंजिनियर्सतर्फे भारतरत्न सर मोश्वगुंडम विश्वेश्वरय्या जयंती आणि अभियंता दिना निमित्त चर्चासत्र झाले. 'जगण्यातील आनंदाच्या वाटा' या विषयावर डॉ. संजय कळमकर यांनी विविध उदाहरणांसह उपस्थितांना हसण्याचा मनमुराद आनंद दिला.

अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचे इंजिनियर अश्विन मोघे यांनी भारतीय इंजिनिअर यांच्या कौशल्यावर विवेचन केले. मोघे म्हणाले की, बांधकाम क्षेत्रात पर्यावरण रक्षणासाठी नियोजन होणे महत्त्वाचे आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांचा स्टॅच्यू ऑफ युनिटी प्रकल्प यातूनच निर्माण झाला. नैसर्गिक स्त्रोतापासूनच घर, बंगले, धरणे निर्माण होतात. आजच्या पिढीऐवजी भविष्यातील पिढ्यांचा विचार होणे आवश्यक असल्याचे मोघे यांनी स्पष्ट केले. आयकॉन स्टील कंपनीचे इंजि. राजेन्द्र त्रिपाठी यांनी बांधकामासाठी लागणाऱ्या स्टीलचे आवश्यक गुणधर्म व त्याचे गुणवत्तेवर होणारे अनुकूल परीणाम याचे महत्व विशद केले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन इंजिनीयर सुहास जानवे यांनी तर आभार इंजिनियर सुभाष चौधरी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नंदुरबार जिल्हा इंजिनियर्स असोसिएशनचे अध्यक्ष मिलिंद शाह, उपाध्यक्ष महेश चौधरी, सचिव विलीनकुमार धुरकुंडे, खजिनदार प्रकाश पाटील, सदस्य कमलेश चौधरी, संजय देसले, फिरदोस. वोरा, जितेंद्र कलाल, सुशील नेतलेकर, दिग्विजय नरसे, सुनील मगरे, सुभाष चौधरी, सुहास जानवे व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## अक्कलकुवा कॉलेजमध्ये विद्यापीठस्तरीय आदिवासी समाज विकास कार्यशाळा



**नवापूर** : अक्कलकुवा येथील आर. एफ. एन. एस. वरिष्ठ विज्ञान महाविद्यालयात एकदिवसीय विद्यापीठ स्तरावरील 'आदिवासी समाज विकास कार्यक्रम' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत विविध मान्यवरांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सी. पी. सावंत होते.

उद्घाटक म्हणून सिनेट सदस्य प्रा. डॉ. दिनेश खरात, यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले की, आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास हा उच्च शिक्षण संस्थांचा सामाजिक दायित्वाचा भाग आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या तीन क्षेत्रांतून परिवर्तन घडवले पाहिजे.

प्रमुख वक्ते, प्रकल्प समन्वयक डॉ. के. एफ. पवार,यांनी आदिवासी विद्यार्थी संवाद कौशल्य यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राजेंद्र वसावे यांनी विद्यार्थ्यांना मशरूम शेतीविषयी प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. त्यांनी मशरूम उत्पादनाची पद्धत, बाजारपेठेतील मागणी व रोजगार संधींची सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मते, मशरूम शेती हा कमी भांडवलात होणारा आणि मोठा नफा देणारा व्यवसाय असून, आदिवासी युवकांसाठी हा रोजगाराचा नवा पर्याय ठरू शकतो.

डॉ. संदीप तडवी यांनी सिकलसेल जनजागृती यावर मार्गदर्शन केले, डॉ. बन्सीलाल भामरे यांनी विद्यार्थ्यांना 'जीवन कौशल्यामध्ये शाब्दिक अभिव्यक्तीचे महत्व' हा विषय विविध उदाहरण देत समजावून सांगितले. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन कार्यक्रम समन्वयक प्रा. आर. एस. पाडवी, यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. योगश दुशिंग यांनी केले.

## देवरे तंत्रनिकेतन सभागृहात अभियंता दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १६ सप्टेंबर**

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा व श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे बापूसाहेब शिवाजीराव देवरे तंत्रनिकेतन सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अभियंता दिन देवरे तंत्रनिकेतन सभागृहात उत्साहात पार पडला.

या प्रसंगी रक्तदान शिबिर तसेच सौर ऊर्जा तज्ञ प्रा डॉ अजय चांडक यांनी व्याख्यान दिले. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखेचे अध्यक्ष आशिष अग्रवाल, सचिव दीपक शेलार, तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रा. संजय हिरे, प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अजय चांडक, सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग



प्रमुख प्रा. सुनील मुंदडा, मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा. राजेंद्र ताथेड आदी उपस्थित होते. तंत्रनिकेतन सिव्हिल इंजिनिअरिंग विभाग प्रमुख प्रा. सुनील मुंदडा यांनी प्रास्ताविक करीत अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अजय चांडक यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन द्वारे मार्गदर्शन केले. के. सी. अजमेरा ब्लड बँकेतर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. या प्रसंगी बिल्डर्स असोसिएशनचे संजय देसले, विजय भादलीकर, कुणाल सोनार, पंचम मोरे, सुश्रुत जोशी, सागर मुळे, अभिनय गीते, देवेंद्र कठ्यारे, अविनाश थोरात, सुमीत बोरसे, बधान, क्षितिज महाजन, तंत्रनिकेतनचे प्राध्यापक विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. अक्षय मुंडके यांनी आभार मानले. बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा व श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार कुणाल पाटील व महाविद्यालयाचे अध्यक्ष सुभाष देवरे यांनी मार्गदर्शन केले.

## लोकसहभागाशिवाय ग्रामीण विकास अशक्य

### नमन गोयल : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १६ सप्टेंबर**

गावाच्या विकासासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे. पंचायत राज संस्थांच्या माध्यमातून शासनाची योजना लोकांपर्यंत पोहोचविणे आणि त्यातून त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे हे अभियानाचे उद्दिष्ट असून लोकसहभागाशिवाय ग्रामीण विकास शक्य नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांनी यावेळी सांगितले,

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान तसेच ग्रामीण विकासासाठी पंचायत राज संस्थांचे योगदान अधोरेखित करत अभियानाची उद्दिष्टे, मुख्य घटक, अंमलबजावणी प्रक्रिया, जनजागृतीचे उपाय आणि पुरस्कार योजना प्रभावीपणे राबविण्यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांनी पत्रकार परिषदेत मार्गदर्शन केले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गावंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत उदयकुमार कुसरकर आदी उपस्थित होते.

पंचायत राज विभागाने शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकाभिमुख शासन उभारण्यावर भर दिला आहे. महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आणि शासनाच्या योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सुरू केले असून यात सात मुख्य घटकांवर भर दिला जाणार असून त्यावर आधारित ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचे गुणांकन करून पुरस्कारासाठी निवड केली जाणार आहे:

यात सुशासन युक्त पंचायत लोकाभिमुख आणि सक्षम पंचायत प्रशासन निर्माण करणे. सक्षम पंचायत स्वनिधी, लोकवर्गणी याद्वारे पंचायत राज संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे. जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे पर्यावरणपूरक आणि स्वच्छतेला प्रोत्साहन. मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण विविध योजनांचा समन्वय साधून अधिक प्रभावी अंमलबजावणी, गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण स्थानिक संस्था व स्वयंसहाय्य गटांचा सहभाग वाढविणे, उपजीविका विकास व सामाजिक न्याय रोजगार, प्रशिक्षण, सामाजिक समावेशन आदि घटकांवर कामगिरीच्या आधारावर गुणांकन केले जाणार असल्याचे सांगितले. पोवाडेवाले यांच्या माध्यमातून अभियानाचा प्रचार करणे. यात ग्रामपंचायत पुरस्कार, पंचायत समिती पुरस्कार, जिल्हा परिषद पुरस्कार असे पुरस्कार जाहिर करण्यात येणार असून गुणवत्तेवर आधारित स्पर्धेमुळे गावागावांमध्ये विकासाला चालना मिळेल. लोकांच्या सहभागामुळे शासनाच्या योजना यशस्वी होतील. या अभियानामुळे नंदुरबार जिल्ह्यात ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधण्यास नवी दिशा मिळणार असून, शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## मुलींनी मार्शल आर्ट्स आत्मसात करणे आवश्यक

### नंदुरबार शालेय किक बॉक्सिंग स्पर्धा उद्घाटनप्रसंगी प्रिती पालिकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार १६ सप्टेंबर**

मुलींनी आत्मनिर्भर व निडर राहणे गरजेचे असून मार्शल आर्टस सारखे खेळ मुलींनी आत्मसात करणे आवश्यक आहे. स्वतःचे आत्मसंरक्षणासाठी ते अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन समाजसेविका प्रिती पालिकर यांनी केले.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व नंदुरबार जिल्हा किक-बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नंदुरबार जिल्हास्तरीय शालेय किक-बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन समाज सेविका प्रिती पालिकर यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी क्रीडा अधिकारी



संजय बेलोरकर, मुख्य प्रशिक्षिका योगिता बैसाने, निता मराठे, क्रीडा प्रशिक्षक उमेश राजूपत, मदर तेरेसा इंग्लिश स्कूल चे क्रीडाशिक्षक संतोष मराठे, प्रमोद बैसाने, विवेक पालिकर, मंगलदास पाटील, गणेश मराठे आदी उपस्थित होते.

१४ वर्षवयोगटात मुलींमध्ये कोमल शिंदे, १७ वर्ष वयोगटात रोशनी आहेर, १९ वर्षवयोगटात वैष्णवी अहिरे तसेच १४ वर्ष वयोगटात मुलांमध्ये ३५ ते ४० किलो वजन गटात समर्थ बडगुजर, तनय सोपनार, धिरज पावरा, मुकुंदराज नाईक प्रथम आले. १७ वर्षवयोगट ४० ते ४५ किलो वजन गटात यशवंत वसावे, सुमित चौधरी, उमेर खान सुमित तावडे प्रथम आले. सर्व विजयी खेळाडूंची निवड धुळे येथे होणाऱ्या विभागीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. पंच म्हणून पवन बिन्हाडे, प्रतीक खंडेलवाल, अमित पाडवी, विशाल सोनवणे गणेश गोसावी यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन गणेश मराठे यांनी केले, तर आभार योगिता बैसाने यांनी मानले.

## नेरी दिगरचे एक कुटुंब शाळेमध्ये स्थलांतरित

जामनेर येथील नेरी, जामनेर, वाकडी, शेंदुर्णी आणि तोंडापूर या गावांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. यात मौजे नेरी बु. येथे २१ ते ४० तसेच नेरी दिगर येथे १५ ते २० घरांमध्ये व ५ दुकानांमध्ये पाणी शिरले आहे. तसेच पशुधनाचे नुकसान झाले आहे. नुरी बु. येथील एक कुटुंब शाळेमध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे. माळपिंप्री येथे पिकांचे मोठे नुकसान झाले असून सुनसगाव खुर्द व सुनसगाव बु. या गावांचा संपर्क तुटला आहे.

## पाचोरा तालुक्यात ३५० ते ४०० कुटुंबांचे सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये स्थलांतर

पाचोरा : तालुक्यात पिंपळगाव हरेश्वर आणि वरखेडी या दोन मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. शिंदाड, गहुले, वडगाव कडे, सातगाव डोंगरी, वाडी, शेवाळे व वाणेगाव या ६ ते ७ गावांमध्ये नदी-नाल्यांना पूर आला आहे. यात सुमारे ३५० ते ४०० कुटुंबांना सुरक्षिततेसाठी शाळांमध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे. मौजे शिंदाड येथे तब्बल ४०० जनावरांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पाचोरा तालुक्यात शिंदाड, सातगाव डोंगरी, निंभोरी, वाणेगाव, वडगाव कडे, वेरुळी, राजुरी, पिंप्री, गहुले, वाडी शेवाळे, खडकदेवळा आदी गावे नुकसानग्रस्त आहेत. यात मनुष्यहानी झालेली नसून पशुधन पुराच्या पाण्यात १८७९ वाहून गेले आहे. यात ९० मोठे दुधाळ, १२८ लहान दुधाळ पशुधन मृत झाले आहे. तर ७ दुधाळ पशुधन जखमी, २३ ओढकाम करणारे मोठे पशुधन, ४१ ओढकाम करणारे लहान पशुधन, जखमी आहेत. १५७२ कोंबडे आणि १०५० कोंबड्या वाहून गेल्या आहेत. पाळीव वराह-२५ असे अनेक पशुधन पुरामध्ये वाहून गेले असून कोणत्याही पशुधनाचा मृतदेह हाती लागलेला नाही. २ दिवसांपासून अतिवृष्टीमुळे ३६१ कुटुंब बाधित झालेले आहेत. ५६ कच्च्या घरांचे पूर्णतः तर २४८ कच्च्या घरांचे काही प्रमाणात नुकसान झाले असून २५ पक्क्या घरांचेही अंशतः नुकसान झाले आहे. याशिवाय ३२ झोपड्या नष्ट झालेल्या आहेत. ५४ गोठे नष्ट झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, असे उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे.

# धरणगाव नगर परिषदेतर्फे अबेटींग मोहीम

## डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरियाबाबत डास प्रतिबंधात्मक उपाययोजना

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, १६ सप्टेंबर**

येथील नगरपरिषदेमार्फत सकाळी ७ ते ११ या कालावधीत डेंग्यू, चिकनगुनिया व मलेरिया यांचा प्रादुर्भाव व प्रसार रोखण्यासाठी संपूर्ण धरणगाव शहरात घरोघरी अबेटींग मोहीम राबविण्यात आली.

नगर परिषदेमार्फत या मोहिमेचे काटेकर नियोजन करण्यात आले होते. याकरिता एकूण १७ टीम तयार करण्यात आल्या. प्रत्येक टीमला विशिष्ट प्रभाग नेमून देण्यात आला. या सर्व टीमला तालुका आरोग्य अधिकारी व आरोग्य सहाय्यक यांनी गुरुवारी (११ सप्टेंबर) रोजी सविस्तर प्रशिक्षण दिले. तसेच या सर्व टीमच्या कामावर पर्यवेक्षण कार्यालय अधीक्षक भिकन पारधी, आरोग्य निरीक्षक संतोष बिराडे व आरोग्य विभागातील मलेरिया आरोग्य पर्यवेक्षक एस.आर.भंगाळे, आरोग्य सहाय्यक ए. एस.भोई, आर. के. देशमुख, महेंद्र माळी व त्यांच्या टीम यांनी केले.

याबरोबरच नगर परिषदेच्या शेख शमसोद्दीन, रामकृष्ण माळी व अण्णा महाजन या मुकादमांच्या टीमने शहरातील पाणी साचलेल्या अनेक डबक्यांमध्ये ऑइल टाकून या ठिकाणी डासांचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घेतली.



ही संपूर्ण मोहीम मुख्याधिकारी रामनिवास झंवर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण व डॉ. मनोज पाटील, अधीक्षक तालुका ग्रामीण रुग्णालय यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. तसेच जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रमोद सोनवणे यांनीदेखील या मोहिमेस मार्गदर्शन केले.

ही मोहीम यशस्वी करण्यासाठी धरणगाव नगर परिषदेच्या संपूर्ण अधिकारी कर्मचाऱ्यांनी तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.





## भोळे महाविद्यालयात युवती सभेचे उद्‌घाटन

**भुसावळ** : येथील देविदास नामदेव भोळे महाविद्यालयात युवती सभेचे उद्‌घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. पी. फालक होते. कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ. प्रिया बऱ्हाटे-भोळे यांनी केले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. प्रिया बऱ्हाटे-भोळे यांनी विद्यार्थिनींना 'शारीरिक व मानसिक आरोग्य' या विषयावर सविस्तर माहिती दिली. प्राचार्य. डॉ. आर. पी. फालक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थिनींनी आरोग्यदायी सवयी अंगीकारून समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक युवती सभेच्या सचिव प्रा. संगीता धर्माधिकारी यांनी केले. या वेळी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. संजय. डी. चौधरी, डॉ. अंजली पाटील, प्रा. श्रेया चौधरी, प्रा आर. डी. भोळे, प्रा. डॉ. जे. बी. चव्हाण, प्रा. डॉ. आर. बी. ढाके, प्रा. एन. एस. वानखेडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. माधुरी पाटील यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. जे. पी. सरोदे यांनी मानले.



## पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त काबरे विद्यालयात वृक्षारोपण, दिंडी

**एरंडोल** : येथील रा. ति. काबरे विद्यालयात मंगळवार (१६ सप्टेंबर) रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त देशभरात राबवण्यात येत असलेल्या पंधरवडा उपक्रमांतर्गत रा.ति.काबरे विद्यालयात वृक्षारोपण व दिंडी काढण्यात आली. हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून साजरा करण्यात आला.

विद्यालयाच्या पटांगणावर सकाळी १० वाजता दिंडीला सुरुवात झाली. सुमारे २०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली आणि वृक्षारोपणाचे महत्त्व सांगितले.

दिंडीनंतर विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विविध प्रजातींचे ५० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. ज्यात तुळस, आंबा, चिकू, नीम व इतर स्थानिक झाडांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी स्वतः रोपे लावली आणि त्यांची काळजी घेण्याचे आश्वासन दिले. हा उपक्रम पंतप्रधानांच्या 'एक पेड माँ भारती के नाम' या संकल्पाशी जोडला गेला असून, विद्यालयाने पर्यावरण जागृतीसाठी हे एक मोठे योगदान दिले आहे.

मुख्याध्यापक एस. एस.राठी, संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र काबरे, सचिव राजीव मणियार, उपसचिव धिरज काबरे, सदस्य डॉ. नितीन राठी, परेश बिर्ला, सतीश परदेशी, अरुण पाटील व सर्व शिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## टॅली प्रोफेशनल अ‍ॅकॅडमीला 'ज्ञानगौरव पुरस्कार'- सलग पाचव्यांदा सन्मान

**पाचोरा** : शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पाचोरा येथील टॅली प्रोफेशनल अ‍ॅकॅडमीला इंडिया एज्युकेशन अवॉर्ड्स २०२५ या भव्य सोहळ्यात 'ज्ञानगौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार अ‍ॅकॅडमीचे संचालक अमीन पिंजारी व आसिफ पिंजारी यांना नागपूर येथे प्रसिद्ध सिनेअभिनेत्री व मिस इंडिया वर्ल्ड २००४ किताबाची मानकरी सायली भगत, तसेच संचालक शरद तावरी व कविता तावरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. टॅली प्रोफेशनल अ‍ॅकॅडमीने अल्पावधीतच शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान दिले असून, सलग पाचव्यांदा या प्रतिष्ठित पुरस्काराचा मान मिळवणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब ठरली आहे. अ‍ॅकॅडमीत व्यवसायाभिमुख व रोजगाराभिमुख संगणक अभ्यासक्रम राबवले जात असून, त्यात टॅली प्राईम, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ॲडव्हान्स एक्सेल यांसारख्या कोर्सेसचा समावेश आहे. ग्रामीण व शहरी भागातील शेकडो विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल व अत्याधुनिक पद्धतीने प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्याचे कार्य या संस्थेतर्फे केले जात आहे.



## संततधार पावसामुळे खरीप हंगाम धोक्यात

**कडू महाजन**
**धरणगाव, १६ सप्टेंबर**

गेल्या महिन्यापासून जिल्ह्यासह तालुका परिसरात संततधार पाऊस सुरू आहे. यामुळे खरीप पिके धोक्यात आली आहेत.

कपाशी लालसर व पिवळी पडत आहे. मका, सोयाबीन, ज्वारी, बाजरी वाया जाण्याचा तयारीत आहे. मध्यंतरी मोसमी पावसाने १५-२० दिवस दांडी मारली. त्यावेळी खरीप पिके कोमेजू लगाली होती, तर नदी-नाले कोरडेठाक पडल्याने शेतकऱ्यांना भविष्यातील रब्बी हंगामाची चिंता निर्माण झाली होती. परंतु गेल्या पंधरवड्यात मोसमी पावसाने जबरदस्त हजेरी लावल्याने नदी-नाले ओसंडून वाहू लागले आहेत. कमी वेळात अधिक पाऊस झाल्याने खरीप हंगामातील परिस्थिती बिकट झाल्याने ओला दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी पुढे आली आहे

सध्या तालुक्यातील ८६ खेड्यांतील ग्रामीण शिवारात ५६७४० हजार हे.क्षेत्रातील ४५ हजार हे. पेक्षा अधिक भागात खरीप पेरणी व लागवड करण्यात आली असून पुर्वोत्तर भागातील पिंप्री खुर्द, चावलखेडा मुसळी, वाघळूद, सतखेडा, गंगापुरी, पष्टाणे, सोनवद, आनोरे, धानोरे, गारखेडे,सह झालेल्या विविध परिसरात संततधार पाऊसामुळे कपाशी पिकाला जोरदार फटका बसला आहे. उत्पन्नात मोठी घट निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे तर पश्चिम दक्षिण भागातील साळवा, साकरे, नांदेड, निमझिरी, लोणे, भोणे, जांभोरे आदी परिसरात मका व सोयाबीन लावणी अधिक प्रमाणात झाली आहे. तेथेदेखील अति पावसामुळे पिके वाया जाण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. परिणामी उपन्नात मोठी घट निर्माण होणार असल्याने शेतकरीवर्ग भयभीत झाला आहे.

**कपाशीवर लाल्या रोगांचा प्रादुर्भाव**

२० मे ३० मे दरम्यान लागवड झालेल्या कपाशी पिकांवर अति पावसामुळे लाल्या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. बोंडअळी पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे, तर दुसरीकडे १ ते १५ जून दरम्यान लागवड झालेल्या कोरडवाहू खरीप कपाशी पिंकाची परीस्थिती समाधानकारक असल्याचे चित्र दिसून आहे. खरं म्हणजे महागडे बियाणे खते कीटकनाशक औषधी फवारणी करुन बळीराजाने अतिशय कष्टाने पिकांची देखभाल करून पिके वाढे लावली परंतु परंतु असाच संततधार पाऊस सुरू राहिल्यास खरीपा हंगामाचे जेमतेम भांडवल निघते की काय, अशी भीती बळीराजाला वाटू लागली आहे

# ग्रामरोजगार सहाय्यकांचे मानधन थकले

## नवीन निर्णयानुसार दरमहा वेतनासाठी संघटना करणार आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १६ सप्टेंबर**

ग्रामरोजगार सहाय्यकांचे मानधन गेल्या ११ महिन्यांपासून थकले आहे. नवीन निर्णयानुसार, हे मानधन तत्काळ दरमहा देण्यात यावे, यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेने जिल्हा प्रशासनाची भेट घेऊन आपली व्यथा मांडली.

महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांना ग्रामरोजगार सहाय्यकांच्या १ ऑक्टोबर २४ पासून ८ हजार आणि इंटरनेट व प्रवास खर्च,अल्पोपहार भत्तासाठी दोन हजाराप्रमाणे दहा हजारप्रमाणे शासनाने निर्णय घेतलेला आहे तेव्हापासून गेल्या ११ महिन्यांचे थकीत मानधन दरमहा वेळेवर मिळावे याबाबत निवेदन देण्यात आले.



त्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री, रोहयो मंत्री भरत गोगावले आणि प्रधान सचिव गणेश पाटील यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनानुसार गेल्या ११ महिन्यांपासून प्रलंबित असलेले ग्रामरोजगार सहाय्यकांचे फिक्स मानधन तातडीने त्यांच्या वैयक्तिक खात्यावर देण्यात यावे, याविषयी संघटनेने दिलेल्या माहितीनुसार ३ ऑक्टोबर २०२४ च्या नियोजन अंतर्गत रोहयोच्या शासन निर्णयानुसार राज्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांना शासन निर्णयानुसार अद्यापपर्यंत ठोस मानधन देण्यात आलेले नाही. त्यामुळे राज्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांच्या कुटुंबावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. याबाबत संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी सांगितले की, ग्रामरोजगार सहाय्यकांच्या कामांचा खूप व्याप वाढवलेला आहे. त्यांच्याकडे दिवसभर जॉबकार्डधारक मजुरांची उपस्थिती करून नोंदविणे तसेच सोशल ऑडिटपर्यंत मनरेगाची सर्व कामांची जबाबदारी त्यांच्यावर शासनाने लादलेली आहे. एवढी सर्व कामे करूनसुद्धा ११ महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही. यामुळे ग्रामरोजगार सहाय्यकांच्या कुटुंबाचा उपजीविकेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासनाने या बाबीकडे तातडीने लक्ष घालून लवकर न्याय द्यावा अन्यथा संघटनेकडून प्रत्येक जिल्ह्यातून राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.

याबाबत जिल्हा संघटनेच्या श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यानात झालेल्या बैठकीत नागपूर येथे एक दिवसीय आंदोलन करण्याबाबत ठराव करण्यात आला. यावेळी राज्य कार्याध्यक्ष बाळासाहेब तायडे राज्य संघटक उमेश तायडे, खुशाल पाटील यांच्या मार्गदर्शनाने आणि संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेची बैठक झाली. आंदोलनाविषयी ठरावाचे सूचक बाळासाहेब तायडे, अनुमोदक शांताराम जाधव आहेत. संघटनेच्या बैठकीस जिल्ह्यातील सर्व तालुक्याचे तालुकाध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि सर्व ग्रामरोजगार सहाय्यक बहुसंख्येने उपस्थित होते.

**Government of Maharashtra**
Public Works Department
**Executive Engineer, Public Works Divison, Jalgaon Dist. Jalgaon**
email- jalgaon.ee@mahapwd.gov.in

**E-Tender Notice No. 29 For 2025-2026**

Online Tenders (e-tender) in **"B-1"** form are invited by the Executive Engineer, P.W. Division, Jalgaon (Phone No. 0257-2227343) for and behalf of Government of Maharashtra, Electronic Tender Management System. http://mahaetenders.gov.in from the **Registered Contractor/(Classified M.S.S.) in appropriate class** of Public Works Department of Maharashtra State. **The rights are reserve to reject all or any tender by Superintending Engineer / Executive Engineer. Conditional Tenders are not acceptable.**

The details can be viewed and downloaded online from dated **17/09/2025 to 24/09/2025 at 17.00 hrs.** directly from the Government of Maharashtra e-tendering Portal **http://mahaetenders.gov.in.**

This detailed tender notice for **04 (Four) Building works** are also available on portal www.mahapwd.com and on Notice Board in the office of Executive Engineer, Public Works Division, Jalgaon Dist. Jalgaon. **Sr. No. 03 to 04 Work are open to all Contractor and Sr. No. 01 to 02 Works are open Tender for Labour Co-operative Society which are Classified in P. W. Department of Jalgaon District Only.**

**Sd/-**
**(R. D. Patil)**
**Executive Engineer,**
**Public Works Division, Jalgaon**

विमाका/नाशिक/जाहिरात/२११/२०२५

## थोडक्यात महत्त्वाचे...



### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आयोजित आक्रोश मोर्चाद्वारे शेतकऱ्यांचा एल्गार

**धरणगाव** : नाशिक येथील गोल्फ क्लब मैदानाजवळ एक टोक ते शेवटचे टोक जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक इथपर्यंत निघालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आयोजित 'महाविक्राळ आक्रोश मोर्चाच्या' माध्यमातून शेतकऱ्यांच्या एकतेची ताकद काय असते याचा अनुभव नाशिककरांनी घेतला. शेतकरी-कष्टकरी यांच्या न्याय हक्कासाठी खासदार शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वात नाशिक शहरात अतिशय विक्राळ मोर्चा निघाला. मोर्चात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, सर्व खासदार, सर्व आमदार, राज्यभरातील शेतकरी बांधव व भगिनी सहभागी झाले. या ऐतिहासिक मोर्चात जळगाव जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील, धरणगाव तालुकाध्यक्ष संजय पाटील, कार्याध्यक्ष हितेंद्र पाटील, सोनवदचे माजी सरपंच उज्ज्वल पाटील, माजी युवती अध्यक्षा कल्पिता पाटील, उद्योजक एकनाथ पाटील, लक्ष्मी डिजिटलचे संचालक अमित शिंदे, कॉन्ट्रॅक्टर मोहीत पवार, शहराध्यक्ष लक्ष्मणराव पाटील, युवक उपाध्यक्ष प्रमोद पाटील उपस्थित होते.

### सिल्लोड-सोयगावात अतिवृष्टीमुळे नुकसानीबाबत आमदार सत्तार यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**सोयगाव** : सिल्लोड-सोयगाव मतदारसंघात अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या



परिस्थितीबाबत आमदार अब्दुल सत्तार यांनी १६ सप्टेंबर रोजी मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. सिल्लोड-सोयगाव मतदारसंघात शेतमाल, रस्ते, सिंचन प्रकल्प, घरांची पडझड असे विविध ठिकाणी मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार अब्दुल सत्तार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन परिस्थितीची माहिती दिली. या भेटीत आमदार सत्तार यांनी शेतकऱ्यांचे झालेले नुकसान तातडीने भरून निघावे यासाठी शासकीय मदतीची मागणी केली. तसेच बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मदत मिळावी, यासाठी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदनही दिले.

**जळगाव जनता सहकारी बँक लि. जळगाव (शेड्यूल्ड बँक)**
मुख्य कार्यालय :- 'सेवा' ११७/११९ नवी पेठ, जळगाव
**ताबा नोटीस (स्थावर मालमत्तेसाठी)**
**सिक्युरीटायझेशन ॲक्ट २००२ चे कलम १३(४) व नियम ८(१) नुसार**

ज्या अर्थी, सुरक्षाकरण (सिक्युरीटायझेशन) व वित्तीय मालमत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी कायदा, २००२ या अन्वये आणि उक्त कायद्याच्या कलम १३ (१२) अन्वये आणि प्रतिभूती हितसंबंध (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील सही करणाऱ्या जळगाव जनता सहकारी बँक लि. जळगाव च्या प्राधिकृत अधिकारी श्री पंकज नामदेव पाटील यांनी दि.२१/११/२०२४ रोजी मागणी नोटीस पाठविली त्या नोटीसीमध्ये नमूद केलेल्या **रु.१५,०६,१७६/- (रु. पंधरा लाख सहा हजार एकशे श्याहत्तर मात्र )** दि.३१/१०/२०२४ पर्यन्त रकमेची उक्त नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत परतफेड करण्यासाठी पुढील नमूद कर्जदार/जामिनदार/मिळकतदार यांना नोटीस दिली होती (१) श्री अरुण मुरलीधर अमृतकर (कर्जदार व मिळकतधारक) रा.गोडबोले गल्ली,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव, (०२) श्री. मुकेश अरुण अमृतकर (सहकर्जदार/ मिळकतधारक) रा.गोडबोले गल्ली,पारोळा ता.पारोळा जि जळगाव (०३) श्री विनोद प्रकाश बडगुजर (जामीनदार) रा. न्हावी गल्ली,पारोळा ता.पारोळा जि जळगाव, (४)श्री.शालीक फकीरा माळी (जामीनदार) रा.बाजारपेठ,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव ज्या अर्थी उपरोक्त कर्जदार/जामीनदार/ मिळकतदार यांना दि.२१/११/२०२४ रोजी मागणी नोटीस पाठविली, सदर नोटीसीची दि.२९/११/२०२४ रोजी तुमचेवर बजावणी झाली, त्या नोटीसीची बजावणी होऊन देखील नोटीसीपासून ६० दिवसाचे आत नमूद रकमेची परतफेड करण्यास कर्जदार निष्फळ ठरला असून याद्वारे कर्जदार, जामीनदार,मिळकतदार व तमाम सर्वसाधारण जनतेस या नोटीसी द्वारे असे सुचित करण्यात येते की, खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी उक्त अध्यादेशाच्या कलम १३(४) व उक्त नियमाच्या नियम ८अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन मा जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे मा तहसिलदार, पारोळा यांचे मार्फत खालील नमूद मिळकत ता. १२/०९/२०२५ रोजी प्रत्यक्षरित्या ताब्यात घेतली आहे.

या नोटीसी द्वारे कर्जदार,जामीनदार,मिळकतदार व तमाम सर्वसाधारण जनतेस सक्त ताकीद देण्यात येते की सदरील मालमत्तेसंबंधात कोणतेही व्यवहार करु नयेत आणि या उपरही मालमत्तेसंबंधी झालेला कोणताही व्यवहार **रु.१५,०६,१७६/- (रु. पंधरा लाख सहा हजार एकशे श्याहत्तर मात्र )** दि.३१/१०/२०२४ पर्यन्त + त्यापासून पुढील व्याजाच्या प्रभारास आधिन राहून असेल.

कर्जदार,जामीनदार, मिळकतदार यांचे लक्ष उक्त कायद्याच्या कलम १३(८) कडे वेधण्यात येते की, कर्जदार,जामीनदार,मिळकतदार हे कलम १३(८) मधील दिलेल्या वेळेत बँकेचे कर्जाची येणेबाकी रक्कम+व्याज+खर्च देऊन मालमत्ता तारणमुक्त करुन घेऊ शकतात.

दिनांक १२/०९/२०२५ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतलेल्या मिळकतीचे वर्णनः-

| मिळकत धारकाचे नाव | मिळकतीचे वर्णन | मिळकतीच्या चतुःसीमा |
|---|---|---|
| श्री अरुण मुरलीधर अमृतकर व श्री.मुकेश अरुण अमृतकर | मौजे पारोळा ता पारोळा जि जळगाव येथील, गट नं.७५६ प्लॉट नं.६+७ उत्तरेकडील रो-हाऊस क्र.२ क्षेत्र ८०.३२ चौ.मी.बांधीव क्षेत्र ५८.८३ चौ,मी. वरील बांधकाम व तदंगभुत वस्तुंसह | पुर्वेस - प्लॉट नं.५३+५४<br>पश्चिमेस - रोड<br>उत्तरेस - रो हाऊस नं.१<br>दक्षिणेस - रो हाऊस नं.३ |

सदरील नोटीस जारी केल्यानंतर उपरोक्त नमूद मिळकतीचा जर इतर कोणीही कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार केला तर सदरील व्यवहार बेकायदेशिर राहील व सदरचा व्यवहार बँकेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

टिप-मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकुर ग्राह्य मानावा.

स्थळ- पारोळा ता पारोळा जि.जळगाव
दिनांकः- १६/०९/ २०२५

(पंकज नामदेव पाटील)
प्राधिकृत अधिकारी
जळगाव जनता सहकारी बँक लि., जळगाव

**जळगाव जनता सहकारी बँक लि. जळगाव (शेड्यूल्ड बँक)**
मुख्य कार्यालय :- 'सेवा' ११७/११९ नवी पेठ, जळगाव
**ताबा नोटीस (स्थावर मालमत्तेसाठी)**
**सिक्युरीटायझेशन ॲक्ट २००२ चे कलम १३(४) व नियम ८(१) नुसार**

ज्या अर्थी, सुरक्षाकरण (सिक्युरीटायझेशन) व वित्तीय मालमत्तेची पुनर्रचना आणि प्रतिभूती हितसंबंधाची अंमलबजावणी कायदा, २००२ या अन्वये आणि उक्त कायद्याच्या कलम १३ (१२) अन्वये आणि प्रतिभूती हितसंबंध (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील सही करणाऱ्या जळगाव जनता सहकारी बँक लि. जळगाव च्या प्राधिकृत अधिकारी श्री पंकज नामदेव पाटील यांनी दि.२१/११/२०२४ रोजी मागणी नोटीस पाठविली त्या नोटीसीमध्ये नमूद केलेल्या **रु.५,३६,५२०/- (रु. पाच लाख छत्तीस हजार पाचशे विस मात्र)** दि.३१/१०/२०२४ पर्यन्त रकमेची उक्त नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत परतफेड करण्यासाठी पुढील नमूद कर्जदार/जामिनदार/मिळकतदार यांना नोटीस दिली होती (१) श्री अरुण मुरलीधर अमृतकर प्रो.प्रा. सदगुरु प्रोव्हीजन (कर्जदार व मिळकतधारक) व्यवसायाचा पत्ता - शॉप नं.४४ आठवडे बाजार बाजार पेठ पारोळा ता.पारोळा जि. जळगाव रा.गोडबोले गल्ली,पारोळा ता पारोळा जि.जळगाव, (०२) श्री. मुकेश अरुण अमृतकर (जामीनदार/ मिळकतधारक) रा.गोडबोले गल्ली, पारोळा ता.पारोळा जि जळगाव , (०३) श्री विकास वसंत अमृतकर (जामीनदार) रा. न्हावी गल्ली,पारोळा ता.पारोळा जि जळगाव, (४) श्री.शालीक फकीरा माळी (जामीनदार) रा.बाजारपेठ,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव ज्या अर्थी उपरोक्त कर्जदार/जामीनदार/मिळकतदार यांना दि.२१/११/२०२४ रोजी मागणी नोटीस पाठविली, सदर नोटीसीची दि.२८/११/२०२४ रोजी तुमचेवर बजावणी झाली, त्या नोटीसीची बजावणी होऊन देखील नोटीसीपासून ६० दिवसाचे आत नमूद रकमेची परतफेड करण्यास कर्जदार निष्फळ ठरला असून याद्वारे कर्जदार, जामीनदार,मिळकतदार व तमाम सर्वसाधारण जनतेस या नोटीसी द्वारे असे सुचित करण्यात येते की, खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी उक्त अध्यादेशाच्या कलम १३(४) व उक्त नियमाच्या नियम ८ अन्वये त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन मा जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे मा तहसिलदार, पारोळा यांचे मार्फत खालील नमूद मिळकत ता.१२/०९/२०२५ रोजी **प्रत्यक्षरित्या** ताब्यात घेतली आहे.

या नोटीसी द्वारे कर्जदार, जामीनदार,मिळकतदार व तमाम सर्वसाधारण जनतेस सक्त ताकीद देण्यात येते की सदरील मालमत्तेसंबंधात कोणतेही व्यवहार करु नयेत आणि या उपरही मालमत्तेसंबंधी झालेला कोणताही व्यवहार **रु.५,३६,५२०/- (रु. पाच लाख छत्तीस हजार पाचशे विस मात्र )** दि.३१/१०/२०२४ पर्यन्त + त्यापासून पुढील व्याजाच्या प्रभारास आधिन राहून असेल.

कर्जदार,जामीनदार,मिळकतदार यांचे लक्ष उक्त कायद्याच्या कलम १३(८) कडे वेधण्यात येते की, कर्जदार,जामीनदार,मिळकतदार हे कलम १३(८) मधील दिलेल्या वेळेत बँकेचे कर्जाची येणेबाकी रक्कम+व्याज+खर्च देऊन मालमत्ता तारणमुक्त करुन घेऊ शकतात.

दिनांक १२/०९/२०२५. रोजी **प्रत्यक्षरित्या** ताबा घेतलेल्या मिळकतीचे वर्णनः-

| मिळकत धारकाचे नाव | मिळकतीचे वर्णन | मिळकतीच्या चतुःसीमा |
|---|---|---|
| श्री अरुण मुरलीधर अमृतकर व श्री.मुकेश अरुण अमृतकर | मौजे पारोळा ता पारोळा जि जळगाव येथील, गट नं.७५६ प्लॉट नं.६+७ उत्तरेकडील रो-हाऊस क्र.२ क्षेत्र ८०.३२ चौ.मी.बांधीव क्षेत्र ५८.८३ चौ,मी. वरील बांधकाम व तदंगभुत वस्तुंसह | पुर्वेस - प्लॉट नं.५३+५४<br>पश्चिमेस - रोड<br>उत्तरेस - रो हाऊस नं.१<br>दक्षिणेस - रो हाऊस नं.३ |

सदरील नोटीस जारी केल्यानंतर उपरोक्त नमूद मिळकतीचा जर इतर कोणीही कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार केला तर सदरील व्यवहार बेकायदेशिर राहील व सदरचा व्यवहार बँकेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

टिप-मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकुर ग्राह्य मानावा.

स्थळ- पारोळा ता पारोळा जि.जळगाव
दिनांकः- १६/०९/ २०२५

(पंकज नामदेव पाटील)
प्राधिकृत अधिकारी
जळगाव जनता सहकारी बँक लि., जळगाव



## जिल्ह्यातील प्रकल्पात ८३ टक्के उपयुक्त जलसाठा

जिल्ह्यात मोठ्या प्रकल्पांपैकी गिरणा व वाघूर १०० टक्के, हतनूर ६२.३५ टक्के जलसाठा आहे. तर मध्यम व लघू प्रकल्पांपैकी अभोरा, मंगरूळ, सुकी, हिवरा, तोंडापूर, अंजनी, बोरी, बहुळा आणि मन्याड असे ९ प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. तसेच मोर ९२.४७, अग्नावती ८०.२१, गुळ ७१.९१, भोकरबारी ४५.७८ आणि शेळगाव बॅरेज १९.४४ टक्के असा एकूण १२७७७.७६ दशलक्ष घनमीटरनुसार ४५.१२ टीएमसी अर्थात सरासरी ८३.०९ टक्के उपयुक्त जलसाठा आहे. गतवर्षी याच दिवशी ४५.०१ टीएमसीनुसार ८२.८९ टक्के जलसाठा नोंद असल्याचेही जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे.

# जामनेरसह पाचोरा, मुक्ताईनगरात अतिवृष्टी

## ४६९ पशुधनाच्या आयुष्यावर 'जलसंकट', मुक्ताईनगरमध्ये एकाचा बुडून मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर**

जिल्ह्यात सोमवारी अतिवृष्टीसह पूरपरिस्थितीमुळे जिल्ह्यात ४६९ पशुधनांचा बळी गेला आहे. ही पशुहानी एकट्या पाचोरा तालुक्यातील असताना मुक्ताईनगरच्या काकोडा येथील किरण मधुकर सावळे हा युवक नदीच्या पाण्यात बेपत्ता झाल्याची घटना सोमवारी सकाळी घडली आणि शोधकार्य राबविल्यानंतर या युवकाचा मृतदेह दुपारच्या सुमारास हाती लागला आहे. गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यात 'जोर'धारांनी कहर केला आहे. सोमवारी आणि मंगळवारी पाचोरा, जामनेर व मुक्ताईनगर तालुक्यात दमदार पावसामुळे सर्वच नद्या-नाल्यांना पूर आला, तर घरांची मोठी पडझड झाली असून पशुधनाचा मोठ्या प्रमाणावर बळी गेला आहे. पूरपरिस्थितीमुळे जामनेर-पाचोरा आणि जामनेर-जळगाव मार्गावरची वाहतूक बाधीत झाली आहे.



**आपत्ती प्रतिसाद दल दाखल**

जामनेरसह पाचोऱ्यात पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने धुळ्याहून राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडी दाखल झाली आहे. पूरग्रस्त भागात या पथकाकडून मदतकार्य राबविले जात आहे. मंगळवारी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद जामनेर व पाचोरा तालुक्यातील पूरग्रस्त भागात मदतकार्यावर लक्ष ठेऊन आहेत. तसेच बाधीत झालेल्या कु टुंबियांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

### २६२ कुटुंब बाधीत

पाचोरा तालुक्यात २१ कच्च्या घरांची पूर्णतः तर ७३ घरांची अंशतः पडझड झाली आहे. ५ झोपड्या तर ११ गोठे जमीनदोस्त झाले आहेत.दोन दिवसांच्या पावसात पाचोरा तालुक्यातील २६२ कु टुंब बाधीत झाले आहेत.

**१०३ बसफेऱ्या रद्द**

जामनेर-जळगाव आणि जामनेर-पाचोरा मार्गावरच्या १०३ बसफ ेऱ्या मंगळवारी पूरपरिस्थितीमुळे रद्द करण्यात आल्या आहेत. त्यात जामनेर-जळगावच्या ८२ तर जामनेर-पाचोरा मार्गावरच्या १८ फेऱ्यांचा समावेश आहे. जामनेर-जळगाव मार्गावर ३ हजार किलोमीटर तर पाचोरा मार्गावरच्या ७६४ किलोमीटर अंतराचा बससेवेचा चक्का पूरपरिस्थिती अडकून पडला. त्यामुळे विद्यार्थ्यांसह प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले.



जामनेर तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त भागाची पाहणी करताना आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन.

### एकाचा बुडून मृत्यू

काकोडा येथील किरण सावळे हा युवक नदीत असलेले लाकूड आणण्यासाठी सकाळी १० वाजेच्या सुमारास पात्रात उतरला. पुराच्या प्रवाहात ओढला गेलेल्या हा युवक पाण्यात बेपत्ता झाला. त्यानंतर शोधकार्य राबविल्यानंतर दुपारी त्याचा मृतदेह आढळून आला आहे.

# नेरी गावात पाणी शिरल्याने जीवनावश्यक वस्तूंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**जामनेर, १६ सप्टेंबर**

मंगळवारी रात्री दोन वाजेपासून तालुक्यात नेरीसह अनेक गावांमध्ये अतिवृष्टीने हाहाकार माजविला असून ढगफुटी सदस्य पाऊस झाल्याने भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. तालुक्यातील नेरी गावात पाणी शिरल्याने घरातील जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे.

नेरी, सुनसगाव, चिंचखेडा गारखेडा, शहापूर , वाकडी, पाळधी, बेटावद१, अशा विविध गावांमध्ये रात्री दोन वाजेपासून सकाळी १ वाजेपर्यंत पाण्याची सततधार सुरू असल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला.

नेरी गावात सुमारे ४० घरांमध्ये पाणी शिरल्याने अन्नधान्य तसेच जीवनावश्यक्य वस्तू चे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. दुकानात पाणी शिरल्यानेही व्यापाऱ्यांच्या मालाची मोठी हानी झाली आहे. नेरी गावातील तीन गुरे दगावले असून तहसीलदार नानासाहेब आगळे यांनी या गावांना भेटी देऊन तलाठ्यांना त्वरित पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत.



जामनेर तालुक्यातील नेरी गावात पाणी शिरल्याने घरातील जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले.

चिंचखेडा जवळील खडकी नाल्याला मोठा पूर आल्याने नाल्यावरील पुलावरून पाणी वाहू लागले.परिणामी जळगाव जामनेर मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या.रस्ते बंद झाल्याने नागरिक, वाहन,चालक आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.परिसरातील नदी नाले तुडुंब भरल्याने वाहतूक व्यवस्थेला मोठा फटका बसला आहे.

कांग नदीलाही मोठा पूर आल्याने पूर पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. शेतात पाणी घुसल्याने शेतातील उभी पिके जमीनदोस्त झाली असून शेतकऱ्यांचे लाखोचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी घरांचे नुकसान झाले असून घरामध्ये पाणी शिरल्याने जीवनावशक वस्तू चे नुकसान झाले आहे.

आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे करून त्वरित मदत देण्याचे आदेश दिले आहेत. नदीकाठच्या भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून प्रशासनाकडून मदत व बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे.

# कुऱ्हा परिसरात ढगफुटीसदृश पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, १६ सप्टेंबर**

तालुक्यातील कुऱ्हा, काकोडा परिसरात ढगफुटी सदृश पाऊस पडल्याने शेती, गुरे व घरांचे अतोनात नुकसान झालेले आहे. तसेच काकोडा येथील युवक पावसाच्या पाण्यामुळे नाल्यात वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सर्व परिसरात पाणीच पाणी झालेले आहे. २००६ नंतर प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात पाऊस पडला असून त्या वेळच्या महापुराची आठवण नागरिकांच्या चर्चे चा विषय बनला आहे.

तालुक्यातील पारंबी, कुऱ्हा, वडोदा, हिवरा, राजुरा, जुने व नवे बोरखेडा, मोरखेडा, चिंचखेडा खुर्द, जुनी खोरी काकोडा या सर्वच परिसरामध्ये अतिशय जोरदार अशी अतिवृष्टी झाल्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नागरिकांच्या घरात पावसाचे पाणी शिरलेले आहे. मोरझीरा व कुऱ्हा परिसरातील शेतातील केळी पिके वाहून गेलेले आहे. काही शेतकऱ्यांची कापूस, तूर यासारखी पिके पावसाच्या पाण्यात वाहून गेली आहेत.



कुऱ्हा गावामध्ये गोरक्षण गंगा नदीचे पाणी पूर्णपणे गावात शिरलेले असून काठावरील दोन्ही बाजूच्या दुकानांना व घरांना पूर्णपणे झळ पोहचलेली आहे. विशेष म्हणजे गोरक्षण गंगा नदीच्या काठावरच संपूर्ण मार्केट वसलेले असल्याने पूर्ण मार्केटमध्ये पाणीच पाणी पसरले हे असून मार्केट मधील अनेक व्यापाऱ्यांची दुकाने पुरात वाहून गेली आहेत. परवा रात्रीपासूनच पावसाची रिमझिम सुरू होती मात्र पाहता पाहता सकाळी आठ वाजेपासूनच अतिवृष्टीला सुरुवात झाली पावसाने उग्ररूप धारण केले व ढगफुटी सदृश्य असा पाऊस या परिसरात पडला.

जोंधनखेडा धरणाच्या व पाणलोट क्षेत्राच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला यामध्ये शेती पूर्णपणे नष्ट झाल्याचे दिसून आले, काकोडा येथील जुनी खोरी जवळील धरणावरून सुद्धा पाणी मोठ्या प्रमाणात वाहण्यास सुरुवात झाल्याचे दिसून आले. मुक्ताईनगरचे तहसीलदार गिरीश वखारे यांनी तातडीने कुऱ्हा परिसरात भेट दिली. झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावे व नुकसान भरपाई त्वरित मिळावी, अशी मागणी नागरिकांनी यावेळी तहसीलदारांना केली.

# पुराच्या पाण्याचा अनेक गावांमध्ये शिरकाव

**पाचोरा** : तालुक्यातील शिंदाड, राजुरी, निंभोरे, वानेगाव, वाडी-शेवाळे यासह परिसरात सोमवारी मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांना मोठा पूर आला. डोंगर माथ्यावर झालेल्या अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराच्या पाण्याने गावांमध्ये शिरकाव करत घरांचे, शेतीचे तसेच गुराढोरांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

पुरामुळे अनेक शेतकऱ्यांचे पिके वाहून गेली असून घरांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचेही प्राथमिक अहवालात समोर आले आहे.

या गंभीर परिस्थितीची आमदार किशोर पाटील यांचे सुपुत्र युवा नेते सुमित किशोर पाटील यांनी पूरग्रस्त गावांचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधून नुकसानग्रस्त शेतकरी व महिलांची विचारपूस केली. तसेच शासनाकडून तातडीने मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. या दौऱ्यात जिल्हाप्रमुख रावसाहेब पाटील, प्रांताधिकारी भूषण अहिरे, तहसीलदार विजय बनसोडे, माजी आमदार दिलीप वाघ,वैशाली सूर्यवंशी,शहर प्रमुख सुमित सावंत, तसेच शेतकरी सेना प्रमुख सुनील पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पूरग्रस्तांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करावी, अशी मागणीही यावेळी गावकऱ्यांकडून करण्यात आली. पावसामुळे झालेल्या या नुकसानीमुळे शेतकरी हतबल झाले असून सर्वसामान्य ग्रामस्थांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे.



पाचोरा तालुक्यात नुकसानीची पाहणी करताना प्रांताधिकारी भूषण अहिरे, तहसीलदार विजय बनसोडे आदी.

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षपदी अरुण माळी बिनविरोध




**एरंडोल** : येथील रोटरी परिवारातील ज्येष्ठ सदस्य व खजिनदार अरुण माळी यांची महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ते प्रादेशिक विभाग धुळे, जळगाव व नंदुरबार व विभागीय क्षेत्रात कार्य करणार आहेत. ज्येष्ठ नागरिक संघाचे तीन जिल्ह्यात एकूण ४७० सदस्य असून, सर्वांचा विश्वास मिळाल्याने अध्यक्ष म्हणून सेवा करण्याची संधी अरुण माळी यांनी मिळाली आहे. ते निवृत्त तहसीलदार आहेत.














महाराष्ट्र चे सुप्रसिद्ध ज्योतिषी १५० वर्षाची परंपरा असलेले
श्रीभृगूज्योतिषकेंद्र
तुमच्या जिवनातल्या कोणत्याही कठिण समस्यांचे तुरंत १०१ % कायम स्वरुपी समाधान.जिथं समस्या आहेत,
तिथं "निराकरण" ही आहे । गरज आहे,ती योग्य मार्ग दर्शनाची ।
समस्या,चिंता,निराशा,सोडा,एकदा येऊन प्रत्यक्ष भेटा.
मंत्र-सिध्द रुद्राक्ष व रत्ने (खडे),मंत्रसिध्दसर्व यंत्र
(अनुभव हिच खात्री) दादावाडी जळगाव
मो.9822774151,9823047811

## महत्त्वाचे

### श्रीप्रभू विश्वकर्मा पूजन आज भव्य युवा संमेलन

**जळगाव :** श्रीप्रभू विश्वकर्मा पूजन तसेच विश्वकर्मा समाजातर्फे भव्य युवा संमेलनाचे आयोजन बुधवारी (१७ सप्टेंबर) सकाळी ११ ते दुपारी तीन या वेळेत शहरात महाबळ परिसरात मायादेवी मंदिराजवळ हातनूर वसाहत हॉल येथे पार पडणार आहे. समाजातील एकता,प्रगती आणि युवकांना प्रेरणा देण्याच्या अनुषंगाने विश्वकर्मा युवाशक्ती प्रतिष्ठानतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी जिल्हाधिकारी, ज्येष्ठ समाजसेवक तसेच विविध मान्यवरांची उपस्थिती असणांर आहे. कार्यक्रमात कारपेंटर बांधवांसाठी लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला आहे. भाग्यवान विजेतांना ड्रीम मशीन व कटर मशीनचे वाटप केले जाणार आहे. विश्वकर्मा युवाशक्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र निकम यांनी याकामी पुढाकार घेतला आहे. विश्वकर्मा समाजातील युवकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### तरुणावर हल्लाप्रकरणी चौघांवर पोलिसात गुन्हा

**जळगाव :** जुन्या वादातून तरुणाला पकडुन त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करुन हर्षल पाटील याला संशयितांनी गंभीर जखमी केले होते. रविवारी (१४ सप्टेंबर) सायंकाळी रामेश्वर कॉलनीत राज माध्यमिक विद्यालयाजवळ ही घटना घडली होती. याप्रकरणी जखमी नितीन देशमुख (वय २१, रामेश्वर कॉलनी) याच्या तक्रारीनुसार चौघांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा सोमवारी (१५ सप्टेंबर) एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला.

नितीन देशमुख या तरुणाने तक्रार दिली. त्यानुसार सोहम गोपाल ठाकरे, दिनेश भरत चौधरी, सनी उर्फ फौजी बाळकृष्ण जाधव, सागर फुलचंद जाधव (सर्व रा.रामेश्वर कॉलनी) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक राहुल तायडे हे तपास करीत आहेत.

### भरधाव कारची सायकलला धडक खंडेरावनगरातील रहिवाश्याचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**जळगाव,१६ सप्टेंबर**

समोरुन भरधवा वेगातील ओमनी कारने धडक देताच सायकलस्वार रस्त्यावर पडुन गंभीररित्या जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला. मंगळवारी (१६ सप्टेंबर) सकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास ही घटना शहरातील इच्छादेवी चौकात घडली. वसंत प्रताप पाटील (वय ७०,रा. खंडेरावनगर) असे मयताचे नाव आहे.

सायकलवर स्वार होत सकाळी वसंत पाटील हे त्यांच्या खंडेरावनगरातील घरी महामार्गाच्या कडेने जात होते. समोरून चुकीच्या मार्गाने चालक भरधाव वेगाने ताब्यातील कार घेऊन येत होता. चालकाच्या बेजबाबदारपणाने सायकलला धडक दिली. त्यानंतर वंसत पाटील रस्त्यावर कोसळत जखमी झाले. प्रत्यक्षदर्शीनी घटनास्थळी धाव घेत जखमीला तत्काळ खाजगी वाहनाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविले असता डॉ. हनिफा मोमीन यांनी तपासणीत त्यांना मृत घोषित केले. अपघाताची माहिती मिळताच वसंत पाटील यांच्या कुटुंबियासह नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली. या घटनेची नोंद जिल्हापेठ पोलीस ठाण्यात करण्यात आली.



गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

अंकासाठी संपर्क
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९८३४७४५४२२
९६२३६०४७१२

# कॅन्सर तज्ज्ञ डॉ. नीलेश चांडक यांचे कार्य प्रशंसनीय

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर : निःशुल्क सेवा देत ११ कॅन्सर रुग्णांना जीवदान दिल्याबद्दल सन्मान

**जळगाव :** ''वैद्यकीय सेवा ही वैद्यकीय व्यवसाय होत चालल्याच्या काळात कॅन्सर रुग्णांवर मोफत उपचार करून सेवाभाव जपणारे डॉ. नीलेश चांडक यांचे कार्य प्रशंसनीय आहे, त्यांचा आदर्श अन्य डॉक्टरांनीही घ्यावा,'' असे गौरवोद्‌गार आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी काढले. धुळे जिल्हा रुग्णालयात मंत्री आबिटकर यांच्याहस्ते अद्ययावत कार्डियाक कॅथ लॅबचा लोकार्पण सोहळा शनिवारी झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार काशीराम पावरा, आमदार मंजुळा गावित, आमदार राम भदाणे, भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सयाजी भामरे, आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉ. सुनीता गोलाईत, आरोग्य विभागाचे उपसंचालक डॉ. कपिल आहेर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्ता देगावकर, माजी आमदार प्रा. शरद पाटील उपस्थित होते.

### चांडक यांनी केलेल्या ११ शस्त्रक्रिया

शस्त्रक्रियेत काहींना जबड्याचा तर काहींना जिभेचा कॅन्सर होता. शस्त्रक्रियेनंतर लगेच प्लास्टिक सर्जरी सुद्धा करण्यात आली. तर काहींना श्वसननलिकेत बाहेरून केलेल्या छिद्राद्वारे ट्रेकिऑस्टोमी शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात आली. ११ पैकी १० रूग्णाना प्लास्टिक सर्जरीची गरज पडली.त्यात एकाचे रक्त केवळ ५ टक्के इतके कमी तर एकाला हृदयविकार ई. व्याधी असतांना ह्या शस्त्रक्रिया सुरळित पार पडल्या.

**सेवाभाव वृत्तीचा सन्मान**

धुळे येथील शासकीय रुग्णालयातील ११ कॅन्सर रुग्णांवर डॉ. नीलेश चांडक यांनी कॅन्सरच्या रूग्णांवर विनामूल्य क्लिष्ट शस्त्रक्रिया आणि सोबतच प्लास्टीक सर्जरी करीत साामाजिक बांधिलकी जोपासली. या सेवाभावामुळे त्यांचा आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. डॉ. चांडक यांच्यासमवेत धुळे जिल्हा रुग्णालयातील भूलतज्ञ विभागप्रमुख डॉ. अश्विनी भामरे, त्यांचे सहकारी डॉ. रवींद्र सोनवणे, डॉ. सुवर्णा सूर्यवंशी, मुखरोग विभागाचे प्रमुख डॉ. नितीन पाटील, डॉ. अटलानी आदींचा उत्कृष्ट कार्याबद्दल आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**डॉ. चांडक यांच्या अमूल्य सहकार्याने शस्त्रक्रिया शक्य झाल्या - जिल्हा शल्य चिकित्सक, धुळे**

डॉ. दत्ता देगावकर यांनी डॉ. नीलेश चांडक यांच्या कार्याचा लेखाजोखा यावेळी मांडला. डॉ. चांडक यांनी कॅन्सरच्या जटिल आणि खर्चिक शस्त्रक्रिया मोफत सेवा देऊन केल्या. त्यांच्या या सेवेमुळेच व अनमोल सहकार्यामुळे ११ रुग्णांना जीवदान देण्यात यश आले.

**११ रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया**

कॅन्सरतज्ज्ञ डॉ. चांडक हे महाराष्ट्र कॅन्सर संघटनेचे वॉरीअर आहेत. आरोग्य मंत्रालयातून कॅन्सर सर्जन म्हणून डॉ. चांडक ह्यांची नियुक्ती केली आहे.




डॉ. नीलेश चांडक यांनी नि:शुल्क सेवा देत रुग्णांना जीवदान दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. खासगी डॉक्टरांनी अशा पद्धतीने सेवाभाव वृत्तीने पुढे आल्यास निश्चितच लोकांच्या मनात डॉक्टरांविषयी अधिक सन्मान वाढणार आहे. अन्य खासगी डॉक्टरांनी डॉ. चांडक यांचा आदर्श घेऊन पुढे यावे.

**- प्रकाश आबिटकर, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**

# आज कोणत्याच पक्षाचा झेंडा नाही... शेतकरी हाच अजेंडा...मोर्चात सामिल व्हा

## शेतकरी संघटनेसह राजकीय पक्षनेत्यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१६ सप्टेंबर**

शेतकऱ्यांच्या मुलभूत प्रश्नांना पदरात पाडुन घेण्यासाठी बुधवारी (१७ सप्टेंबर) दुपारी एक वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला वंदन करुन शेतकरी जनआक्रोश मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. या मोर्चात सामील होणाऱ्या पक्ष संघटनांनी त्यांचा झेंडा बाजुला ठेवला आहे. या मोर्चाचे नेतृत्व माजी आमदार बच्चू कडू, माजी खासदार उन्मेष पाटील हे करणार आहेत. सर्व शेतकऱ्यांनी तसेच शहरातील शेतकरी पुत्रांनी या मोर्चात सहभागी होऊन जगाच्या पोशिंद्याला ताकद द्यावी, असे आवाहन मंगळवारी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शेतकरी संघटनेचे नेते तसेच सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेतून केले.

**शेतकरी होरपळतोय : उन्मेष पाटील**

माजी खासदार तथा उध्दव शिवसेना नेते उन्मेष पाटील यावेळी म्हणाले, शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सरकारकडे वेळ नाही. शेतकरी आज होरपळतोय. शेतकरी अजेंडा ठेवून संस्था, संघटना, राजकीय पक्षांच्या बैठकीत विचारविनिमय झाला. १५ तालुक्यात मिटींग्ज घेतल्या. शेतकऱ्यांच्या समस्या समजुन घेतल्या. त्यानंतर जनआक्रोश मोर्चात सामील होण्याचा निर्णय राजकीय पक्षाच्या तसेच शेतकरी संघटना, बागायतदार संघ पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निर्णय घेतला. त्यानुसार मोर्चा बुधवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर जाणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात विमा प्रतिनिधी, कृषी विभागातील प्रतिनिधी, पणन प्रतिनिधी हजर असतील. शेतकऱ्यांच्या विमा कवच संदर्भात फैसला केल्याशिवाय मोर्चा मागे घेतला जाणार नाही, असा निर्धार असणार आहे, असा इशाराही त्यांनी दिला.



### प्रमुख मागण्या

कापसाला हमी भाव, पीक विमा, केळीला बोर्डावरील भाव तसेच पीक विमा, शेतकऱ्याला कर्जमुक्ती, सोयाबीन, ज्वारी यांना हमीभाव देण्यात यावा या प्रमुख शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी तसेच मागण्यांसंदर्भात ठोस निर्णय होण्यासंदर्भात शेतकरी जनआक्रोश मोर्चात भर देण्यात आला आहे, अशी माहिती यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिली. शेतकरी संघटनांसह उध्दव सेना, राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शेतकरी संघटना तसेच सामाजिक कार्यकर्ते शिवराम पाटील, छावाचे भीमराव मराठे आदिंनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले.

**मोर्चात सामील व्हा : प्रमोद पाटील**

गेल्या पाच वर्षात पहिल्यांदाच शेतकऱ्यांचा बुधवारी ( १७ सप्टेंबर) जनआक्रोश विशाल मोर्चा निघणार आहे. शेतकऱ्यांच्या केळी, कापसाला हभी भाव आणि पीक विम्याची रक्कम, दूध उत्पादकांना अनुदान, सोयाबीन, ज्वारीला भाव तसेच कर्जमाफी या विषयांना धरुन हा मोर्चा निघणार आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी, शेतकरी पुत्रांनी या मोर्चात सहभागी व्हावे आणि झोपलेल्या सरकारला जागे करावे, असे आवाहन राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनी केले.

**१५ दिवसाचा अल्टीमेटम : गुलाबराव वाघ**

शेतकऱ्यांच्या शेती मालाला हमीभाव नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. सरकारकडे यंत्रणा असताना शेतकऱ्यांनाच पीकपेरा लावण्यासाठी सक्ती केली जात आहे. सर्वच शेतकऱ्यांना ऑनलाईन पेरा लावता येईल, असे नाही. त्यामुळे ही अजब तऱ्हा आहे. मोर्चाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्यात येईल. १५ दिवसांचा अल्टीमेटम दिला जाईल. त्यानंतर कृती समितीच्या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल. या मोर्चात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे, असे आवाहन शिवसेनेचे गुलाबराव वाघ यांनी केले.

**तुम्हीही सामील व्हा : शिवराम पाटील**

शेतकऱ्यांच्या हितासाठी सामाजिक संघटना बच्चु कडू यांच्या सोबत या मोर्चात सामील होत आहेत. आम्हीही जाइन्ट झालो. थोडी कामे बाजुला सारुन या मोर्चात सामील होण्यासाठी शेतकऱ्यांनी जळगावला आले पाहिजे. यातून शासनाला जाणीव होईल. कोणीतरी दखल घेत आहे, यासाठी शेतकऱ्यांनी आले पाहिजे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते शिवराम पाटील यांनी केले.

काँग्रेसचे शामकांत तायडे, मनसेचे जमील देशपांडे, शेतकरी संघटनेचे संदीप पाटील, सुनील देवरे, छावाचे भीमराव मराठे यांनी या मोर्चात ताकदीने सामील होऊ, असे स्पष्ट करत शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.

यावेळी कुलभूषण पाटील, शरद तायडे, अशोक लाडवंजारी, एजाज मलिक, नीलेश चौधरी, संग्राम पाटील, भाऊसाहेब सोनवणे, राजु नवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




# नवीन संकल्पना विद्यार्थ्यांनी शिकण्याची गरज -कुलगुरू

## केसीई सोसायटीचा वर्धापन दिन थाटात

**जळगाव :** खान्देश कॉलेज एज्युकेशन (केसीई) सोसायटीने आपल्या गुणवत्ता आणि क्षमता यांचा आदर्श खान्देशातील सर्वसामान्य पिढीला देऊन शिक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर केले. ८१ वर्षात खान्देशात आपले शैक्षणिक क्षेत्रात निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांना झेन. जी. सारख्या नवनवीन संकल्पना अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शिकवणे आता काळाची गरज झाली आहे, असे प्रतिपादन कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.विजय माहेश्वरी यांनी खान्देश कॉलेज एज्युकेशन (केसीई) सोसायटीच्या ८१ वा वर्धापन दिनी मनभावन संकुलातील कान्ह कला मंदिर येथे केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश पाटील, सचिव ॲड.प्रमोद पाटील, सहसचिव ॲड. प्रवीणचंद्र जंगले, कोषांध्यक्ष डी.टी.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिल्पा बेंडाळे, प्राचार्य अशोक राणे, डॉ. हर्षवर्धन जावळे, भालचंद्र पाटील, संजय प्रभुदेसाई आणि शैक्षणिक संचालक प्रा.मृणालिनी फडणवीस आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या १६ शाखांनी एकाच वेळी आपापल्या वाटचालीची माहिती सादर केली. सोहळ्याची सुरुवात दीपप्रज्वलन व शैक्षणिक संचालक प्रा.मृणालिनी फडणवीस यांनी प्रास्ताविकात बोलताना सांगितले की, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार, केसीई सोसायटी आता अभियांत्रिकी, व्यवस्थापन, विज्ञान, कला, वाणिज्य, भारतीय ज्ञान प्रणाली भारतीय संगीत, रिफ्लेक्सोलॉजी, निसर्गोपचार आणि योग विज्ञान अशा विविध शाखांमध्ये पदवी, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देत आहे.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश पाटील यांनी केसीई सोसायटीची स्थापनेपासूनच्या कार्याचा आढावा घेऊन मागील पाच वर्षांत आयएमआर, इंजिनीअरिंग, मुलांचे वसतिगृह, लॉ कॉलेज आणि ५०० आसन क्षमतेचे सुसज्ज नाट्यगृह अशा सुविधांची भर पडली आहे, असे नमूद केले. या कार्यक्रमात संस्थेचा गौरवशाली इतिहास आणि वाटचाल दर्शवणारी चित्रफीत दाखवण्यात आली. सूत्रसंचालन प्रा.भाग्यश्री भलवतकर आणि मुख्याध्यापक प्रणिता झांबरे यांनी केले. आभार सचिव ॲड. प्रमोद पाटील यांनी मानले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आज स्वच्छता मोहिमेने अभियानाची सुरुवात

**जळगाव :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर सेवा पंधरवडा हा उपक्रम राबविला जाणार आहे, अशी माहिती भाजपा जिल्हा महानगर अध्यक्ष दीपक सूर्यवंशी यांनी दिली.

या उपक्रमाची बुधवारी सकाळी सात वाजता स्वच्छता अभियानाने सुरुवात होईल. आमदार सुरेश भोळे, जिल्हा महानगर अध्यक्ष दीपक सूर्यवंशी व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नेरी नाका स्मशानभूमी येथून मोहिमेला सुरुवात होऊन गाडगेबाबा चौक महाबळ, मेहरूण स्मशानभूमी येथे समारोप होईल. या उपक्रमात स्वच्छता अभियान, 'एक पेड माँ के नाम' (वृक्षारोपण कार्यक्रम ), रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर, पंतप्रधानांच्या जीवनावर आधारित जीवनपट फिल्म प्रकाशित, प्रबुध्द नागरिक, दिव्यांग व अन्य प्रतिभावान व्यक्तींचा सन्मान, वोकल फॉर लोकलचा कार्यक्रम, पंतप्रधानांच्या जीवनावर प्रकाशित पुस्तकांचे वाटप केले जाईल.

तसेच खासदार क्रीडा चषक स्पर्धा, विकसित भारत चित्रकला स्पर्धा,मोदी विकास मॅरेथॉन, पंतप्रधान मोदी यांच्या जीवनावर प्रदर्शिनी, पंडित दिनदयाळ जयंती (२५ सप्टेंबर), गांधी जयंती ( २ ऑक्टोबर) आदी कार्यक्रमांचा त्यात समावेश आहे,अशी माहिती अभियान प्रमुख विजय वानखेडे यांनी दिली.

# जिल्ह्यात आजपासून स्वच्छता ही सेवा पंधरवडा

## सीईओ करनवाल यांची माहिती

**जळगाव :** स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२५ पंधरवडा १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ''स्वच्छोत्सव'' या थीमखाली साजरा करण्यात येणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेनुसार हा उपक्रम जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये राबविला जाणार आहे. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व नागरिक, संस्था, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच विविध विभागांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मीनल करनवाल यांनी केले आहे.

या पंधरवड्यादरम्यान प्रमुख उपक्रमांतर्गत अस्वच्छ ठिकाणांची निवड करून साफसफाई करणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सफाईमित्र सुरक्षा शिबिरे, पर्यावरणपूरक व शून्य कचरा उत्सव, स्वच्छ सुजल गाव संकल्पनेशी निगडित प्रबोधनपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच या कालावधीत विशेष ग्राम सभांचे आयोजन करून हागणदारीमुक्त अधिक मॉडेल गाव व स्वच्छ सुजल गाव घोषित करण्याचे उद्दिष्ट आहे.

२५ सप्टेंबर ''एक दिवस एक तास एक सोबत'' या संकल्पनेतून देशव्यापी श्रमदान आयोजित करण्यात आले आहे. नागरिकांनी आपल्या गावात सामूहिक श्रमदान करून स्वच्छता मोहिमेला हातभार लावावा, असे आवाहनही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

१७ सप्टेंबर या अभियानाचा शुभारंभ होणार असून यात स्थानिक संस्था, विविध विभाग, कार्यालये, लोकप्रतिनिधी, सेलिब्रिटी, सामाजिक कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्था यांचा सहभाग घेऊन प्रभावी जनजागृती राबविण्यात येणार आहे.

# पाय घसरुन पडल्याने मृत्यू

**जळगाव :** कामावर जात असताना पाय घसरून पडल्याने डोक्याला मार लागुन तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (१५ सप्टेंबर) संध्याकाळी समोर आली. शंकर मधुकर बाऊस्कर (४२, रा. आयोध्यानगर, हनुमाननगर) असे मयमताचे नाव आहे.

मजुरी काम करणारे शंकर बाऊस्कर सकाळी कामावर जात असताना हनुमान नगरातून एमआयडीसीकडे जाणाऱ्या रस्त्यावर गटारीशेजारी असलेल्या दगडावरून त्यांचा पाय घसरला व ते गटारीत पडले. त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. दुपारी ते जेवायला आले नाही. त्यानंतर संध्याकाळी काही महिलांनी गटारीमध्ये एक जण पडलेले असल्याची माहिती दिली, त्या वेळी ही घटना उघडकीस आली.

या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# जिल्ह्यात सातपुडा पर्वतामध्ये आढळली दुर्मीळ जीवक आमरी वनस्पती

## राज्यात घेतली पहिलीच नोंद

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर**

जळगाव जिल्ह्याला लाभलेल्या सातपुडा पर्वत रांगा अनेक दुर्मीळ वनस्पतींनी समृद्ध आहेत. सातपुडा पर्वत रांगा पश्चिम घाट, पूर्व घाट आणि हिमालयात आढळणाऱ्या अनेक दुर्मीळ वनस्पतींशी दृढ संबंध दाखवतात. ज्या जंगलात आमरी म्हणजेच यक्षपुष्पांचे अस्तित्व असते ते जंगल उत्कृष्ट दर्जाचे मानले जाते. आमरींच्या (ऑर्किड) दृष्टिकोनातून हिमालय आणि पश्चिम घाट अत्यंत संवेदनशील मर्मस्थळे मानली जातात. परंतु सातपुड्यात आढळणाऱ्या यक्षपुष्पांची संख्या ही लक्षणीय आहे. नवीन संशोधनातून यक्षपुष्पांची विविधता आणि घनता या दोन्ही बाबतीत सातपुड्याचे महत्व अधोरेखित होत आहे.



नुकतीच वन्यजीव संरक्षण संस्थेच्या प्रसाद सोनवणे, राहुल सोनवणे व नॅचरल हिस्टरी एज्यु.अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे चे मयुरेश कुळकर्णी यांनी यावल तालुक्यातील सातपुडा पर्वत रांगांतून महत्वपूर्ण नोंद केली. ती म्हणजे क्रेपिडियम मॅकिंनोनी (जीवक आमरमी) जी महाराष्ट्रासाठी नवीन आहे.



यासंबंधीचा शोधनिबंध नुकताच या विज्ञान पत्रिकेत प्रसिद्ध झाला आहे. या संशोधनाने महाराष्ट्राच्या समृद्ध यक्षपुष्पांच्या यादीत अजून एका आमरीची भर पडली आहे.

या संशोधनात त्यांना यावल उपवनसंरक्षक जमीर शेख आणि दिपकराव घाणेकर, डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, अहिल्यानगर यांच्यासह आकाश राऊत, बाळकृष्ण देवरे, ध्रुव सोनवणे, निनाद सोनवणे, मयुरेश सोनवणे, संस्था अध्यक्ष रवींद्र फालक, योगेश गालफाडे, ऋषी राजपूत, सतीश कांबळे, नीलेश ढाके, मुकेश सोनार, प्रदीप शेळके, नितीन जोशी यांचे सहकार्य लाभले.

जिवक आमरी ही सातपुड्यात डोंगर उतारांवर, जंगलातील ओलसर जागी, पालापाचोळ्यात वाढणारी अत्यंत छोटेखानी, जमिनीवर पसरलेली २-३ पाने असलेली ऑर्किड प्रजाती आहे. पानांच्या बेचक्यातून सुमारे २० सेमी उंचीचा पुष्प संभार उगवतो. पुष्पसंभारात अनेक फुले असतात. या वनस्पतीचा आकार जवळपास २० सेमी असून तिचे फुल अत्यंत सूक्ष्म ५ मिमी आकाराचे असते. ही वनस्पती अत्यंत लहान असल्यामुळे जंगलातील पालापाचोळ्यात सहसा नजरेसही पडत नाही. इतर ऑर्किड प्रमाणे हिच्या फुलातील लीप (खालची वैशिष्ट्यपूर्ण पाकळी ) फुलाच्या वरच्या बाजूस असते.

**-राहुल सोनवणे,**
**वनस्पती अभ्यासक, वन्यजीव सरक्षण संस्था**

या वनस्पतीच्या अत्यंत छोट्या आकारामुळे हीचे जंगलातील अस्तित्व लक्षात येत नाही. गुरेचराई, जंगलतोड, वनांवरील अतिक्रमण यामुळे या वनस्पतीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हे ऑर्किड या आधी उत्तराखंड, ओडिशा, राजस्थान, मध्यप्रदेश राज्यातून नोंदवलेले असून या वनस्पतीचा जळगांव जिल्ह्यातील सातपुडा पर्वत रंगातून शोध लागणे हे जिल्ह्यातील सातपुडा पर्वत रांगांच्या वनस्पती संपन्नतेचे प्रतीक आहे.

**-प्रसाद सोनवणे, वनस्पती अभ्यासक, वन्यजीव संरक्षण संस्था**

महाराष्ट्रात असलेल्या ऑर्किडच्या जैवविविधतेमध्ये सातपुडा पर्वतरांग ही नेहमीच नवीन प्रजातींची भर घालत असते. समृद्ध अशा सातपुडाच्या जंगलामध्ये क्रिपेडियम मेकॅनोनीसारखे ऑर्किड सापडणे हे त्याचेच एक उदाहरण आहे. ऑर्किड सारख्या संवेदनशील वनस्पतींचे संवर्धन करणे व त्यांना नैसर्गिक अधिवासाला धोका होईल असे कुठल्याही प्रकारच्या कामाला प्रोत्साहन मिळू नये.

**-मयुरेश कुळकर्णी, वनस्पती अभ्यासक**

## थोडक्यात महत्त्वाचे....



### डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरपी महाविद्यालयातर्फे जागतिक फिजिओथेरपी दिन सप्ताहानिमित्त रॅली

**जळगाव :** जागतिक फिजिओथेरपी दिन सप्ताहानिमीत्त डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरपी महाविद्यालय यांच्यावतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीचे आयोजन प्राचार्य डॉ. जयवंत नागुळकर, राहुल गिरी, डॉ. अमित जायसवाल आणि डॉ. रिया अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली काढण्यात आली. रॅली भाऊंचे उद्यान येथून सुरू होऊन गांधी उद्यान, जळगाव येथे समारोप झाला. या रॅलीचे यावर्षीचे विशेष थीम सुदृढ वार्धक्य, अशक्तपणा व पडणे टाळा तसेच फिजिओथेरपीचे आरोग्यातील महत्त्व पटवून देणे याचबरोबर खरे आणि खोटे फिजिओथेरपिस्ट यामध्ये फरक ओळखण्याबाबत जनजागृती करणे हे होते. रॅलीचा प्रारंभ व समारोप स्थळी विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर नाटिका सादर केली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. जयवंत नागुळकर यांनी जनतेला फिजिओथेरपीचे खरे महत्त्व समजून घेण्यास व केवळ पात्र फिजिओथेरपिस्ट कडूनच उपचार घेण्यास प्रवृत्त केले. या रॅलीमध्ये जनजागृतीपर फलक घेऊन सर्व शिक्षक, विद्यार्थी तसेच जळगाव डिस्ट्रिक्ट फिजिओथेरपी असोसिएशनचे सदस्य मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

### मुक्ती फाउंडेशन, अरुश्री परिवारातर्फे आज महिलांसाठी आरोग्य शिबिर, स्वच्छता अभियान

**जळगाव :** विश्वनेता, देशाचे लाडके प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताहांतर्गत शासनासह सामाजिक स्तरावर सर्वत्र स्वस्थ नारी सशक्त परिवार व स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. सामाजिक बांधिलकीतून सामाजिक सेवाभावी संस्था मुक्ती फाउंडेशन व अरुश्री परिवार यांच्या माध्यमाने विशेष मोफत आरोग्य तपासणी, मार्गदर्शन शिबिर तसेच स्वच्छता अभियान १७ सप्टेंबर रोजी आयोजित केले आहे. रिंगरोडवरील महेश प्रगती हॉलशेजारील श्रीराम भवन, अरुश्री हॉस्पिटल येथे सकाळी ११ ते दुपारी २ वाजे दरम्यान हे अभियान राबवले जाईल. डॉ. स्वाती परीक्षित बाविस्कर या आरोग्य शिबिरांतर्गत हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड, जनरल तपासणी आदी करतील. आयोजकांच्यावतीने स्वच्छता अभियानानिमित्त श्रीराम भवन परिसरात स्वच्छता करण्यात येणार आहे. महिलांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुक्ती फाउंडेशनतर्फे मुकुंद गोसावी यांनी केले आहे.




### अरुणामाई फार्मसी महाविद्यालयाला 'एम. फार्मसी' अभ्यासक्रमास मान्यता

**ममुराबाद (ता. जळगाव):** शेलिनो एज्युकेशन सोसायटीच्या अरुणामाई कॉलेज ऑफ फार्मसी, ममुराबाद या कॉलेजला फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी एम. फार्मसी (फार्मास्युटिक्स) ९ जागा आणि एम. फार्मसी (क्वालिटी ॲश्युरन्स) ९ जागा या दोन नवीन अभ्यासक्रमांना परवानगी दिली आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थाध्यक्ष आर. जी. पाटील यांचा महाविद्यालयात विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य, सर्व प्राध्यापक वर्ग, तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या यशामुळे जळगाव जिल्ह्यातील फार्मसी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी उत्कृष्ट संधी उपलब्ध झाली आहे. पाटील यांनी मनोगतात सांगितले की, ''विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी संस्थेच्यावतीने असे नवनवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहू.'' महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आणि प्राध्यापकांनीही या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा, प्रयोगशाळा व संशोधनासाठी आवश्यक सर्व साहित्य उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.



### हिंदी महिना अन् सतर्कता अभियाना दरम्यान सेंट्रल बँकतर्फे चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**जळगाव :** शहरात हिंदी महिना आणि सतर्कता अभियानाच्या दरम्यान सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांनी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध चित्रे रेखाटली ज्यामध्ये पर्यावरण, नवीन इंधन आणि जलसंवर्धन आदी विषयांचा समावेश होता. जळगाव येथील सरस्वती विद्या मंदिर विद्यालयात सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित चित्रकला स्पर्धेत मुलांनी सुंदर चित्रे रेखाटून सर्वांचे मन मोहून टाकले. हिंदी महिना आणि सतर्कता अभियानाच्या दरम्यान विद्यालय परिसरात ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत प्राथमिक स्तरावरील जवळपास २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमासाठी बँकेचे प्रतिनिधित्व करताना हर्षल भगत, मुख्य व्यवस्थापक यांनी विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना जीवनात भ्रष्टाचाराविरुद्ध जागरूकतेचा संदेश दिला. पर्यावरणावर आधारित या स्पर्धेत बँकेच्या हरित अभियानावर भर देण्यात आला. विजेत्या विद्यार्थ्यांची निवड विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती निलीमा यांनी केली. प्रथम पुरस्कार चौथी इयत्तेतून, द्वितीय आणि तृतीय पुरस्कार तिसरी इयत्तेतून तर दुसरी आणि पहिली इयत्तेतील विद्यार्थ्यांना दोन प्रोत्साहनपर पुरस्कार प्रदान करण्यात आले.




### भगीरथ इंग्लिश स्कूलमध्ये हिंदी दिन उत्साहात

**जळगाव :** येथील सुनीता जगन्नाथ वाणी भगीरथ इंग्लिश स्कूलमध्ये हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.पी. निकम होते. तसेच उपमुख्याध्यापक जे.एस. चौधरी, पर्यवेक्षक के. आर. पाटील, हिंदी भाषा समितीतील सर्व शिक्षक उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमा पूजन व माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हिंदी दिनाबद्दल मनोगत व्यक्त केले. इयत्ता सहावीच्या विद्यार्थिनीने हिंदी दिनानिमित्त हिंदीतून कविता सादर केली. शिक्षक के. व्ही. पाटील तसेच विद्यार्थ्यांनी कविता व मनोगते व्यक्त केली. अलका पितृभक्त यांनी हिंदी गीत सादर केले. मुख्याध्यापक एस.पी. निकम यांनी मनोगतातून हिंदी दिनाचे महत्त्व सांगितले. सूत्रसंचालन इयता दहावीची गिरीजा व आभार नंदिनी यांनी मानले. या प्रसंगी हिंदी समितीप्रमुख संगीता पाटील, सदस्य उपस्थित होते.

# अद्यापही ३० टक्के शेतकरी ॲग्रीस्टॅक पासून बाहेर

## कृषी योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी नोंदणी आवश्यक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर**

गेल्या सप्टेंबर २०२४ पासून केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. ॲग्रीस्टॅक अर्थात शेतकरी ओळखपत्र अंतर्गत मंगळवार ९ सप्टेंबरअखेर जळगाव जिल्ह्यातील ६९.१७ टक्के शेतकरी खातेदारांची नोंदणी पूर्ण झाली आहे. मात्र असे असले तरी अद्यापही पीएम किसान योजनेतील ११ टक्के आणि करपात्र उत्पन्न असलेले जमीनधारक, बागायतदार असे ३४ टक्के शेतकऱ्यांनी अद्यापही शेतकरी विशिष्ट ओळख क्रमांक नोंदणी केलेली नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे केंद्र वा राज्य शासनस्तरावरून राबविल्या जाणाऱ्या कृषी योजनांव्दारे मिळणारा लाभापासून वंचीत राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**अग्रीस्टॅक नोंदणीमुळे लाभ मिळणे सुलभ होणार**

कृषिक्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ जलद गतीने व परिणामकारकरीत्या शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी केंद्र शासन स्तरावरून ॲग्रीस्टॅक डिजिटल अग्रिकल्चर मिशन योजना अर्थात शेतकरी ओळखपत्र योजना गेल्या वर्षभरापासून राबविण्यात येत आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणीच्या आधारेच पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेचा लाभ दिला जाणार आहे. याशिवाय पीक विमा, कृषी विभागांतर्गत इतर मदत, योजना, नुकसान भरपाई मिळणेही या नोंदणीमुळे सोपे होणार आहे.

**किसान योजनेसह अन्य खातेदार शेतकरी ॲग्रीस्टॅक विना**

प्रधानमंत्री योजनेचा लाभार्थी शेतकऱ्यांव्यतिरिक्त अल्प वा अत्यल्प भूधारक अथवा करपात्र उत्पन्न गटातील १ लाख ५९हजार ८५० शेतकऱ्यांपैकी १ लाख २५ हजार ७४४ म्हणजेच ८९.८४ टक्के शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण झाली असून ३४ हजार १०६ शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी करणे शिल्लक आहे. जिल्ह्यात पीएम किसान व जमीनदार शेतकरी असे एकूण १ लाख ८३ हजार ४२० (३० टक्के)शेतकऱ्यांनी अद्यापही ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही. ॲग्रीस्टॅक नोंदणी राहिलेल्या शेतकऱ्यांनी लवकर ही नोंदणी करावी, अन्यथा पीएम किसान योजनेचा लाभ मिळण्यात अडचणी येण्याची शक्यता असल्याचे दिसून येत आहे.

**अशी करा घरच्या घरी नोंदणी**

शेतकऱ्यांनी मोबाइलवर https://mhfr.agristack.gov.in/farmer-registry-mh/#/ या लिंकवर क्लिक केल्यानंतर नॅशनल इन्फॉरमेटिक सेंटर (एनआयसी) अर्थात अग्रिस्टॅक नोंदणीची माहिती दिसेल. त्यावर अकाउंट उघडून नंतर लॉगिन करता येईल. त्यात आवश्यक माहिती भरून अर्ज सबमिट केल्यास नोंदणी यशस्वी म्हणून संदेश मिळाला की नोंदणी प्रक्रिया पूर्ण होते. मात्र, अग्रिस्टॅक नोंदणी करण्यासाठी खातेदाराचा मोबाइल क्रमांक आधारशी लिंक करणे बंधनकारक आहे. त्याशिवाय नोंदणी करताना आवश्यक असलेला ओटीपी येत नाही.

**पीएम किसान लाभार्थी नोंदणीत आघाडीवर**

जळगाव जिल्ह्यांतर्गत ८ अ, ७/१२ नोंदी नुसार ७ लाख ५ हजार ५०९ शेतकरी ७/१२ खातेधारक आहेत. त्यात पंतप्रधान शेतकरी सन्मानच्या लाभार्थीची जिल्ह्यातील संख्या ५ लाख ४५ हजार ६५९ आहे. यापैकी फक्त ३ लाख ६२ हजार २३९ शेतकरी लाभार्थींनी ॲग्रीस्टॅकअंतर्गत नोंदणी केली आहे.




**शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण योजना**

ॲग्रीस्टॅक योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ मिळण्यास मदत होईल. तसेच जमीन नोंदी आणि इतर कामांमध्ये सोयीस्कर होईल. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च वाचेल. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पीएम किसान योजना, पीक विमा योजना आणि पीक कर्ज या सरकारी योजनांचा लाभ थेट मिळणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या शेती विषयक नोंदी डिजिटल पद्धतीने नोंदविल्या जाणार आहेत.

**- आयुष प्रसाद,**
**जिल्हाधिकारी, जळगाव**

**जिल्ह्यातील एकूण शेतकऱ्यांपैकी पीएम किसान आणि ॲग्रीस्टॅक असे एकूण नोंदणी संख्या तालुकानिहाय टक्केवारीनुसार**

| तालुका | ७/१२ नुसार शेतकरी | पीएम किसान लाभार्थी | ॲग्रीस्टॅक नोंदणी | एकूण टक्के |
|---|---|---|---|---|
| जळगाव | ४९२८४ | ३१६८४ | ६८.९७ | ५९.४७ |
| भुसावळ | २५४८४ | १६१३६ | ७२.५७ | ६६.३१ |
| यावल | ४९६३९ | ३९४१८ | ६३.८२ | ६५.३७ |
| रावेर | ५१६९८ | ४०४३४ | ६८.६० | ७१.२८ |
| मुक्ताईनगर | २९१४८ | २५४२१ | ६३.८६ | ७१.४८ |
| अमळनेर | ६४०८३ | ४६६५२ | ६७.४२ | ६७.९१ |
| चोपडा | ४९५९३ | ४२८६१ | ६७.३६ | ७५.४७ |
| एरंडोल | ३१९९२ | २४१४६ | ६७.१५ | ६७.८१ |
| पारोळा | ५०२६१ | ५०२०५ | ४९.७१ | ६९.२७ |
| चाळीसगाव | ८०७२३ | ६०७९९ | ६८.५७ | ७०.८७ |
| जामनेर | ७०३५३ | ५३८४८ | ७१.१७ | ७५.९८ |
| पाचोरा | ५६२३५ | ४१७४८ | ७०.१५ | ७३.३६ |
| भडगाव | ३७०७४ | २८३८० | ६६.८० | ६८.८१ |
| धरणगाव | ३८०२४ | २७१८९ | ६९.४९ | ६४.२२ |
| बोदवड | २१९१८ | १६७३८ | ६५.१४ | ७०.८७ |
| एकूण | ७०५५०९ | ५४५६५९ | ६६.३९ | ६९.१७ |



## संविधान सन्मान संमेलन सर्वसमावेशकतेसाठी प्रयत्न

### जळगावात २९-३० नोव्हेंबर रोजी राज्यस्तरीय संमेलनाच्या तयारीसाठी बैठक

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर**

जळगाव शहरात येत्या २९ व ३० नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित होणाऱ्या राज्यस्तरीय संविधान सन्मान संमेलनाच्या तयारीसाठी रविवारी जिल्ह्यातील महिलांची विशेष सभा घेण्यात आली. संमेलन सर्वसमावेशक व्हावे, यासाठी प्रयत्न करण्याचे ठरले. या सभेत संमेलनाचे मुख्य संयोजक मुकुंद सपकाळे यांनी संमेलनाची भूमिका विशद केली, तर जयसिंग वाघ यांनी संविधानासमोरील आव्हाने मांडली.

प्रा. डॉ. सत्यजित साळवे यांनी संमेलनाची गरज अधोरेखित करत त्याची रुपरेषा सादर केली. या सभेत उपस्थित महिलांनी संमेलन सर्वसमावेशक व्हावे, यासाठी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्य संयोजक मुकुंद सपकाळे होते त्यांनी सभेला संबोधित करताना सांगितले की, ''भारतीय संविधान हे केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून, देशातील प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी देणारे जीवनमूल्य आहे. या संमेलनाच्या माध्यमातून या आव्हानांवर मात करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे,'' असे त्यांनी ठामपणे मांडले. त्यांनी उपस्थित महिलांना संमेलनात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले.

प्रा. डॉ. सत्यजित साळवे यांनी संमेलनाची गरज आणि त्याची रुपरेषा सादर केली. संमेलनात चर्चासत्रे, कार्यशाळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असल्याचे सांगितले.

सूत्रसंचालन बापूराव पानपाटील यांनी, प्रास्ताविक भारती रंधे यांनी, तर आभार प्रदर्शन निरंजना तायडे यांनी केले.

सभेत उपस्थित महिलांनी संमेलन सर्वसमावेशक व्हावे, यासाठी आपल्या सूचना मांडल्या. त्यांनी महिलांच्या प्रश्नांना आणि त्यांच्या हक्कांना संमेलनात प्राधान्य देण्याची मागणी केली. तसेच ग्रामीण भागातील महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची सूचनाही केली.

पुष्पा साळवे, मंगला बोर्डे, पूजा साळवे, हेमा बावस्कर, श्वेता मेश्राम, रंजिता तायडे, रत्नमाला बिऱ्हाडे, संध्या तायडे, राधिका जावरे, कविता सपकाळे, सुनंदा वाघ, सरजू जाधव, संघमित्रा शिंगारे, शीला सुरवाडे, कुसुम सोनवणे, वंदना सोनवणे, मीरा वानखेडे, राजश्री सोनवणे, दीपमाला सुरवाडे, संगीता मोरे, कल्पना ब्राम्हणे, कमल ढिवरे असंख्य महिला उपस्थित होत्या. सभा यशस्वीतेसाठी दिलीप सपकाळे, महेंद्र केदारे यांनी परिश्रम घेतले.

## हेमलाल पाटील अन् वनिता हॉस्पीटल यांच्यातर्फे आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर**

समाजसेवक हेमलाल दौलत पाटील आणि वनिता मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल यांच्यातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

शिबिराचे उद्घाटन आमदार सुरेश दामू भोळे यांच्या हस्ते झाले. डॉ. भूषण सोमाणी यांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यात २८९ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

शिबिरात बी. पी., शुगर, ईसीजी तसेच बालरोग, जनरल सर्जरी, नाक, कान, घसा, हृदयरोग, स्टोन, प्रोस्टेट याची तपासणी करण्यात आली. काही प्रमाणात औषधीदेखील मोफत देण्यात आल्या. या उपक्रमाचा २८९ रुग्णांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाप्रसंगी आमदार सुरेश भोळे, आयोजक हेमलाल दौलत पाटील, भिका पाटील, देवसिंग पाटील, विजय पाटील, अनिल वाणी, भरतसिंग पाटील, अतुल बारी, भय्या पाटील, लालसिंग पाटील, आबा कापसे, राणे, अविनाश पाटील, निकम, प्रमोद सोमाणी, राहुल पाटील, दीपक पाटील, अनिल पाटील, शालिक पाटील, डॉ. भूषण पाटील, डॉ. नेहा काबरा, डॉ. अनुश्री अग्रवाल, विक्रम निगम उपस्थित होते.

प्रास्ताविक महेश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन बापू साळवे व प्रकाश बारी यांनी केले.

शिबिर यशस्वीतेसाठी चंद्रकांत मिस्तरी, रवींद्र पाटील, चेतन राजपूत, तानाजी राजपूत, तुषार राजपूत, समस्त ग्रामस्थ पिंप्राळा यांनी परिश्रम घेतले.




## डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरपी महाविद्यालयातर्फे शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर**

स्व. सौ. गोदावरी आई पाटील यांच्या स्मरणार्थ डॉ. उल्हास पाटील फिजिओथेरपी महाविद्यालय, जळगाव यांच्यावतीने प्राथमिक आरोग्य केंद्र, नशिराबाद येथे भव्य मोफत फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराचे उद्घाटन दीपप्रज्वलन करून प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव जाधव व डॉ. अजय पाल यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी अशा शिबिरांमुळे गावकऱ्यांना आरोग्यसुरक्षेची जाणीव होते आणि आरोग्यविषयक समस्या वेळेत ओळखून त्यावर योग्य उपचार मिळतात, असे प्रतिपादन केले. शिबिरात आलेल्या रुग्णांची सविस्तर तपासणी करून त्यांना विशेषतः सांधेदुखी, पाठदुखी, गुडघेदुखी, स्नायूंच्या समस्या तसेच पक्षाघातग्रस्त रुग्णांसाठी शारीरिक व्यायाम, उपचार पद्धती व आरोग्यदायी जीवनशैली याविषयी माहिती देण्यात आली. या शिबिरात मोठ्या संख्येने गावकरी सहभागी झाले.



या प्रसंगी प्रशासकीय अधिकारी राहुल गिरी, डॉ. अमीत जैस्वाल, डॉ. आशीष पाटील, डॉ. दिव्या पाटील, डॉ. मनोज सूर्यवंशी, डॉ. पवन चोपडे, डॉ. अश्विनी मालोकार, डॉ. जिज्ञासा अत्तरदे, डॉ. तेजल सोनवणे तसेच महाविद्यालयातील इतर विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिराचा उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे व फिजिओथेरपीच्या माध्यमातून विविध आजारांविषयी जनजागृती करणे हा होता.

## ट्रेलरखाली कारचा चक्काचुर

### महिलेचा मृत्यू ; पतीसह चालक जखमी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव,१६ सप्टेंबर**

पुणे येथून जळगावकडे परतणाऱ्या कारला भरधाव ट्रेलरने धडक दिली. या भीषण अपघातात मिताली सुभाष पाटील (५८, रा. विनोबा नगर) या महिलेचा जागीच मृत्यू झाला.

त्यांचे पती सुभाष राजाराम पाटील (६०) व चालक योगेश बारी (३५, रा. शिरसोली, ता. जळगाव) हे जखमी झाले. हा अपघात सोमवारी (१५ सप्टेंबर) रात्री अजिंठा घाटाच्या पायथ्याशी झाला. निवृत्त कृषी अधिकारी सुभाष पाटील व मिताली पाटील हे चालक योगेश बारी याच्यासह कारने (क्र. एमएच ०३, एडब्ल्यू २६६१) पुणे येथे मुलाला भेटण्यासाठी गेले होते. तेथून ते सोमवारी जळगाव येथे घरी परत येत होते. अजिंठा घाट उतरल्यानंतर टी पॉईंटनजीक मागून येणाऱ्या ट्रेलरवरील (क्र. एमएच २१, बीवाय ४९१६) चालकाचे नियंत्रण सुटले व ते थेट कारवर येऊन धडकले. कार या ट्रेलरच्या खाली दबून तिचा चक्काचूर झाला. स्थानिक नागरिकांच्या मदतीने ट्रेलरखालून कार काढण्यात आली व कारमध्ये अडकलेल्या तिघांनाही जळगाव येथे




## 'गंधार'तर्फे 'संतांचीया गावा'वर अक्षर गप्पा रंगल्या

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १६ सप्टेंबर**

महाराष्ट्राला एक थोर संत परंपरा आहे. संतांची शिकवण, त्यांनी केलेले समाज प्रबोधन यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीवर खूप महत्त्वाचे योगदान आहे. पुढच्या पिढीपर्यंत हे संचित पोहोचले पाहिजे, असा सूर गंधार कला मंडळातर्फे झालेल्या 'संतांचीया गावा' या 'अक्षरगप्पां'मधून निघाला. सुरुवातीला आशा जोशी यांनी संत एकनाथ, सुचेता नेवे यांनी संत कान्होपात्रा यांच्याबद्दल, स्वरा पाठक यांनी व्हायोलिनवर संत मीराबाई यांचे 'पायोजी मैने...' हे सुंदर भजन सादर केले.

आसावरी जोशी यांनी समर्थ रामदास स्वामी, नेत्रा सोनार संत मीराबाई, वसुधा राजहंस संत तुकाराम, शैला नेवे संत चोखामेळा, अंजली धवसे यांनी संत रोहिदास यांची माहिती सांगितली.

गोविंदराव बावने यांनी संत तुकडोजी महाराज यांची माहिती कथन केली. सूत्रसंचालन गंधार कला मंडळाच्या अध्यक्षा विशाखा देशमुख यांनी केले. या 'अक्षरगप्पां'मधे भास्करराव चव्हाण, विलास देशमुख, विलास राजहंस, उमेश कुळकर्णी यांच्यासह अनेक साहित्यप्रेमी उपस्थित होते.

## कंपनी टॉवरच्या २४ इलेक्ट्रीक बॅटऱ्या नेल्या चोरुन

**जळगाव :** टॉवर सक्रिय ठेवण्यासाठी इलेक्ट्रीक बॅटऱ्या लावल्या होत्या. चोरट्यांनी सुमारे ४५ हजार किंमतीच्या २४ इलेक्ट्रीक बॅटऱ्या चोरुन नेल्या.शहरातील आदर्शनगरात रुस्तमजी शाळेजवळ प्लॉट नं.२६ मुधळे प्लॉट येथे ही घटना २० ऑगस्ट ते २८ ऑगस्ट दरम्यान घडली. या प्रकरणी सोमवारी (१५ सप्टेंबर) रामानंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

इंडस टॉवर या ठिकाणी लावण्यात आला आहे. हा टॉवर व्यवस्थित काम करीत आहे की नाही, हे पाहण्यासाठी कंपनीचे सुपरवाईझर हे २० ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजता प्लॉट नं. २६ मुधळे प्लॉट येथे गेले असता २४ नग इलेक्ट्रीक बॅटऱ्या चोरुन नेल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी अमोल चरणदास शेंद्रे यांच्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांनी घटनास्थळी जावुन परिस्थिती जाणुन घेतली. पोलीस नाईक राजेंद्र गुंजाळ हे तपास करीत आहेत.

**शिवकॉलनीतून पल्सर लंपास**

शहरात शिवकॉलनीमधील गट नं. ५५ प्लॉट नं. २९ येथे पार्किंग केलेली सुमारे ५० हजार रुपये किमतीची बजाज पल्सर ( एमएच १९ ई ई ७९१३) ही दुचाकी चोरट्यांनी चोरुन नेली. बुधवारी (१० सप्टेंबर) दुपारी अडीच वाजेच्या सुमारास ही घटना घडली. सर्वत्र शोध घेतला असता दुचाकी मिळुन आली नाही. या प्रकरणी रोहन पूनमचंद राठोड (वय २०, रा. प्लॉट.२९) याच्या तक्रारीनुसार सोमवारी (१५ सप्टेंबर) रामानंदनगर पोलीस ठाण्यात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस नाईक रेवानंद साळुंखे हे तपास करीत आहेत.

**घराबाहेर पडलेले गृहस्थ बेपत्ता**

रामानंदनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ५६ वर्षीय गृहस्थ गुरुवारी (११ सप्टेंबर) सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास कोणाला काही एक न सांगता घराबाहेर पडले. त्यानंतर ते घरी परतले नाहीत. कुटुंबियांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नाही. या प्रकरणी तक्रारीनुसार सोमवारी (१५ सप्टेंबर) रामानंदनगर पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आली. अंमलदार सत्यवान वारंगे हे तपास करीत आहेत.

**तरुणावर वार; चौघांवर गुन्हा**

रस्त्यात गाठत चौघांनी धारदार शस्त्राने वार केल्याने संतोष अशोक पवार (२५, रा. नाथवाडा) हा तरुण जखमी झाला होता. रविवारी (१४ सप्टेंबर ) रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास ही घटना नाथवाडा परिसरात घडली होती. याप्रकरणी जखमीच्या तक्रारीनुसार चौघांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोहेकॉ चंद्रकांत पाटील हे तपास करीत आहेत.

## थोडक्यात महत्त्वाचे...

### भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तसेच मराठी अभिनेत्री मेघा धाडे आज धुळे जिल्ह्यात



**धुळे** : भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तसेच मराठी चित्रपट अभिनेत्री व बिग बॉस मराठीची पहिली विजेती मेघा धाडे या आज १७ रोजी धुळे शहर दौऱ्यावर आहेत. सकाळी ११ वाजता महानगपालिका धुळे येथे त्या संत नरहरी महाराज स्मारक सभागृहात स्थानिक कलावंतांशी संवाद साधणार आहेत. तसेच छत्रपती शाहू महाराज नाट्यमंदिरालाही भेट देणार असून, नाट्यमंदिराची झालेली दुरवस्था व इतर आवश्यक बाबी पाहणार आहे. धुळे शहरातील कलावंतांनी आपल्या विविध समस्या, मागण्या व प्रश्न यावेळी मेघा धाडे यांच्यासमोर मांडावेत, सर्व कलावंतांनी या महत्त्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप सांस्कृतिक प्रकोष्ठ धुळे शहराचे अध्यक्ष जगदीश देवपूरकर यांनी केले आहे.

### बाळासाहेब ठाकरे विद्यालयात हिंदी दिवस उत्साहात

**नंदुरबार** : नंदुरबार तालुका विधायक समिती संचलित शेजवा येथील बाळासाहेब ठाकरे माध्यमिक विद्यालयात हिंदी दिनानिमित्त विविध कार्यक्रम पार पडले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक दत्तू पाटील, उपशिक्षक संजय बोरसे हिंदी भाषादिना निमित्त माहिती दिली. इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी कविता, कबीर दोहे व हिंदी दिवसाविषयी माहिती दिली. प्रास्ताविक शिक्षिका संगीता गोखले यांनी केले. सूत्रसंचालन दीपक वळवी यांनी केले. आभार विजय पवार यांनी मानले. यावेळी रामानंद बागले, आनंदराव पवार, संदीप गायकवाड, नेहा शर्मा, संजय वसावे, दिनेश पवार, समीर वसावे आदी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### डॉ. काणे गर्ल्स हायस्कूलमध्ये राष्ट्रभाषा हिंदी दिन

**नंदुरबार** : येथील डॉ. काणे गर्ल्स हायस्कूल मध्ये राष्ट्रभाषा हिंदी दिनानिमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष पर्यवेक्षक मिलिंद चव्हाण, प्रमुख अतिथी मुख्याध्यापिका सीमा मोडक, हिंदी विभागप्रमुख संजय चौरे, रेखा गोसावी, अनिल नाईक आदी उपस्थित होते. मिलिंद चव्हाण यांनी हिंदी भाषा ही संस्कृती व परंपरेचे प्रतीक असल्याचे सांगितले. यावेळी राष्ट्रभाषा हिंदी दिवस निमित्त आयोजित काव्य वाचन स्पर्धेत वैष्णवी धनगर, नूपुर गिरासे, दर्शना पाटील, निबंध लेखन स्पर्धेत धनश्री वसावे, प्रियल कोकणी, हर्षदा लोणारी, भाग्यश्री पाटील, ग्रंथाली पवार, या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पेन प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन जितेंद्र पगारे यांनी तर आभार चंद्रशेखर चौधरी यांनी मानले.



### एस. ए. मिशन येथे व्यवसाय प्रशिक्षण उत्साहात

**नंदुरबार** : येथील एस. ए. मिशन हायस्कूलच्या व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी संस्था चेअरमन म्हार्था सुतार, प्राचार्य नूतनवर्षा वळवी, सामाजिक कार्यकर्त्या सुलभा महिरे, जिलीआना गायकवाड सोनल वाघ, आशा रायसिंग आदी उपस्थित होते. मिशन ट्रस्टच्या म्हार्था सुतार, प्राचार्य नूतवर्षा वळवी, मुख्याध्यापिका सुलभा महिरे, व्यवस्थापिका जिलीआना गायकवाड यांनी मुली, महिलांनी सक्षमीकरण व शैक्षणिक पात्रतेसोबतच व्यवसाय शिक्षणावर भर देण्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच आपल्या संरक्षण व स्वावलंबन या विषयी सतर्क रहावे असे मार्गदर्शन केले. सहयोगिता संस्थतर्फे मुलींना सौंदर्य शास्त्र प्रशिक्षणाप्रसंगी डिजिटल सुंदरता व कॉस्मेटिक दुनियाचा व्यवसाय मोठे अर्थाजनचे साधन असून या विषयी पार्लर प्रशिक्षण ट्रेनर सोनल वाघ व आशा रायसिंग यांनी प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण पूर्णतेनंतर मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

# भाजीपाला, फळ विक्रेत्यांच्या आंदोलनातून दुही माजवण्याचा प्रयत्न

## दिलेल्या जागेवर व्यवसाय करा : छत्रपती संभाजीराजे लोटगाडी युनियनने मांडली भूमिका

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १६ सप्टेंबर**

शहरातील जुन्या आग्रा रोडवरील पाचकंदील ते महात्मा गांधी पुतळ्यापर्यंतचा भाग म हापालिकेकडून नो हॉकर्स झोन जाहीर करण्यात आला आहे. तसेच आमदार अनुप अग्रवाल यांच्या पुढाकारातून बैठकीदरम्यान जिल्हा प्रशासनाने पाचकंदीलमधील नवीन मार्केटचे काम होईपर्यंत विक्रेत्यांना पर्यायी जागाही उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यात अनेक विक्रेते व्यवसाय उपजिविका करत आहेत.

मात्र, तथाकथित पुढाऱ्यांच्या चिथावणीतून काही निवडक भाजीपाला व फळ विक्रेत्यांकडून प्रशासना विरोधात आंदोलन केले जात आहे. यातून शहराच्या शांततेला गालबोट लावण्यासह समाजात दुही अशांतता माजवण्याचा प्रयत्न केला जात आहे. याला बळी न पडता पाचकंदील परिसरात नवीन मार्केट होईपर्यंत सर्व विक्रेत्यांनी प्रशासनाने दिलेल्या जागांवर भाजीपाला व फळ विक्रीचा व्यवसाय करावा, अशी भूमिका छत्रपती संभारीराजे लोटगाडी युनियनने घेतली आहे.




शहरातील पाचकंदील परिसरात काही मुजोर आणि विशिष्ट फळ विक्रेत्यांसह फेरीवाल्यांकडून अश्लिल शेरेबाजी केली जात असून यामुळे अनेक महिलावर्ग त्रस्त होता. तसेच आग्रा रोडवरील दुकानदारांनाही या फेरीवाल्यांचा त्रास होत होता. यातील अनेक फळविक्रेत्यांकडून वाहनधारकांना दादागिरी तसेच समूहाने मारहाण केली जात होती. यातून शहरात दंगल भडकविण्याचा धोका निर्माण झाला होता.

या अनधिकृत फेरीवाल्यांनी संपूर्ण आग्रा रोड परिसर व्यापून टाकल्याने वेळोवेळी वाहतूक ठप्प होत होती. या घटनांच्या पार्श्वभूमीवर आमदार अनुप अग्रवाल यांनी यापूर्वीच्या घटनांचा संदर्भ देत थेट विधानसभेत हा प्रश्न उपस्थित केला होता.

त्यावर जिल्हा व महापालिका प्रशासनाने यथोचित कार्यवाही करण्याची मागणी केली होती. त्यानुसार सरकारने स्थानिक अधिकाऱ्यांना बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्या हॉकर्सना हटविण्याचे आदेश दिल्यानुसार महापालिका प्रशासनाने आग्रा रोडवरील पाचकंदील ते महात्मा गांधी पुतळ्यापर्यंतचा भाग नो हॉकर्स झोन म्हणून घोषित करण्यात आला होता. यात फेरीवाल्यांना व्यवसायास प्रतिबंध करण्यात आला होता. यानंतर फेरीवाल्यांनी मोर्चा काढून या निर्णयाला विरोध केला.

यासंदर्भात आमदार अग्रवाल यांच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी कार्यालयात भाजीपाला विक्रेते, महापालिका अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यात पाचकंदील येथील चारही मार्केटचे नवीन बांधकाम करून तेथे भाजीपाला, फळ विक्रेत्यांना कायमस्वरूपी हक्काचे गाळे उपलब्ध करून देण्यात येतील, तोपर्यंत सर्व विक्रेत्यांनी जमनालाल बजाज रोडवर व्यवसाय करावा, असा सर्वमान्य निर्णय झाला.

या निर्णयानुसार आग्रा रोडवरील बहुतांश भाजी विक्रेते जेबी रोडवर आजही व्यवसाय करीत आहेत. आग्रा रोड मोकळा झाल्याने शहरातील नागरिकांसह व्यापाऱ्यांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. आग्रा रोड परिसरातून सर्व प्रकारची वाहने विनाअडथळा जात आहेत.

गेल्या ३०-४० वर्षांनंतर आग्रा रोडने प्रथमच मोकळा श्वास घेतला असताना काही तथाकथित विघ्नसंतोषी पुढाऱ्यांनी फेरीवाले, भाजी, फळ विक्रेत्यांना हाताशी धरून चिथावणी देत आंदोलनात उतरविले आहे. यातून शहराची शांतता भंग करीत राजकीय पोळी भाजण्याचा घृणास्पद प्रकार केला जात आहे. या प्रकाराचा छत्रपती संभाजीराजे लोटगाडी युनियनचे सदस्य भाजी विक्रेते तीव्र निषेध करत असून, सर्व विक्रेत्यांनी चार-पाच महिने प्रशासनाने ठरवून दिलेल्या जागेवर व्यवसाय करावा, तथाकथित पुढाऱ्यांच्या नादी लागून आपले नुकसान करून घेऊ नये, असे आवाहन छत्रपती संभाजीराजे लोटगाडी युनियनचे अध्यक्ष तथा बाजार समितीचे संचालक महादेव परदेशी, प्रमोद चौधरी, सागर वाघ आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

#### आमदार अग्रवाल यांच्यासह प्रशासनावर विश्वास

पूर्वी पाचकंदील परिसरात फळ विक्रेत्यांची संख्या नगण्य होती. परंतु काही वर्षांपासून शेजारच्या मालेगावसह अन्य परिसरातून फेरीवाले सकाळी धुळ्यात येवून अकबर चौक होलसेल फळ विक्रेत्यांकडून माल घेत भाड्याच्या लोटगाड्यांव्दारे पाचकंदील परिसरात रात्रीपर्यंत व्यवसाय करीत पुन्हा मालेगावकडे कूच करायचे, असा दिनक्रम होता. तसेच आग्रा रोडवर पायमोजे, हातमोजे, रुमाल, लहान मुलांचे कपडे विकणाऱ्या परप्रांतीय विक्रेत्यांकडून शहर शांतता भंग करण्याचा वारंवार प्रयत्न होत होता. यात परप्रांतीय ठेकेदार १०-२० मुलांद्वारे रोजाने हातगाड्या लावत. यात त्यांची मुजोरी वाढल्यामुळे महापालिका व पोलिस प्रशासनाने नो हॉकर्स झोन जाहीर करत शिस्त लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्याला आमचा पाठिंबा असून महापालिका आयुक्तांनी आग्रा रोडवरील विस्थापित फेरीवाल्यांचे कायमस्वरूपी पुनर्वसनसाठी पाचकंदीलमधील मनपाच्या चारही मार्केटचे काम पूर्ण करून तेथे गाळे उपलब्ध करून द्यावेत, पुनर्वसन करताना स्थानिक भाजी विक्रेत्यांनाच गाळे उपलब्ध करून देण्यात यावेत, अशी मागणीही युनियनने केली आहे. आमदार अनुप अग्रवाल आणि जिल्हा व महापालिका प्रशासनावर आमचा विश्वास असल्याचेही युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

# पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमीत्त आज धुळ्यात विविध उपक्रम

## प्रभू श्रीरामाची महाआरतीसह सेवा पंधरवडा अंतर्गत स्वच्छता अभियान

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १६ सप्टेंबर**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमीत्त आग्रा रोड येथील राम मंदिरात प्रभु श्रीरामाची महाआरती करुन सेवा पंधरवडा कार्यक्रमांतर्गत स्वच्छता अभियानासह विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आमदार अनुप अग्रवाल यांनी म्हटले आहे.

धुळे शहराचे आमदार अनुप भैय्या अग्रवाल व धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, माजी केंद्रीय मंत्री तथा माजी खासदार डॉ.सुभाष भामरे, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच सेवा पंधरवडा कार्यक्रमाचे संयोजक ओमप्रकाश खंडेलवाल, सहसंयोजक शशीशेखर मोगलाईकर, पवन जाजू व स्वछता अभियानाचे प्रमुख माजी महापौर प्रदीप कर्पे, विजय पवार, कैलास कर्पे, उमा कोळवले, स्नेहल बडगुजर, प्रमिला जाधव व मंडल अध्यक्ष पंकज धात्रक यांच्या नेतृत्वात राबविण्यात येणार आहे.



राम मंदिर ते विविध परिसर स्वच्छता मोहिम स्वच्छता मोहिम आग्रा रोड येथील राम मंदिर ते गांधी पुतळा, सुभाष पुत, कुंभार खुंट, जुने धुळे येथील विश्वकर्मा मंदिर येथे प्रतिमा पुजन व महाआरतीसह सकाळच्या सत्रात विविध उपक्रम होणार आहेत. या उपक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन ज्येष्ठ नेते हिरामण गवळी, विजय पाच्छापुरकर, प्रदेश पदाधिकारी जयश्री अहिरराव, अल्पा अग्रवाल, मायादेवी परदेशी, माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर, माजी महापौर चंद्रकांत सोनार, प्रतिभा चौधरी, युवा मोर्चा अध्यक्ष आकाश परदेशी, महिला मोर्चा अध्यक्षा आरती पवार, सर्व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिधी आदिंनी केले आहे.

#### मोहाडी उपनगर येथे सातबारा सक्षम स्त्री उपक्रम

तसेच शासन महसुल व वन विभाग अप्पर तहसिल कार्यालय, धुळे शहर यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान सेवा पंधरवडा १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर दरम्यान अप्पर तहसिलदार, धुळे शहर यांचे कार्यालय अंतर्गत १७ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वा. पिंपळादेवी माध्यमिक विद्यालय, मोहाडी उपनगर, धुळे येथे सातबारा सक्षम स्त्री या कार्यक्रमासाठी तसेच भाजपा धुळे शहर दक्षिण मंडलाच्या वतीने स्वच्छता मोहिम राबविण्यात येणार आहे. याशिवाय १०० फुटी रोड येथील विश्वकर्मा भवन येथे प्रतिमा पूजन व माल्यार्पण प्रसंगी उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा धुळे महानगराच्या वतीने करण्यात आले आहे.

# आ. अमरिशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित रक्तदान शिबिर

## धुळ्याच्या ग्लोबल युनिव्हर्सिटीत १६७ दात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**धुळे, १६ सप्टेंबर**



माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित धुळे एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी मध्ये भव्य रक्तदान शिबिर पार पडले. यावेळी १६७ दात्यांनी रक्तदान केले.

या रक्तदान शिबिराचे उदघाटन एस.व्ही.के.एम. धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एस.टी.एम.ई. डीन डॉ.नीलेश साळुंखे, एस.पी.टी.एम. डीन डॉ. समीर गोयल, एसव्हीकेएम स्कूल प्राचार्या सुनंदा मेनन आदी उपस्थित होते.



या रक्तदान शिबिरात सामाजिक उत्तरदायित्व जोपासण्याच्या उद्दात्त हेतूने १६७ शिक्षक, विद्यार्थी, पालक व इच्छुक रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. यासाठी धुळे येथील जीवन ज्योती ब्लड बँक पथक उपस्थित होते.

रक्तदान शिबीर यशस्वितेसाठी मनोज सोनार, डॉ. भूषण द्रयंकर, प्रा. महेंद्र खैरनार, प्रा. कमलेश छाजेड, डॉ. नम्र जोशी, प्रा. सचिन कांबळे, गुंजन सानप, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अंतिम वर्ष पदवी व पदविका अभ्यासक्रमाचे विद्यार्थी यांनी प्रयत्न केले.

रक्तदान शिबीर यशस्वीतेसाठी एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, एस.व्ही.के.एम. एन.एम.आय.एम.एस. ग्लोबल युनिव्हर्सिटी प्रेसिडेंट व चान्सलर स्नेहा अंकित पारिख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, मार्गदर्शक डॉ.अजय पसारी, सर्व डीन, प्राचार्य यांनी समाधान व्यक्त केले.

# हस्ती पब्लिक स्कूल अन् ज्यू. कॉलेजमध्ये हिंदी सप्ताह

## हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**दोंडाईचा, १६ सप्टेंबर**

१४ सप्टेंबर रोजी हिंदी दिनानिमित्त हस्ती पब्लिक स्कूल व ज्यू. कॉलेजमध्ये हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनासह विविध उपक्रम पार पडले. याप्रसंगी माता सरस्वती, स्व. दादाजी, स्व. पप्पाजी व स्व. काकाजी व हिंदी भाषेचे साहित्यिकांचे प्रतिमा पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हस्ती पब्लिक स्कूल चे प्रमुख अतिथी जितेंद्र गिरासे, प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, उपप्राचार्या रझिया दाऊदी, समन्वयक मनोज ठाकूर , समिना बोहरी, प्रमुख अतिथी शिक्षक पालक संघाचे सदस्या सोनल ठोंबरे, क्रिशा रहेजा प्रशांत पाटील व व हेड बॉय, गर्ल हेड आदींनी केले. यावेळी प्राचार्य जिवन सपकाळे, समन्वयक पूनम गुरुबाणी, मुख्याध्यापक सदाशिव महाजन आदी उपस्थित होते.

हिंदी सप्ताहानिमित्त सुलेखन, कथा - कथन, म ुहावरोंका अर्थ बताकर वाक्य में प्रयोग, कहानी लेखन, चित्र देखकर कहानी लेखन, विज्ञापण लेखन, निबंध स्पर्धा व अंतिम दिवशी इ. १ ते २ री करिता गीत गायन स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. यात बहुसंख्य विद्यार्थ्यांनी हिरीरिने व उत्साहाने सहभाग घेतला. या स्पर्धांमध्ये हस्ती पब्लिक स्कूल व ज्यू. कॉलेज तर्फे ४५, हस्ती वर्ल्ड स्कूलमध्ये ४१ आणि हस्ती गुरूकुलमध्ये ३८ विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन प्रणव जाधव, मयुरी जैन, गायत्री बहिरम, हिमांशी राठोड, योगिता गिरासे, वेदांत गिरासे, कृष्णा पाटील यांनी केले. हिंदी सप्ताह यशस्वीतेकरिता हिंदी विभागप्रमुख विजेंद्र भोई, समन्वयक मनोज ठाकूर, शीतल पाटील, कविता पावरा, संजय मोरे, स्वाती बागुल, वैशाली निकुंबे,साधना पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वितेसाठी रेखा वाघ, मयुरी सोनवणे, अजित मन्सुरी, ज्योती बोरसे, पंकज चव्हाण, पंकज पाटील, सोनाली ठाकरे, माधुरी गिरासे, मनिषा अहिरे, सविता चौधरी, नम्रता पवार, रिता पाटील, योगेश बागले, धनंजय भदाणे, सुचिता जाधव, गौतमी गिरासे, वर्षा अग्रवाल, सागर गोराणे, विशाल बच्छाव, सावन साळुंखे, रवींद्र कोळी आदींनी सहकार्य केले. आरती माळी, स्वप्नाली तिकुटे यांनी फलक लेखन तर कुमुद चौधरी यांनी तांत्रिक सहाय्य केले.

# बंजारा समाजाला आदिवासी समाजात समाविष्ट करु नये

## भारत आदिवासी संविधान सेनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**तळोदा, १६ सप्टेंबर**

बंजारा समाज अनुसूचित जमाती हैद्राबाद गॅझेट नुसार आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी करीत आंदोलन करत आहेत. परंतु आदिवासी समाज हा जल, जंगल जमिनीचा निसर्ग पूजक असून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण दिलेले आहे. बंजारा समाज हा आदिवासी नसून फिरस्ता समाज असून इतर मागास वर्गीय प्रवर्ग मध्ये आरक्षणाचा लाभ घेत आहे. महाराष्ट्र प्रवर्ग च्या सूची मध्ये कोणताही उल्लेख नाही. महाराष्ट्र सरकार ने बंजारा समाजाला आदिवासी समाजामध्ये समाविष्ट करू नये, अन्यथा आदिवासी समाजाचा वतीने राज्यभर आंदोलन करण्यात येईल, अशा आशयाचे निवेदन भारत आदिवासी संविधान सेनेतर्फे जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांना देण्यात आले.

या निवेनावर प्रदेशाध्यक्ष सतीश पी. ठाकरे, जिल्हा उपाध्यक्ष राजकुम ार वळवी, मीडिया प्रचारक राजेश मोरे, शहादा तालुकाध्यक्ष किरण ठाकरे, उपाध्यक्ष सिताराम वळवी, सुनील पवार, विकास वळवी, आनंद सोनवणे, सुनील मोरे, साहेबराव ठाकरे, सुपीबाई माळी, विनोद माळी, सुकीबाई ठाकरे, जमीनाबाई पवार, मीराबाई ठाकरे, अरुण ठाकरे, वशीबाई माळी, कलाबाई पाडवी, शिलाबाई माळी, शोभाबाई माळी, भरत माळी, रवींद्र ठाकरे, भरत पाडवी, आशाबाई ठाकरे आदींच्या सह्या आहेत



# श्रीकृष्ण जन्मभूमी संघर्ष न्यास समिती जिल्हाध्यक्षपदी डॉ. पाटील यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १६ सप्टेंबर :**

मथुरा येथील श्रीकृष्ण जन्मभूमी मुघलांच्या अतिक्रमणातुन मुक्त होऊन तिथे भव्यदिव्य श्रीकृष्ण मंदिर निर्मितीसाठी सकल हिंदू एकत्रित होऊन बहुमताचा रेटा केंद्र सरकार पर्यंत पोहचावा, याउद्देशाने श्रीकृष्ण जन्मभूमी संघर्ष न्यासची नंदुरबार विभागाची बैठक द्वारकाधिश मंदिर, नंदुरबार येथे पार पडली.

या बैठकीत श्रीकृष्ण जन्मभूमी संघर्ष न्यास मथुरा या संघटनेच्या नंदुरबार जिल्हाध्यक्षपदी हिंदु सेवा सहाय्य समितीचे धर्मसेवक डॉ. नरेंद्र परशराम पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय संघटक महामंत्री तथा प्रदेश अध्यक्ष शंकर वराडकर, राष्ट्रीय महामंत्री सुभाष चौधरी, अमोल चौधरी यांच्यासह नंदुरबार, नवापूर, तळोदा, अक्कलकुवा येथील हिंदुत्ववादी उपस्थित होते.

सर्वानुमते श्रीकृष्ण जन्मभूमी न्यास नंदुरबार जिल्हासाठी श्रीकृष्ण जन्मभूमी संघर्ष न्यासचे राष्ट्रीय संरक्षक वेदप्रकाश कटियार महाराज, राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश शर्मा (फलाहारी) यांच्या संमतीने राष्ट्रीय संघटक महामंत्री तथा प्रदेश अध्यक्ष शंकर वराडकर यांच्या हस्ते नंदुरबार जिल्हाध्यक्ष म्हणून हिंदु सेवा सहाय्य समितीचे धर्मसेवक डॉ. नरेंद्र पाटील यांना नियुक्त पत्र देण्यात आले.

नूतन जिल्हाध्यक्ष नरेंद्र पाटील म्हणाले की, श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्त करणे ही जबाबदारी नसून धर्मकर्तव्यासाठी हे पद स्वीकारत आहे. बैठकीला जिल्ह्यातील हिंदुत्ववादी, मंदिर विश्वस्त उपस्थित होते.

### धुळे जिल्ह्यात आजपासून स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान

#### जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर यांची माहिती

**धुळे** : आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्यामार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत धुळे जिल्ह्यात 'स्वस्थ नारी सशक्त परिवार' अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये केले आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे राष्ट्रीय पातळीवर इंदूर (मध्यप्रदेश) येथून दुपारी १२ वाजता या अभियानाचे उद्घाटन करणार आहेत. त्यानंतर राज्य व जिल्हास्तरावर उद्घाटन होणार आहे. या अभियानाचा उद्देश महिला व बालकांची आरोग्य तपासणी करून कुटुंबाचे आरोग्य सुदृढ करणे हा आहे. या अभियानात असंसर्गजन्य आजारांचे स्क्रीनिंग, टीबी स्क्रीनिंग, ॲनेमिया, सिकलसेल, गरोदर माता तपासणी, लसीकरण सेवा, आहारविषयक जनजागृतीपर कार्यक्रम, असंसर्गजन्य रोग नियंत्रण विषयक सेवा, रक्तदान शिबिर, आभाकार्ड (आयुष्यमान कार्ड) वाटप इत्यादी उपक्रम होतील.

या शिबिरांसाठी स्त्री रोग, बाल रोग, कान नाक घसा रोगतज्ज्ञ, त्वचारोगतज्ज्ञ, मानसिक आरोग्यतज्ज्ञ आदी तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देण्यात येईल. धुळे जिल्ह्यातील नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सर्वांनी समर्पित भावनेने योगदान द्या!

## भाजपातर्फे 'सेवा पंधरवडा' बैठकप्रसंगी आमदार काशिराम पावरा यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**शिरपूर, १६ सप्टेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १७ सप्टेंबर रोजी ७५ व्या वाढदिवसानिमित्त भाजपातर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर कालावधीत सेवा पंधरवडा उपक्रम राबविला जात आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत नेहमीप्रमाणे सेवा व मदत पोहचवायची आहे. याशिवाय अंतर्गत रक्तदान शिबीर, एक पेड माँ के नाम, मोदी युवा मॅरेथॉन, वोकल फॉर लोकल, स्वच्छता अभियान, पंडित दिनदयाळ उपाध्याय जयंती, पंतप्रधान यांच्या जीवनपटावरील चित्रपट प्रदर्शन, मन की बात, लालबहादूर शास्त्री व गांधी जयंती, संघ शताब्दी शुभारंभ, विकसित भारत चित्रकला स्पर्धा इ. समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जाणार आहेत. या उपक्रमांसाठी सर्वांनी सम र्पित भावनेने योगदान द्यावे, असे आवाहन आमदार काशिराम पावरा यांनी केले.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसा निमित्त येथील आमदार कार्यालयात 'सेवा पंधरवाडा' कार्यक्रम संदर्भात कार्यशाळा बैठक पार पडली. यावेळी उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, शहराध्यक्ष चिंतनभाई पटेल, जिल्हा संयोजक शैलेंद्र अजगे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. यावेळी भाजपा शिरपूर विधानसभा प्रभारी के.डी.पाटील, माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी जि.प. अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, अनुसूचित जाती जिल्हाध्यक्ष पिंटू शिरसाठ, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष कैलासचंद्र अग्रवाल, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष श्यामकांत ईशी, जिल्हा उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष संग्रामसिंग राजपूत, जिल्हा सरचिटणीस प्रभाबाई कोकणी, जिल्हा चिटणीस भैरवी शिरसाठ, शिरपूर तालुका ग्रामीण अध्यक्ष भरत पाटील, थाळनेर मंडळ अध्यक्ष विरपाल राजपूत, सांगवी मंडळ अध्यक्ष योगेश बादल, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सुरेंद्र राजपूत, आदिवासी सेल माजी जिल्हाध्यक्ष जयवंत पाडवी, युवा मोर्चा शिरपूर ग्रामीण अध्यक्ष




संदिप कुवर, थाळनेर मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष करण शिंदे, सांगवी मंडळ युवा मोर्चा अध्यक्ष वसंत पावरा, महिला आघाडी शिरपूर ग्रामीण अध्यक्ष उज्ज्वला प्रताप पाटील, थाळनेर मंडळ महिला आघाडी अध्यक्ष ललिता श्रावण चव्हाण, तसेच यावेळी भारतीय जनता पार्टी शिरपूर शहर, शिरपूर ग्रामीण, थाळनेर मंडळ व सांगवी मंडळचे सर्व पदाधिकारी, सर्व मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, चिटणीस, जिल्हा, तालुका, मंडळ कार्यकारिणी सदस्य, अनेक नवनियुक्त पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिरपूर आमदार कार्यालयात 'सेवा पंधरवडा' संदर्भात जिल्हा संयोजक शैलेंद्र अजंगे, कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार काशिराम पावरा आदींनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सांगवी मंडळ अध्यक्ष योगेश बादल, सूत्रसंचालन थाळनेर मंडळ अध्यक्ष विरपाल राजपूत यांनी केले. आभार ग्रामीण तालुकाध्यक्ष भरत पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिरपूर शहर, शिरपूर ग्रामीण, थाळनेर मंडळ व सांगवी मंडळाच्या अध्यक्षांनी संयोजन केले.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : १७/०९/२०२५ **वार** : बुधवार **शके** : १९४७
**अयन** : दक्षिण **ऋतू** : शरद **मास** : भाद्रपद **पक्ष** : कृष्ण **महिना** : सप्टेंबर
**संवत** : २०८१ **अयनांश** : २४-१३-०२ **तिथी** : एकादशी **नक्षत्र** : पुष्य
**योग** : परिध **करण** : बव **सूर्योदय** : ६-२८ **सूर्यास्त** : १८-३८
**चंद्रराशी प्रवेश** : कर्क **शुभाशुभ** : एकादशीचक श्राद्ध करावे.

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : आईसह तिर्थाटन करावे.
**वृषभ** : धार्मिक कार्यात सहभागी व्हाल.
**मिथून** : देवधर्म कार्य कराल.
**कर्क** : पाहुणे मंडळीत गैरसमज होईल.
**सिंह** : मनाने प्रेम करणारी माणसं वार्तालाप करतील.
**कन्या** : भाग्याचा दिवस राहणार आहे.
**तुला** : वडिलांचे नामस्मरण केले तरी भाग्य उजळेल.
**वृश्चिक** : आपण बोलाल तसेच आज घडणार आहे.
**धनू** : शारीरिक व्याधी त्रस्त करतील.
**मकर** : प्रेमविवाह प्रकरणे जवळ येतील.
**कुंभ** : शारीरिक लहान मोठी जखम संभावना.
**मीन** : मानसिक स्वास्थ लाभेल.
**विशेष** : पूर्वजांविषयीचे कार्य पुढे सुरू ठेवावे.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु. पो. रावेर, जि. जळगाव मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### थेरपीस्ट समीना तडवी यांना आयुष महासन्मान पुरस्कार प्रदान

**फैजपूर (ता. यावल)** : येथील सुप्रसिद्ध थेरपीस्ट समीना अजित तडवी यांना १४ सप्टेंबर रोजी आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनवतीने प्रतिष्ठेचा 'आयुष महासन्मान पुरस्कार-२०२५' थाटात मान्यवरांच्या हस्ते मुंबई येथे देण्यात आला. यावेळी भारतातील शेकडो आयुष डॉक्टर व थेरपिस्ट उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये सिनेस्टार श्रेया बुगडे, आमदार श्वेता महाले, युनायटेड नेशन चाईल्ड वुमेन सल्लागार डॉ. मंगला कोहली, असिस्टंट डायरेक्टर व हेड ईसी - राजकोट डॉ. एम. गणेश, डॉ. प्रणव पांड्या, एआयएमए राष्ट्रीय सल्लागार डॉ. प्रवीण जोशी, आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व्हाईस चेअरमन डॉ.नितीन राजे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बाबुराव कानडे, आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, पदाधिकारी डॉ. दिशा चव्हाण, प्रशांत सावंत, डॉ. रवी शिंदे, डॉ. रचित म्हात्रे, डॉ.जनार्धन यादव, डॉ. विनोद ढोबळे, डॉ. राकेश झोपे यांचा समावेश होता.

### भुसावळ रेल्वे स्थानकावर अनोळखी तरुणाचा मृत्यू : ओळख पटवण्याचे आवाहन

**भुसावळ** : भुसावळ रेल्वे स्थानकावर ३५ ते ४० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून मृताची ओळख पटवण्याचे आवाहन रेल्वे लोहमार्ग पोलिसांनी केले आहे. रेल्वे पोलिसांच्या माहितीनुसार, रेल्वे स्टेशनवर ५ सप्टेंबर रोजी ७.५४ वाजेच्या सुमारास अनोळखी ३५ ते ४० वर्षीय तरुण बेशुद्धावस्थेत असल्याची माहिती यंत्रणेला कळताच तरुणाला सिव्हील रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. अनोळखी तरुणाचे वय ३५ ते ४० असून मयताच्या अंगात आकाशी रंगाचा निळ्या बारीक लाईनिंगचा शर्ट, निळी काळी पँट, केस काळे वाढलेले, दाढी बारीक वाढलेली, शरीर बांधा सडपातळ, रंग गोरा आहे. तरुणाची ओळख पटत असल्यास भुसावळ लोहमार्ग पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन तपासाधिकारी तथा एएसआय संजय जंजाळकर (९८२३१ ०२३३४) यांनी केले आहे.



### भोळे कॉलेजमध्ये हिंदी दिनानिमित्त निबंध स्पर्धा

**भुसावळ** : येथील देविदास नामदेव भोळे महाविद्यालयात हिंदी विभाग अंतर्गत 'हिंदी है हिंद की धडकन' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. प्राचार्य डॉ. राजू फालक अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. संजय चौधरी होते. प्राचार्य फालक यांनी हिंदी ही केवळ आपली मातृभाषा नसून ती आपली संस्कृती, एकता आणि ओळख दर्शवणारी भाषा आहे. १४ सप्टेंबर १९४९ रोजी हिंदीला भारताची राजभाषा म्हणून मान्यता मिळाली. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस आपल्याला आपल्या भाषेच्या गौरवाची आठवण करून देतो, असे प्रतिपादन केले. यावेळी बीए, बीकॉम, बीएस्सी वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन विशाखा रणसिंगे हिने, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. जगदीश चव्हाण यांनी केले.

### दुर्गोत्सवानिमित्त शांतता समितीची बैठक

**फैजपूर (ता. यावल)** : आगामी नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने फैजपूर पोलीस स्टेशन हद्दीतील शांतता कमिटी सदस्य महिला दक्षता समिती सदस्य पोलीस पाटील व नवदुर्गा मंडळाचे पदाधिकारी सदस्य तसेच रावेर निंभोरा यावल येथील शांतता कमिटी सदस्य यांची फैजपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त बैठक शुभदिव्य मंगल कार्यालयात झाली. यात सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळाच्या अडीअडचणी समजून घेऊन उत्सव शांततेत पार पडण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. येणारा दुर्गोत्सव सर्वांनी कायदा सुव्यवस्थात भक्ती भावाने व शांततापूर्ण कोणत्याही अफवांना बळी न पडता साजरा करण्याचे आवाहन अनिल बडगुजर यांनी दुर्गा मंडळांना आवाहन याप्रसंगी केले आहे. यावेळी प्रास्ताविक मनोगतात फैजपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर मोताळे म्हणाले की, फैजपूर शहर व परिसर शांतता प्रिय असल्याने या ठिकाणी सण व उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरे केले जातात. पुढील येणारा दुर्गोत्सवही मोठ्या भक्ती भावाने आनंदाने सर्वांनी साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी शांतता कमिटी सदस्य, महिला दक्षता समिती सदस्य, पोलीस पाटील व नवदुर्गा मंडळाचे पदाधिकारी सदस्य आदी उपस्थित होते.



### निसर्गाशी सुसंवाद साधण्यासाठी खडसे महाविद्यालयात क्रॉसकंट्री स्पर्धा

**मुक्ताईनगर** : येथील मुक्ताईनगर तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित जी. जी. खडसे महाविद्यालयात आंतरकुल क्रॉसकंट्री स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण व्हावी, तसेच हार जीत यापेक्षाही आनंदासाठी खेळणे. निसर्गाशी सुसंवाद साधण्यासाठी तसेच स्टॅमिना, ताकद, सहनशक्ती आणि वेग सुधारावा या उद्देशाने अशा आंतरकुल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. क्रॉसकंट्री स्पर्धा ही नैसर्गिक मार्गावर, जवळ जवळ १० कि.मी. अंतराची धावण्याची स्पर्धा होती. यात मुलींमध्ये दीपाली पाटील तर मुलांमध्ये शुभम मुलांडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांचे प्राचार्य प्रा. डॉ. हेमंत महाजन, उपप्राचार्य डॉ. संजीव साळवे, उपप्राचार्य डॉ. वंदना चौधरी तसेच सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी यांनी कौतुक केले. स्पर्धांचे आयोजन क्रीडा विभागामार्फत क्रीडा संचालक डॉ.प्रतिभा ढाके यांनी केले. स्पर्धेसाठी पायलट म्हणून विजय गवळी, यशवंत सुरळकर, अमोल गुंजाळ यांनी काम पाहिले. मोठ्या उत्साहात क्रॉसकंट्री स्पर्धा पार पडल्या.

# चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## निंभोरा पोलिसांची कामगिरी; १२ लाखांचा मुद्देमाल केला हस्तगत

**निंभोरा बुद्रूक (ता.रावेर), १६ सप्टेंबर**

चोरी करणाऱ्या टोळीचा निंभोरा पोलिसांनी पर्दाफाश केला असून, १२ लाख किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून निंभोरा पोलीस स्टेशन तसेच सावदा, यावल, रावेर, मुक्ताईनगर या परिसरातील शेतकरी यांचे शेती उपयोगाचे साहित्य तसेच तोलकाट्यावरील बॅटरी-इन्व्हर्टर साहित्य व मोटार सायकल चोरीस जाण्याच्या घटना घडल्याने निंभोरा पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी हरिदास बोचरे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी १५ दिवसांपासून साखळी पद्धतीने नाकाबंदी, रात्री गस्त करुन तांत्रिक व आधुनिक पध्दतीने तपास केला.

मिळालेल्या गुप्त माहितीवरुन संशयित आरोपी विलास ऊर्फ काल्या सुपडू वाघोदे रा. वडगाव याचा शोध घेतला. पोलीस आल्याची चाहुल लागल्याने तो पळून गेला. त्याच्या राहत्या घरी झोपडीमध्ये त्याच्यासोबत राहत असलेली महिला योगीता सुनील कोळी ही मिळाली. झोपडी तपासली असता त्यात लहान सोलर प्लेट व इतर साहित्य मिळाले. त्याबाबत विचारपूस केली असता हे साहित्य विलास ऊर्फ काल्या वाघोदे हा त्याचे शिरसाळा येथील साथीदार तसेच वडगाव येथील जमील तडवी याच्या मदतीने निंभोरा येथे राहणार स्वप्नील चौधरी यास विकत असल्याची कबुली या महिलेने दिली. यावरुन सपोनि हरीदास बोचरे यांनी निंभोरा पोलिसांच्या मदतीने चोरीचा माल घेणारा मुख्य सूत्रधार स्वप्नील वासुदेव चौधरी यास ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेऊन चोरीचे साहित्य हस्तगत केले.



**यांनी केली ही कामगिरी**

ही कामगिरी पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली निंभोरा पोलिस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि हरीदास शिवराम बोचरे यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक दीपाली पाटील, ममता तडवी, सुरेश अढायगे, बिजू जावरे, रजवान पिंजारी, अविनाश पाटोल, सुरेश पवार, किरण जाधव, रशीद तडवी, सरफराज तडवी, रफिक पटेल, अमोल वाघ, प्रभाकर हसाळ, प्रशांत चौधरी, महेंद्र महाजन, परेश सोनवणे, भूषण सपकाळे, सुभाष शिंदे, तसेच चालक योगेश चौधरी, राहुल केदारे यांसह महिला पोलीस अंमलदार यांनी केली आहे. त्याचप्रमाणे जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी, अंमलदार यांनीही मदत केली.

**यांना केली अटक**

या प्रकरणात मुख्य संशयित आरोपी विलास ऊर्फ काल्या सुपडू वाघोदे रा. वडगाव नदीकाठी (फरार), त्याचे साथीदार योगीता सुनील कोळी रा. तपत कठोरा, ह.मु. वडगाव नदीकाठी, गोपाळ संजय मोलनकर, आकाश मधुकर चोटकर, अर्जुन रतनसिंग सोळंकी सर्व रा. शिरसाळा, ता. बोदवड हे आहेत. या संशयित आरोपींनी चोरी केलेला माल ताब्यात ठेवून विल्हेवाट लावणारा संशयित आरोपी जमील अब्दुल तडवी (वय ४०, रा. वडगाव) तसेच सर्व चोरीचा माल घेणारा मुख्य संशयित आरोपी स्वप्नील वासुदेव चौधरी (वय ३५, रा. निंभोरा, बु, ) हा असून तसेच राकेश सुभान तडवी (रा. सावदा), ललित सुनील पाटील (निंभोरा), राहुल उर्फ मयूर अनिल पाटील (रा. वडगाव) हे आहेत. यांना पोलिसांनी अटक केली.

**संशयित आरोपींकडून शेती साहित्य जप्त**

पंप मटेरीयल सोडण्याचे मशिन ५, मोठ्या साईजच्या बॅट्या ११, इन्व्हर्टर मशिन-५, मोटारसायकली-४, पावर ट्रोलर लहान ट्रॅक्टर-२ नॅनो कार-१ तसेच इतर साहित्य असा एकूण १२ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. वेगवेगळे १० गुन्हे उघडकीस आणून निंभोरा पोलिसांनी संशयित आरोपींना अटक करून मुद्देमाल हस्तगत केला.

## ना. खडसे, आ. खडसेंच्या प्रयत्नाने आयटीआय प्रवेशास मुदतवाढ





**मुक्ताईनगर** : महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या अंतर्गत राज्यात कोकण विभाग ४२, पुणे विभाग १३९, नाशिक विभाग १५८, छत्रपती संभाजी नगर ६९, नागपूर विभाग १६७, अमरावती विभाग ३५ अशा एकूण ६१० खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था शासनाच्या मान्यतेने सुरु आहेत. औद्योगिक प्रशिक्षण विकास महामंडळ या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या नेत्यांचे आभार मानले आहेत.

विद्यार्थ्यांना कौशल्य आधारित प्रशिक्षण देऊन कुशल कारागीर बनून ते स्वावलंबी व्हावे हा या संस्थेचा उदात्त हेतू आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दरवर्षी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही वाढती असते. यावर्षी नैसर्गिक तसेच मानवनिर्मित विविध अडचणींमुळे विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी राज्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या, त्यातच दरवर्षी असणारी ३० सप्टेंबरपर्यंतची मुदत यावर्षी फक्त ३१ ऑगस्टपर्यंतच देण्यात होती. त्यामुळे अनेक विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेशापासून वंचित राहिले. यामुळे राज्यातील खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रवेश प्रक्रिया फक्त ६० ते ७० टक्क्यांवर थांबली.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रवेशापासून विद्यार्थी वंचित राहिल्याने विद्यार्थी हिताच्या दृष्टीने औद्योगिक प्रशिक्षण विकास महामंडळ या संघटनेमार्फत संबंधित प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ मिळण्यासंदर्भात केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांना निवेदन देऊन व आमदार एकनाथ खडसे यांची भेट घेऊन ही बाब त्यांच्या लक्षात आणून दिली.

ना. रक्षा खडसे व आ. एकनाथ खडसे यांनी याबाबत तातडीने पावले उचलत केंद्र शासनाच्या कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाशी पाठपुरावा केला. केलेल्या पाठपुराव्याला यश येऊन ११ सप्टेंबर च्या पत्रानुसार प्रवेश प्रक्रियेस ३० सप्टेंबरपर्यंत मुदत वाढ देण्यात आली. यामुळे संपूर्ण राज्यातील प्रवेशास मुकलेल्या विद्यार्थ्यांना व संस्था व्यवस्थापनास खूप मोठा दिलासा मिळालेला आहे. या प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ मिळवून दिल्याने औद्योगिक प्रशिक्षण विकास महामंडळाचे अध्यक्ष नंदकुमार जगदाळे, उपाध्यक्ष विश्वास सावंत यांनी राज्यातील सर्व पदाधिकारी, प्राचार्य व कर्मचारी यांच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री ना.रक्षा खडसे व आ.एकनाथ खडसे यांचे आभार मानले.



# पुणेरी भुसावळकर मित्र परिवारातर्फे ना. संजय सावकारेंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १६ सप्टेंबर**

राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री तथा भुसावळचे आमदार संजय सावकारे यांचा सत्कार समारंभ पुणेरी भुसावळकर परिवारातर्फे करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभा सदस्य डॉ. प्रा. मेधा विश्राम कुळकर्णी उपस्थित होत्या. तसेच ना. सावकारे यांचा त्यांच्या मूळ भुसावळ गावातील पण सध्या पुण्यात स्थायिक झालेल्या मित्र परिवाराने केलेल्या या सत्काराच्या कार्यक्रमास ना. चंद्रकांत पाटील पण आवर्जून उपस्थित होते.

राजेश राका यांनी आपल्या ओघवत्या शैलीत कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सांगितला. भुसावळ शहरातून पुण्यात स्थाईक झालेल्या भुसावळकरांतर्फे ना. सावकारेंचा सत्कार ललिता पाटील व दीप्ती अडावदकर यांनी केला. रजनी सावकारेंनी आपले विचार व्यक्त केले.

ना. सावकारे यांचा परिचय सुनील पाटील यांनी करून दिला व ना. सावकारेंना पुणेरी पगडी घालून सत्कार राजेश राका, मिलिंद फ ालक व अरुण लोखंडे यांनी केला. सत्कारानंतर ना. सावकारे यांनी मनोगत व्यक्त केले.

ना. सावकारे यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. वाचन नीरज सराफ यांनी केले. ना. चंद्रकांत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले व अभाविपचे कार्य करत असताना भुसावळ शहरात दोन वर्षे वास्तव्य केल्याचे सांगितले.

योगेश यावलकर आणि संगीता पटवारी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुनील पाटील, नीरज सराफ, योगेश यावलकर, ज्योती बनसोड, सोनाली पिंपळकर, अमित पेंढारकर, अरुण लोखंडे, मिलिंद फालक, जयंत फालक, अनिरुद्ध पळशीकर यांनी परिश्रम घेतले.

# सुनसगाव-नशिराबाद पुलावरुन वाघूरचे पाणी गेल्याने संपर्क तुटला

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १६ सप्टेंबर**

वाघूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाण्याची आवक वाढल्याने तेच पाणी वाघूर नदीवर सुनसगाव-नशिराबाद दरम्यान पोहोचले. तेव्हा पुलावरून पाणी जात असल्यामुळे या गावांचा संपर्क तुटला आहे.

भुसावळ तालुक्यातील वराडसीम-वाघूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक वाढल्याने धरण १०० टक्के भरले. यामुळे १६ रोजी सकाळी ८ वाजता धरणाचे २ दरवाजे अर्धा मीटरने उघडण्यात आले. त्यानंतर १० वाजता ६ दरवाजे १ मीटरने उघडण्यात आले. असे दुपारी १ वाजे दरम्यान २० दरवाजे १ मीटरने उघडण्यात आल्याने वाघूर नदी पात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. परिणामी सुनसगाव नजिक वाघूर नदीवर नशिराबाद-सुनसगाव दरम्यान बांधण्यात आलेला पूल पाण्याखाली गेल्याने या रस्त्यावरुन वाहतूक बंद करण्यात आली होती. पुलावरुन पाणी गेल्याने नशिराबाद-सुनसगाव या गावांचा संपर्क तुटला. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक कुऱ्हा पानाचे येथूनच भुसावळ मार्गे वळविण्यात आली.



पुलावरुन पाणी जाताच सुनसगाव पोलीस पाटील खुशाल पाटील व सामाजिक कार्यकर्ते जितेंद्र काटे यांनी महसूल व पोलीस प्रशासनाला माहिती दिली. त्यामुळे नशिराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी, सर्कल, तलाठी तसेच भुसावळ तालुका पोलीस अधिकारी, तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी, पदाधिकारी, तंटामुक्ती समिती अध्यक्ष प्रवीण चौधरी यांनी घटनास्थळी दाखल होऊन पर्यायी व्यवस्था केली. याच पुलाजवळ सध्या रस्त्याचे काम सुरू आहे. त्यामुळे गावाकडे पाणी येते की काय, असा प्रश्न निर्माण झाला होता. गेल्या चार वर्षानंतर पुन्हा एकदा या पुलावरुन पाणी गेल्याने पूर पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. दरम्यान पाणी ओसरल्यावर पुलाची साफसफाई करावी लागेल. त्यानंतरच वाहतूक सुरू होईल, असे सांगण्यात येत आहे.

# संघटनात्मक संरचनाच मुक्ती आंदोलनाला समाजात रुजवेल - राजेश पवार

## महाविहार मुक्ती आंदोलनाचे जळगाव-बुलडाणा संयुक्त अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, १६ सप्टेंबर**

जागतिक बौद्धांचे अस्मिता स्थान असलेले बिहारमधील महाबोधी महाविहार मुक्त करण्यासाठी जगभरात खूप मोठमोठी आंदोलने सुरु आहेत. भावनिक होऊन लाखोंच्या संख्येने उभे राहिलेले आंदोलन जोपर्यंत संघटित होणार नाही तोपर्यंत यशस्वी होऊ शकत नाही, त्यासाठी संघटनात्मक पद्धतीने लढा देऊन आंदोलन यशस्वी करता येईल, असे प्रतिपादन मुंबई विभाग मुख्य समन्वयक राजेश पवार यांनी केले.

महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन बौद्ध जनजागृती अभियान समिती महाराष्ट्र राज्याचे जळगाव आणि बुलडाणा जिल्ह्यांचे संयुक्त अधिवेशन तालुक्यातील डोलारखेडा येथे १४ सप्टेंबर रोजी उत्तर महाराष्ट्र विभागाचे मुख्य समन्वयक रवींद्र हिरोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

मराठवाडा मुख्य समन्वयक सत्यजीत साळवे (छ. संभाजीनगर), संविधान प्रचारक सुभाष कांबळे (ठाणे), प्रदेश संघटक दिलीप इंगळे, बुलडाणा जिल्हा संघटक सुशील इंगळे, ज्येष्ठ पत्रकार मोहन मेढे, निवृत्त मेजर विनोद लहासे, मीडिया प्रभारी निवृत्त मेजर रतन डोंगरदिवे, देवानंद जाधव, सम्राट अशोक सामाजिक संघाचे अशोक निकम उपस्थित होते.



यावेळी सत्यजीत साळवे यांनी महाबोधी महाविहाराचा इतिहास विशद केला, तर मोहन मेढे यांनी मुक्ताईनगर तालुक्यातील आंबेडकरी चळवळ आणि धम्म चळवळ सांगितली. भीमा कोरेगावचा रणसंग्राम ज्यांनी इतिहासात कोरला त्या शूरवीरांच्या वंशजांवर महाबोधी महाविहार मुक्त करण्याची जबाबदारी असून संघर्षाचा इतिहास असलेल्या महाराष्ट्राने या लढ्याला यशस्वी करण्यासाठी एकसंघ होऊन ताकदीने लढले पाहिजे, असे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष रवींद्र हिरोळे यांनी केले.

सूत्रसंचालन ॲड. राहुल लहासे यांनी, तर आभारप्रदर्शन पंकज रोटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सिद्धार्थ थाटे, शिवाजी वानखेडे, दुर्योधन सुरवाडे, सुरेश इंगळे, बाळू इंगळे, भरत वानखेडे, शिवाजी इंगळे, गणपत इंगळे, अनिल वाघ, पंकज हिरोळे, सुनील खराटे, राहुल इंगळे, प्रशांत हिरोळे, विनोद मोरे, अतुल हिरोळे, गौतम वाघ, आशिष हिरोळे, किशोर निकम, राजू निकम, अरुण वानखेडे, विनायक हिरोळे, आदित्य इंगळे व धम्म उपासिका महिला मंडळाने परिश्रम घेतले.

# फैजपूर नगरपालिकेला राष्ट्रीय हरित लवादाने ठोकला १५ कोटींचा दंड

## सांडपाणी अन् कचरा व्यवस्थापनात आढळल्या त्रुटी; पर्यावरणीय नुकसान भरपाईचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर (ता. यावल), १६ सप्टेंबर**

राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) पश्चिम क्षेत्र खंडपीठाने फैजपूर येथील नगरपरिषदेला १५ कोटी रुपये पर्यावरणीय नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. ही भरपाई महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे एका महिन्याच्या आत जमा करण्याचे निर्देश देण्यात आले. ३ सप्टेंबरला हरितलवादाने हे आदेश काढले आहेत. यामुळे नगरपालिका व्यवस्थापनाचे पुन्हा एकदा वाभाडे चव्हाट्यावर आले आहे.

फैजपूर येथील ललितकुमार चौधरी यांनी पर्यावरण विभाग आणि इतर प्रतिवादींविरुद्ध ही याचिका दाखल केली होती. या प्रकरणाची सुनावणी न्या.




दिनेशकुमार सिंह (न्यायिक सदस्य) आणि डॉ. विजय कुळकर्णी (तज्ज्ञ सदस्य) यांच्या खंडपीठासमोर झाली. खंडपीठाने सुनावणीदरम्यान नमूद केले की, फैजपूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रत्युत्तर प्रतिज्ञापत्राला २ आठवड्यात उत्तर देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र ३ सप्टेंबरपर्यंत कोणतेही प्रत्युत्तर दिले नाही. नगरपरिषदेला प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेली १४ कोटी ६५ लाख रुपये (सांडपाणी व्यवस्थापनासाठी) अणि १ कोटी २२ लाख रुपये (घनकचरा व द्रव कचरा व्यवस्थापनासाठी) अशा दोन कारणाने एकूण १५ कोटी ८७ लाखांची रक्कम जमा करण्यास कोणताही आक्षेप नाही. नगरपरिषदेने ही रक्कम एका महिन्याच्या आत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा करावी, असे आदेशात म्हटले आहे.

> या आदेशाच्या अनुषंगाने उचित त्या प्राधिकरणासमोर दाद मागण्यात येईल. या दंडाची रक्कम भरणे आणि केंद्र, राज्याच्या अर्थ सहाय्यविना सांडपाणी व्यवस्थापन व प्रक्रिया प्रकल्प उभारणे, ही नगरपरिषदेच्या आर्थिक कुवतीबाहेरील गोष्ट आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या योजनेंतर्गत सांडपाणी व्यवस्थापन व प्रक्रिया प्रकल्पासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला असून, तो लवकरच तांत्रिक मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. या सर्व कार्यवाहीची माहिती राष्ट्रीय हरित लवाद व संबंधित अपिलीय प्राधिकरण यांना देण्यात येईल व दंड माफीबाबत मागणी करण्यात येणार आहे. तसेच साचलेल्या कचऱ्यावरही प्रक्रिया करण्यात येणार असून त्याबाबत निविदा प्रक्रिया सुरू आहे. त्याचीही माहिती लवाद व अपिलीय प्राधिकरण यांना देण्यात येईल व दंड माफीची मागणी करण्यात येईल.
> **-अविनाश गांगोडे, मुख्याधिकारी, फैजपूर**

**दंडाची मोठी रक्कम कशी भरणार?**

फैजपूर पालिकेची आर्थिक स्थिती नाजूक आहे. एवढे १५ कोटी रुपये कसे भरणार, याबाबत माहिती घेतली असता, फैजपूर नगरपरिषद ही 'क' वर्ग नगर परिषद आहे, तर शासनाने ५ वर्षात १५ कोटीचाही विकास निधी दिला नाही. एवढी १५ कोटींची मोठी रक्कम कशी भरली जाईल? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले असून पालिकेला दिलासा मिळाला तरच ही रक्कम माफ होऊ शकते.